# नवी साखरझोप

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
ग्रं. सं.



REFBK-0006979

प्रा. गं. म. निरंतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

# नवी साखरझोप

गं. भा. निरंतर, एम्. ए.

REFBK-0006979

[redacted]

औंध पब्लिशिंग ट्रस्ट लि. ( औंध )

४०।४१, वेलस्ली रोड, पुणें

किंमत सव्वातीन रुपये

प्रकाशक :
**आप्पासाहेब पंत**
औंध पब्लिशिंग ट्रस्ट लि.
४०।४१, वेलस्ली रोड
पुणें, १

सर्व हक्क स्वाधीन

प्रथम मुद्रण
जुलै १९४८

मुद्रक
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगांव
मुंबई नं. ४

# नवी साखरझोप

मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

## याच लेखकाच्या लेखणींतून

कादंबरी

- जीवननृत्य
- अंधारांतील दिवे
- भूकंप

निबंध

- विवाह आणि नीति
- साखरझोप

चरित्र

- इब्सेन
- टॉलस्टॉय

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | गोंडस असत्य–थापा | ... | ... | १ |
| २ | मुखपृष्ठ | ... | ... | ६ |
| ३ | साहेब आणि शिपाई | ... | ... | १० |
| ४ | पुढें व्हा–आलोंच | ... | ... | १५ |
| ५ | प्रगति, उन्नति वगैरे | ... | ... | २१ |
| ६ | अत्यंत खाजगी | ... | ... | २५ |
| ७ | विलायत आणि विद्वत्ता | ... | ... | ३० |
| ८ | माणूस आणि मांजर | ... | ... | ३५ |
| ९ | नव्या सालचा पाऊस | ... | ... | ३९ |
| १० | आचार–विचार | ... | ... | ४१ |
| ११ | गरीब बिचारे श्रीमंत | ... | ... | ४६ |
| १२ | गणपति बाप्पा मोरया | ... | ... | ५१ |
| १३ | किंचित् आधुनिक | ... | ... | ५८ |
| १४ | आज रोख उद्यां उधार | ... | ... | ६३ |
| १५ | गाई आणि बैल | ... | ... | ६७ |
| १६ | प्रेक्षक आणि श्रोते | ... | ... | ७२ |
| १७ | गिऱ्हाईक | ... | ... | ७८ |
| १८ | शिवरामपंतांचा अपमान | ... | ... | ८४ |
| १९ | माणसाचा पहिला प्रश्न–मृत्यु | ... | ... | ८९ |
| २० | अध्यक्षांची सभा | ... | ... | ९४ |
| २१ | निरुपयोगी सज्जन | ... | ... | ९९ |
| २२ | पाऊलवाट | ... | ... | १०६ |
| २३ | लेखक आणि पठाण | ... | ... | ११० |
| २४ | कढई आणि नारळ | ... | ... | ११६ |
| २५ | कुंडींतील झाडें | ... | ... | १२१ |
| २६ | पायांतली वहाण— | ... | ... | १२५ |
| २७ | संस्था व इमारत | ... | ... | १३२ |

# गोंडस असत्य–थापा

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नों. दि.
दा. क्र.

माझ्या अनेक मित्रांपैकीं तो एक मित्र होता. तो मला त्याच्या थापेबाजपणाबद्दल आवडत असे. तसें त्याचें वाचन फार दांडगें होतें.

इतकें वाचूनही तो पुष्कळ वेळां थापा मारीत असे. आपल्या ज्ञानांतील कमीपणा भरून काढण्यासाठीं माणसें थापा मारून वेळ मारतात. परंतु व्यास–वाल्मिकीच्या लायकीचा तो माणूस कां थापा मारतो हें मला अद्यापहि उमगलें नाहीं !

मीही त्याच्या थापा खऱ्या गोष्टीपेक्षांही जास्त कळकळीनें ऐकतों. कारण त्या थापा असतात. तो सांगतो तें जगांत नसेल अशी माझी त्याच्या सांगण्याच्या अनुभवावरून अपेक्षा असल्यानें त्या थापांबद्दल आनंद किंवा दुःख प्रसंगानुसार व्यक्त करतांना मला कांहींही भीति वाटत नाहीं.

नाहींतरी आपण शिकतों मिळवतों तें ज्ञान तरी ‘ सत्य ’च आहे याला पुरावा काय ? आपण ज्याला सत्य म्हणतों तें म्हणजे आपणास माहीत नसलेलें असत्यही असेल कदाचित् ! आज आपण तें सत्य म्हणून निर्धास्तपणें मिरवीत आहोंत. उद्यां एखाद्या शास्त्रज्ञानें टोला मारून तें असत्य ठरवलें तर द्या काय ?

थापा या अस्सल असत्यापेक्षां पुष्कळ सत्य असतात. सत्य हा थापांचा प्राण आहे. माझा मित्र नेहमीं म्हणतो कीं, जगांतील कटु सत्य मधुर करण्याचें कार्य थापा करतात !

थापांचेंही महत्त्व कांहीं कमी नाहीं. जगांत सत्यापेक्षां थापांचा जास्त उपयोग आहे. थापा हें एक गोंडस असत्य आहे. इंग्रजींत त्याला white lie म्हणतात. हवेंत ऑक्सिजनच नुसता असला तर प्राणवायूच्या प्रळयांत आपण बुडून मरून जाऊं. म्हणून त्यांत जरा इतर वायूंचा भाग टाकला आहे. हवेसारखेंच व्यवहारांतील सत्य आहे. त्यांत अस्सल सत्याचा 'ऑक्सिजन' अगदीं माफक असतो. जगांत सज्जनांचें लोकसंख्येशीं जें प्रमाण, पानांचें फुलांशीं जें प्रमाण, सुशिक्षित स्त्रियांत बालविवाहित स्त्रियांचें जें प्रमाण किंवा विवाहांच्या संख्येंत अस्सल प्रेमविवाहांचें जें प्रमाण, महाराष्ट्रीय विद्वानांत श्रीमंतांचें जें प्रमाण, किंवा दूर कशाला या लेखाच्या विस्ताराचें मराठी वाङ्मयविस्ताराशीं जें प्रमाण तेंच थापांतील एकंदर माहितीचें सत्याशीं प्रमाण असतें.

जगांत सत्याचें संशोधन इतक्या धडाक्यानें चालू आहे आणि ज्ञानाचा वेग इतका वाढला आहे कीं, सकाळीं एखाद्यानें अगदीं गळ्याची शपथ घेऊन सांगितलेली गोष्ट दुपारपर्यंत खोटी ठरण्याचा धोका असतो. आणि दोन्ही गोष्टी संध्याकाळपर्यंत सगळ्या लोकांना कळतात. एकाद्या मित्रानें आपली केलेली स्तुति आपल्या आळीच्या या टोकापासून घरोघर जाऊं लागते तोंच त्या टोकापासून निंदेचा लोंढा अंगावर येत असतो. या सत्यासत्याच्या झग-ड्यांत थापांचे फार हाल होतात. लहानशा सत्याचा आधार घेऊन आपल्या ठिकाणच्या असत्याचा डोलारा समाजांतून मिरवीत असतां थापांचा डोला कोठें व केव्हां थंड होईल याचा नेम नसतो.

तरी पण जगानें थापाबद्दलची अभिरुचि अद्याप सोडली नाहीं. थापा मारणाऱ्या लोकांना एक प्रकारचा ध्येयवादीपणाचा जोर आला आहे. सत्या-पेक्षांही जास्त चिकाटीनें ते थापा मारूं लागले आहेत. आणि थापा मार-णाऱ्या लोकांचें कौतुक करणारेहि लोक पुष्कळ आहेत.

समाजांत वक्ते थोडे व श्रोते फार असें असतें. हे श्रोते फार मजेदार मनोवृत्तीचे असतात. कोणतीही गोष्ट ऐकावयास ते तयार असतात. कारण सत्य शोधून काढण्याची वणवण करण्याचा त्यांना कंटाळा असतो. 'सत्य जगांत नाहींच, असलेंच तर तें फार दुर्मिळ आहे. त्याच्यासाठीं थांबावयाला वेळ आहे कोणाला ? कोणास ठाऊक कोणाचें खरें आहे ?' अशा सैल मनोवृत्तीनें

श्रोते वावरत असतात. सगळ्या पक्षांचें म्हणणें ते ऐकून घेतात. जमनादास गायकवाडवाड्यांत आले तेथें हजर नि खेर शिवाजीमंदिरांत आले तेथेंहि हजर! धर्म ही अफू आहे असें म्हणणाऱ्यांना टाळ्या वाजवणारेच अनंत-चतुर्दशीच्या मिरवणुकींत कपाळाला मळवट फांसून टाळ घेऊन नाचत असतात. सांगणारे जीव तोडून सांगत असतात, 'अहो, आम्ही गेलीं १५ वर्षे शंख करून सांगत आहोंत. आमचें म्हणणें खरें आहे. आमचा मार्ग कल्याणाचा आहे.' आणि त्यांचे प्रतिपक्षीही सांगतात, 'अहो लोकहो, दिशाभूल होऊं देऊं नका. थापांना फसूं नका. या-या-या मार्गानें या. हें पहा कल्याण!'

ऐकणारे श्रोते दोघांनाही हिअर-हिअर, देअर-देअर करून आपापल्या मार्गानें गुपचिप निघून जातात. कारण ते मनांत म्हणतात 'हे खरे कशा-वरून नि ते खरे कशावरून!' सगळे थापा मारतात लेकाचे! दुतर्फा उभ्या असलेल्या घराकडे पहात पहात आपण जसे रस्त्यावरून स्वतःच्या घराकडे गुपचिप जात असतों तशीच या श्रोतृसमाजाची स्थिति!

थापा मारण्याची कला किती लोकप्रिय होत चालली आहे हें एकंदर जागतिक वाङ्मयांतील कादंबऱ्यांच्या प्रमाणावरून पहा! त्यांतले श्रीधरपंत काय नि किशोर काय, ललिता काय नि लक्ष्मीबाई काय, सगळ्या थापा! उलट वाङ्मयांत सत्य लिहिणें हा गुन्हा आहे! तुम्हाला खरोखर एखादा उल्लू किशोर माहीत असला तरी वाङ्मयांत तो तसाच्या तसा आणतां येत नाहीं. त्याचा केशव करून आणावयास पाहिजे! नाहींतर किशोरला आपल्या अब्रूवर लगेच पैसे मिळवतां येतात! एखाद्या मुलीवर तुमचें प्रेम असलें आणि तुम्ही कवीही असलांत तरी तिच्यावर कविता लिहितांना थोडी थाप मारावी लागते, 'रुष्ट झालेल्या प्रतिभेस!' असें नांव द्यावें लागतें. मग लिहा खुशाल वाटेल तें. लोक वाचतील, अगदीं 'ती' मुलगी सुद्धां राजरोसपणें वाचील!

केवढें महत्त्व आहे थापांचें! म्हणून तर कायद्यानें थापांना संरक्षण दिलें आहे! एखाद्याचा जीव घेण्याइतका तुम्हाला खरोखर संताप आला असला आणि त्याचा जीव घेण्याइतका तो क्षुद्रही असला तरी त्या विचाराची सत्यता

अंमलांत आणली कीं गळफांस आलाच तुमच्या गळ्यांत ! म्हणून नुसती संतापून थाप मारावी कीं 'लेका तुझा जीव घेईन'. पण जीव घेणें चांगलें नाहीं. कारण तें सत्य होईल. ती थाप होणार नाहीं !

माझा तो थापेबाज मित्र एकदां मला म्हणाला कीं, "कोणत्या तरी अत्यंत धूर्त माणसानें जगाच्या आरंभीं एक फार लोकप्रिय थाप मारली आहे."

मीं त्याला विचारलें, "कोणती रे ?"

"परमेश्वर आहे ही !"

काय बेफाम थाप मारली मला त्यानें. मी तर सर्दच झालों. मीं संतापून त्याला म्हटलें कीं, "काय आधार आहे तुजजवळ ? मूर्खासारखें बडबडतोस ?"

"आहे याला काय आधार आहे ? ईश्वर आहे यालाही आधार नाहीं नि नाहीं यालाही नाहीं ! नाहीं म्हणून आहे व आहे म्हणून नाहीं ! सज्जनांना छळणारा तोच, दुष्टांना छळणारा तोच, उत्पन्न करणारा तोच, मारणारा तोच, सगळें तोच ! हें काय सत्याचें स्वरूप आहे वाटतें ? पण कोणीं तरी एकदां थाप मारली, 'अहो, परमेश्वर आहे बरं का ? गप्प बसा !'

"बरोबर बसली ती थाप ! जो तो दुसऱ्याला सांगूं लागला, 'अहो परमेश्वर आहे अं ! जरा जपून वागा !' जगाच्या अंतापर्यंत लोक एकमेकांना झुलवीत राहणार या थापेच्या जोरावर ! किती लोकप्रिय थाप आहे ही ! तिला थाप म्हटलेलें कोणी सहन करणार नाहीं. जाळून टाकतील म्हणणाऱ्याला. कारण लोकांचें कितीतरी काम भागलें आहे या थापेवर ! सगळें जग या थापेच्या श्रद्धेवर चाललें आहे."

परमेश्वर ही थाप आहे असें म्हणणाऱ्यांनाच लोक थापेबाज ठरवतात ! प्राणांची आहुति देतील पण या थापेला हात लावूं देणार नाहींत !

अशा फार थोड्या थापा असतात कीं, ज्या आपल्या पोटांतील सत्य बेमालूम पचवून टिकूं शकतात ! ज्याला अशी थाप तयार करतां येईल आणि ज्याला मारलेल्या थापेचें सत्याच्या आगीपासून रक्षण करतां येईल तो जगांत लोकप्रिय ठरल्याखेरीज राहणार नाहीं ! मग ती थाप एखाद्या कादंबरींत मारा, कवितेंत मारा, गोष्टींत मारा नाहींतर व्यासपीठावरून मारा,

मारली कीं लोकांच्या मनावर बेमालूम बसली मात्र पाहिजे. अंगाशीं आली कीं मग ती संभाळण्याचें नशिबीं येणार, सत्यप्रियतेचें व्रत पत्करावें लागणार, छळ सोसावा लागणार, आणि महंमद, येशू खिस्त वगैरे महात्म्यांच्या तोंडाकडे पहात जगत रहावें लागणार. कारण त्यांचा छळ झाला आहे.

कारण, थापा मारणें हीही एक कला आहे. थापा हें रंगरंगोटी केलेलें गोंडस असत्य आहे ! तिचा रंग विटला उडाला कीं आंत अत्यंत किळसवाणें असत्य एकदम दिसूं लागतें.

# मुखपृष्ठ

# २

एका भल्या गृहस्थाला एकदां एकदम वाङ्मयांत घुसण्याची लहर आली. एक नवें कोरें पुस्तक वाचीत असतां त्याचा एक मित्र आला तेथें.

" काय रे, काय ललित-वाङ्मय आहे हातांत? मुखपृष्ठावरून तर जरा बरं दिसतंय ! "

" मुखपृष्ठावर भाळूनच आणलें. पण आंत नुसता कचरा ! ७० पानें झालीं पण अद्याप पुस्तक खालीं ठेववत नाहीं. "

" म्हणजे? ही तर चांगल्या पुस्तकाची जात झाली. मग चिडलास कां?"

" संतापून खालीं ठेववत नाहीं! मी अगदीं सडकून झाडणार आहें लेखकाला. काय सांगायचें आहे तें सारखा तपासतों आहें. पण अद्याप कांहीं पत्ता नाहीं. ७० पानें झालीं तरी हा ग्रंथ अद्याप कांहीं 'बोलत' नाहीं. पोलीस एकाद्या गुन्हेगाराची जबानी घेतांना जसा पाठपुरावा करतात तसा मीं ग्रंथाचा चालवला आहे. शेवटपर्यंत पिच्छा पुरवीन आणि मग कांहींही तथ्य सांपडलें नाहीं तर—"

" तर काय लेखकाला गांठून त्याला 'बोलवणार' का ? "

" भेटला तर हात धरून विचारीन लेखकाला ! मुखपृष्ठें रंगवून बनवतात लेकाचे अलीकडचे लेखक! हरिभाऊंच्या वेळची कला जुनी झाली म्हणे! आणि आतां ही मुखपृष्ठाची कला आली आहे. हरिभाऊंच्या पुस्तकावर आहे का मुखपृष्ठ? 'रूपनगरची राजकन्या आहे का?' असें एक गिऱ्हाइक एका पुस्तक-

विक्रेत्याला विचारीत होतें. दुकानदारानें काढली हरिभाऊंची राजकन्या ! तें सत्यनारायणाच्या पोथीच्या आकाराचें पुस्तक पाहिल्याबरोबर तें गिऱ्हाइक जरा चिडलें.

" गिऱ्हाइक ओरडून म्हणालें ' अहो सेकंडहँड नको ! '

" ' वाः हें काय सेकंडहँड आहे ? या मार्गशीर्षांत निघालेली १० वी एडिशन आहे ना ? '

" ' मग रॅपर कुठें याचें ? '

" ' कशाचें रॅपर ? '

" ' रॅपर म्हणजे मुखपृष्ठ का जाकिट काय म्हणतात तें ? '

" दुकानदारानें ओळखला गिऱ्हाइकाचा नूर; तो म्हणाला—

" ' साहेब, हरिभाऊंचें पुस्तक आहे. हरिभाऊ मोठ्यांनीं प्रसिद्ध केलेलें नाहीं. आर्यभूषणचें प्रिंटिंग आहे. हरि नारायण आपटे लेखक आहेत याचे. मेले ते ! त्यांचें आहे हें !' ' मग या नांवचें दुसरें असेल. मला एकानें त्याच्यावर एका रजपूत रमणीचा सुंदर तीन रंगी—'

" ' हाँ ! असेल ! असेल ! हौशी आहांत. पण बरं नाहीं अं ! इथं नाहीं तें ! मुखपृष्ठेंच कां घेत नाहीं शेकड्याच्या भावानें ! मी देतों ना तुम्हाला ! मुखपृष्ठाचींही पुस्तकें आहेत आमच्याकडे ! नुसतें मुखपृष्ठ पाहिल्याबरोबर चीत पडाल. पण हरिभाऊंच्या नांवाचें सोंग घेऊं नका. हरिभाऊंना कधीं मुखपृष्ठ लागलें नाहीं. १०।१० आवृत्त्या निघाल्या पण कधीं मुखपृष्ठ नाहीं कादंबरीवर ! मग ती 'मधली स्थिति' असो नाहीं तर 'सूर्योदय' असो. ' गड आला पण सिंह गेला ' पुस्तक पहा. गड नाहीं का सिंह नाहीं. नुसतीं बाळबोध अक्षरें. बरं रागावूं नका अं ! मग देऊं का एखादें मुखपृष्ठ ? '

"पण गिऱ्हाइक आपलें मुखपृष्ठ रंगवल्यासारखा चेहरा करून निघून गेलें.

" मीं हा देखावा समक्ष पाहिला आणि त्या दुकानदाराजवळ जरा बोलत बसलों. नुसत्या मुखपृष्ठावर पुस्तकें कशीं खपतात याचे त्यानें मला कांहीं आंकडे सांगितले. मी तर थक्कच झालों. हें पुस्तक आजपर्यंत तीन हजार खपलें म्हणे. नुसतें मुखपृष्ठ !"

" म्हणजे तूंही मुखपृष्ठावरच बनलास तर ? "

" मी बनलों नाहीं. दुकानदाराचें म्हणणें तपाशीत होतों. आतां खात्री झाली. एक विचार नाहीं का एक तत्त्व नाहीं सबंध पुस्तकांत! प्रत्येक पृष्ठावर मुखाचीं वर्णनें आहेत. रस्त्यांत पाहिलेल्या पोरींचे चेहरे रंगवतात लेकाचे पुस्तकांत. हें म्हणे यांचें निरीक्षण! आम्हांला काय डोळे नाहींत का त्या पोरी पाहायला ? त्यासाठीं वर्णनं कशाला पाहिजेत! अगदीं कालिदासापासून पाहतों आहें ना मी!"

" कारे ? कालिदासावर कां घसरलास ?"

" अहो, सगळीकडे एक भाषा! कधीं मुखकमळ कधीं कमलमुख! समास निराळे! विग्रह निराळे! पदें तींच! वरतीं रंगीत कव्हरावर मुख! आंत मुख! बाहेरच्या जाहिरातीवर सुद्धां मुख!"

" स्त्रीजातीचा केवढा मान आहे हा! त्यांच्या चित्राशिवाय सर्व जीवन थंडें होईल!"

" मान आहे खरा! मींही आतां स्त्रीजातीला मान द्यावयाचें ठरवलें आहे."

" आं! काय! काय योजना आहे ?"

" ग्रंथ काढतों एक! करतों प्रसिद्ध! मुखपृष्ठ मिळायचा अवकाश कीं पुस्तक तयार! विकत घेतल्याखेरीज फोडूं नये असें लेबल मारतों!"

" कसला ग्रंथ आहे ?"

" हा पहा. व्ह. फा. चे जमाखर्चाचे पेपर्स!"

" वाः! वाः! आणि यावर मुखपृष्ठ कोणाचें ?"

" एक तरुण व तरुणी! तरुण हा खर्च व तरुणी ही जमा! ओला! वरतीं ग्रंथाचें नांव जीविताचा जमाखर्च. दोन सुंदर चेहरे काढा आतां! अगदीं उमदे लोक पाहिजेत!"

" काय फसवणूक करतां ही लोकांची ?"

" फसवणूक ? कसली फसवणूक! समाजाची रोजची गरज झाली आहे ही! मी वास्तववादी माणूस आहें. सभांत काय, समाजांत काय, परिषदांत काय, सगळीकडे मुखपृष्ठांना भाव आहे. एखाद्या प्रचंड सभेचीं मुखपृष्ठें चांगलीं असलीं कीं मग व्याख्यान कितीही रद्दी असूं द्या, कितीही विद्वत्ताप्रचुर असूं द्या, सभा चित्रासारखी स्तब्ध! अगदीं मुखपृष्ठावरील चित्राइतकी स्तब्ध. आज

काल कशांत कांहीं राम राहिला नाहीं. म्हणून लोक मुखपृष्ठावरच भागवतात. पुस्तकाचा अवांतर देह पाहतो कोण ? नुसतें मुखपृष्ठ पाहिजे ! समाजांतला प्रत्येक माणूस पहा.

“ या पावडरी, हे स्नो, हीं ब्रिलियंटाइन्स, हीं पोमेडं—कशाची तयारी आहे ही ? मुखपृष्ठाची ! शरीर पिळदार करायला आंत मांसाच्या गोळ्यांचा माल-मसाला लागतो. त्याला व्यायाम पाहिजे, कष्ट पाहिजे. कोण करतो एवढी दगदग ! शरीर—ग्रंथाचा आंतला भाग मुखपृष्ठाखालीं झांकून टाकायचा ! छातीच्या बरगड्या दिसोत, मांडीचे बोरू असोत, दंड पेन्सिलीएवढे असोत. नुसतें मुखपृष्ठ झक्क असलें कीं बस्स ! कपड्याच्या शास्त्राची सोयच आहे ही. तोंडावर कपडे घालावे लागत नाहींत आणि इतर शरीर उघडें टाकतां येत नाहीं. त्यामुळें इतर शरीर झांकून टाकून शरीराचें रॅपर, मुखपृष्ठ तेवढें झक्क केलें कीं बस्स ! माझी आतां या ग्रंथाच्या बाबतींत जशी फसवणूक झाली तशी शरीर-ग्रंथाच्या बाबतींतही होते. कित्येक सुंदर मुखांचीं शरीरें पाहिलीं कीं ओकारी येते. काडी पहिलवान जेवतांनासुद्धां सदरा काढीत नाहींत. पण मुखपृष्ठ पाहून घ्या ! चेहरे अगदीं प्रिन्स ऑफ वेल्स थाटाचे. पण शरीराचा तळमजला आणि पाया निव्वळ ढिसूळ ! तेव्हां इतका मुखपृष्ठाला भाव असल्यावर मग माझा ग्रंथ कां नाहीं खपणार ! एक उमदा तरुण व एक युवती का काय म्हणतात ती, यांचे फोटो मिळाले कीं काढतों ग्रंथ—

**जीविताचा जमाखर्च !”**

“ मग प्रयत्न चालले असतील तुमचे मुखपृष्ठाबद्दल ? ”

“ हो ! हो ! तसें पाहिलें तर तुमचें किंवा माझेंसुद्धां मुखपृष्ठ कांहीं वाईट नाहीं. पुरुषाच्या शरीराचा ग्रंथ हा मुखपृष्ठाच्या बाबतींत हरिभाऊ आप-ट्यांच्या कादंबऱ्यांसारखा आहे. पण स्त्री-शरीराचें मुखपृष्ठ मात्र आधुनिक वाङ्मयासारखें आहे. तेव्हां सांगतों काय ? एक तसलें मुखपृष्ठ मिळवा कीं ठोकलाच ग्रंथ !

**जीविताचा जमाखर्च !”**

त्या वाङ्मयेच्छु गृहस्थाच्या मुखपृष्ठाकडे त्याचा मित्र जरा वेळ पहा-तच राहिला !

# साहेब आणि शिपाई ३

भांडवलवाले व मजूर, मालक व नोकर, घरमालक व भाडेकरी, मास्तर व विद्यार्थी, दुकानदार व उधारी थकलेलें गिऱ्हाइक, नाटककार व कॉम्प्लिमेंटरी पासवाले प्रेक्षक, फार काय, पुरुष आणि स्त्री—

पण या कोणत्याही जोडींत साहेब व शिपाई ही जोडी असणार नाहीं! कारण साहेब व शिपाई ही जोडी वर्ग-कलहानें झालेली नसते! शिपाई या जातींत तुम्हाला सगळी हयात शिपाईच राहिलेले लोक दिसतील. आणि ते शिपाई आहेत म्हणजेच तेथें कोणी ना कोणी तरी साहेब आहेच! असा हा 'आग-धूर' न्याय आहे! म्हणजे ज्यांना शिपाई नाहीं असे साहेब पुष्कळ असतील. आपण मध्यम स्थितीवाले नोकरदार घ्या ना! म्हणजे १ ते १०० च्या आधें-मधें ज्यांचा पगार घोटाळत असतो असे. आपल्याला आपला परीट, चांभार, न्हावी, कोळसेवाला सगळे साहेबच म्हणतात. पण आपल्याला शिपाई असा कोण आहे?

पण साहेब नसलेला शिपाई सांपडायचा नाहीं. शिपाई व साहेब या जोडींत शिपाई हा स्थिर-अवयव आहे. शिपाई हा बीजगणितांतल्या 'क्ष' सारखा आहे. त्याची किंमत बदलते पण तो कायम! शिपाई हा ऑफिसच्या फाटकाइतका स्थिर आहे. त्याच्या हाताखालून कित्येक लोक जातात येतात. त्यांच्या अंगावरून निम्मे अधिक जग जात असेल पण तो येथें कायम! डोळ्याच्या पापण्यांप्रमाणें उघडणारें व लागणारें तें फाटक व सिग्नलप्रमाणें हात वरखालीं करणारा शिपाई म्हातारपणापर्यंत तेथें स्थिर असूं शकतो.

मी सांगतों तें अशा स्थिर लोकांबद्दल आणि मला आठवलें तें एका शिपाईदादावरूनच. आमच्या कॉलेजच्या काळांतील गोष्ट आहे ती. अहाहा ! पण नको–! कॉलेजांत असणाऱ्यांना त्या भावना असतातच व नसणाऱ्यांना सांगून तर कळायचें नाहींच पण गैरसमज मात्र व्हायचा सांगणाऱ्याबद्दल. ब्रह्मानंदासारखी चीज आहे ती. तेथें कोण कोणातें सांभाळी ?

—मी मोठ्या कॉलेजांत आलों होतों. चार वर्षांचा कोर्स–शक्य तितकी हवापालट, थारेपालट करून उपभोगावयाचा अशी माझी चतुर्वार्षिक योजना होती. नवें कॉलेज, नव्या इमारती, नवे प्रोफेसर्स, नवी बाग, नवे दोस्त. अगदीं त्या कोऱ्या करकरीत नवेपणावर मी नुसता तरंगत होतों. कोठें तरी फिरायचें, कोठें तरी बसावयाचें, कांहींतरी वाचायचें, लहर लागली तरच कांहीं तरी लिहावयाचें. कॉलेजांत आवारांत जास्तींत जास्त वेळ काढायचा, असें माझें ठरलें होतें. तसें कॉलेज जुनें होतें. पण मी तेथें नवा होतों ना ?

माझ्यापेक्षां तेथें जास्त वेळ राहणारा एकच दोस्त होता. तो म्हणजे आमच्या कॉलेजचा महादू ! कॉलेजचा सगळा इतिहास त्याच्या तोंडावरच्या सुरकुत्यांवर लिहिला आहे असें मला वाटे. अगदीं जवळ जवळ खच्चून छापलेल्या पुस्तकाच्या पानासारखें त्याचें तोंड दिसे.

नवे प्रिन्सिपॉल आले होते व त्यांचा ‘ उद्धाटन ’ समारंभ चालला होता. मी एकदां डोळे भरून माझ्या नव्या साहेबाला पाहून घेतलें व मग लागलों नेहमींप्रमाणें बाहेर रेंगाळायला.

बाहेर महादू बसला होता. नवे तरणेताठे शिपाई त्याच्या हाताखालीं खपत होते. तो नुसता हुकूम सोडायचा. समारंभाच्या इभ्रतीप्रमाणें टेबल कोणतें, टेबल क्लॉथ कोणतें, फ्लॉवरपॉट कोणचें, त्यांतला गुच्छ किती व कोणत्या फुलांचा, स्टेजवर खुर्च्या किती, पुढल्या रांगेत किती. सगळें सगळें त्याला पाठ होतें.

आपला जुना डगला–पट्टा अंगावर चढवून तो बसला होता.

“ काय महादबा ! तुमची फार धांदल असेल आज ?”

“ कशाची धांदल साहेब ? हा काय बसलो नव्हं का साहेबांवीणी इथं ?” बोलतां बोलतां त्यानें मांडीवर मांडी चढवली !

क्रमांक
नों. दि.

" बाकी तुम्हाला काय म्हणा ? असे छप्पन्न साहेब पाहिले असतील तुम्ही!"

" खरं आहे. अहो, हीं दोन दिवसाचीं पांखरें. महादवा येथें ३० वर्षें आहे !"

" काय तीस वर्षें ?"

" नाहीं तर ? १९–२० व्या वर्षीं कालिजाचा डगला चढवला अंगावर. आतां ५० वी उलटली ना ? हे आतां नवे साहेब आहेत ना ? यांना मी यांच्या प्रिन्हियस्च्या पहिल्या दिवशीं हापिसचा रस्ता दाखवला आहे."

" वा ! वा ! खरं म्हणजे तूंच आज अध्यक्ष पाहिजे होतास. त्यांना आहे का आठवण त्याची ?"

" असल नाहींतर नसल. त्यांचं उमद वय होतं तें. पण माणूस पहिल्यापासून मी हेरून ठेवलाय. त्याला ना मित्र ना मैत्रीण ! पुस्तक नि वह्या काखोटींत घालून वेड्यावाणी भटकायचा हा अवलिया ! बागेंत तो पलिकडला अगदीं शेवटचा बाक आहे ना, तेथें बसायची स्वारी ! अति मवाळ ! अति हुशार !"

" तुला रे काय माहित त्याची हुशारी ?"

" अहो, एवढीं पुस्तकं वाचलीं तीं काय पत्र्यावर पडलेल्या पावसाच्या पाण्यासारखीं ओघळलीं काय ? अन् आतां प्रिन्सिपॉल झाले ना ? ते काय उगाच ?"

" तूं नाहीं का त्यांना ओळख दिलीस ?"

" देऊं ! देऊं ! सध्यां गंमत पहातों आहें. कपड्याचा नि खुर्चीचा गुण असतो बघा एक एक. अगदीं पहिल्या दिवशीं आज सकाळीं पहिल्या टोल्याला गुरकावला कीं माझ्यावर ?"

" कां–? काय झालं होतं ?"

" म्हणे घंटा किती वेळ देतोस. ऑफिसांत कटकट होते. आतां काय सांगावं या साहेबाला ? अहो, माझ्या बापाच्या खांद्यावर चढून मी वयाच्या ८ व्या वर्षीं या घंटेवर टोला मारला आणि गेल्या ३० वर्षें मारतों आहें. अन् आतां हे साहेब मला शिकवतात घंटा द्यायला ? पण गप्प बसलों. असे किती

तरी साहेब पाहिलेत मीं. सगळयांच्या खुब्या ओळखतों मी. शिपायापासून हे अंमल करायला सुरवात करतात. त्यांना शिपायाची कां एवढी भिती वाटते कोणास ठाऊक ? शिपाई का त्यांचा साहेब होऊन येणार आहे कधीं ? पण हे आपले नव्याचे नऊ दिवस. मग आम्हीच सांगतों ना त्यांना सगळ्या भानगडी. आतां या साहेबांचे रंग पाहून घेतों. पण तुम्ही कांहीं म्हणा साहेब! आतांचे साहेब जुन्या साहेबांसारखे नाहींत बघा !"

"ते कसे काय ? दिवाळी–शिमगा देत नाहींत का ?"

"अरे ह्यट् ! दिवाळी–शिमगा काय जन्माला पुरतो ? मला काय कमी आहे ? माझा एक मुलगा कलेक्टरचा पट्टेवाला आहे नि दुसरा आतां शाळेंत आहे."

"कितवींत आहे ?"

"कशाचो कितवी ? तो तेथें असिस्टंट प्यून आहे. अर या साहेबांनीं काय दिवाळी नि काय शिमगा द्यावा ! आपण तर मागतबी नाहीं. अहो यांच्या दारचे वाणी हलतील तेव्हां शिपायाला जागा मिळणार कीं नाहीं ?"

"मग तुझी तक्रार कशाबद्दल ?"

"पोरसवदा काम ! जवळून गेले तर कळायचे नाहींत ! देशपांडे साहेब माहीत नाहींत तुम्हाला. काय उंचा-पुरा धिप्पाड माणूस. बुटाचा कर-कर आवाज वाजूं लागला कीं, सगळीकडे चुपचाप ! भिंती हालत असतील त्यांच्या दराऱ्यानें ! पण मन अगदीं लोण्यासारखं ! अहो, याला म्हणतात साहेब. त्यांना मुजरा करतांना जी ऐट वाटायची ती काय–अहो माझा गण्यासुद्धां डगला–पट्टा चढवला कीं यांच्यापेक्षां–पण जाऊं द्या. साहेब म्हणजे साहेब ! आपल्याला काय करायचें ?"

महादबानें एक सुस्कारा टाकला पण त्यांत दुःख वगैरे कांहीं नव्हतें. पूर्ण स्वास्थ्याचाच सुस्कारा होता तो. 'कुच फिकीर नहीं' असा विचार त्या सुस्काऱ्यानें त्यानें व्यक्त केला. आपले साहेब रुबाबदार असावेत, सामर्थ्यवान् असावेत, दरारा उत्पन्न करणारे असावेत ही त्याची हौस पाहून मला मोठें कौतुक वाटलें ! हमाली तर खरीच पण ती मग चांगल्या, मालकीचा रुबाब

असलेल्या मालकाची तरी असावी अशी ती वृत्ति होती. मालक आपली मालकी सोडून वागूं लागले म्हणजे त्यांच्या नोकरांचा गोंधळ होतो. शिपायाचा खरा आनंद साहेबाच्या साहेबीपणांत असतो. महादूची तक्रार एवढीच होती कीं, नवे साहेब फार किरकोळ आहेत.

जरा वेळानें तो म्हणाला, " माझें एक काम करतां साहेब ? "

" काय सांग तर खरं ? "

" मला आपल्या नव्या साहेबांचा फोटो द्या ना आणून ! "

मला त्याची विनंति मोठी मजेदार वाटली.

" कशाला रे ? "

" पाहायचें का तुम्हाला कशाला तें ! चला माझ्या घरीं. "

मी महादूच्या झोंपडींत गेलों. तेथें भिंतीवर एक फोटो लावलेला होता. महादूनें तो खालीं काढला.

कॉलेजचे कांहीं प्रिन्सिपॉल भोंवतालीं व मध्यें महादूचा फोटो होता.

" याच्यांत बसवायचाय् फोटो ! " महादूला माझ्या आश्चर्याची कल्पना आली होती व तो कांहींही बोलला नाहीं.

"वा ! महादू, या प्रिन्सिपॉलच्या पंचायतनांत तूंसुद्धां प्रिन्सिपॉल दिसतोस कीं ! "

" नाहीं. तसा घोटाळा होऊं नये म्हणून खालीं लिहून घेतलें एका साहेबाकडून. "

फोटोच्या खालीं लिहिलें होतें–' साहेब आणि शिपाई ! '

महादू म्हणाला, " असें किती केलें तरी साहेब तो साहेब आणि शिपाई तो शिपाई. "

# पुढें व्हा–आलोंच !  ४

अकस्मात ‘ तो ’ ही पुढें जात आहे.—श्री समर्थ.

एक दिवस माझ्या एक तरुण मित्राचें ( म्हणजे ‘ गोपीनाथ ’ नव्हे–आणखी एक ! ) एका मोठ्या ठिकाणीं एका गंभीर विषयावर दणदणीत व्याख्यान ठरलें होतें. ज्या जागीं तें व्याख्यान ठरलें होतें ती जागा म्हणजे एक संस्थाच होती. मोठमोठीं व लहानलहान माणसेंहि तेथें व्याख्यान देण्यास व ऐकण्यास येत असें त्या स्थानाचें माहात्म्य होतें. त्या स्थानमाहात्म्याच्या ‘ भांडवलशाही ’ वृत्तीवर भयंकर संतापलेला असा एक माझा विद्वान् मित्र-सुद्धां त्या स्थानदैवताच्या आमंत्रणाची मिष्किलपणें ‘ सुप्त ’ इच्छा बाळगून होता.

त्या जागीं व्याख्यान देणें ही एक मोठी महत्त्वाची व मजेदार गोष्ट समजली जात होती. अगदीं चांगली सणसणीत विद्वत्ता दाखविण्याची तेथें सोय असे.

माझा मित्र प्रचंड तयारी करीत होता व मी माझ्या दप्तरांतील कांहीं ‘ अनुकूल ’ सुभाषितें त्याला निवडून देऊन बौद्धिक साहाय्य करीत होतों. दुपारभर त्यानें खूप श्रम केले. ५॥ वाजतां तो व्याख्यानास जाण्यासाठीं माझ्याकडे आला, त्यावेळीं त्याच्या चेहऱ्यावर अगदीं स्पष्टपणें विद्वत्तेचें मंद तेज दिसूं लागलें होतें. ६ वाजतां व्याख्यानाची पहिली ठिणगी उडणार होती.

‘ चल रे लवकर ! ५॥ झालेत. ’ माझा विद्वान् मित्र बसायला सुद्धां

तयार नव्हता. काठोकाठ भरलेलें भांडें घेऊन जातांना माणूस जसा अगदीं जपून चालतो तसा तो त्यावेळीं वाटला. बोलत राहिलों तर सांठवलेली विद्वत्ता हिसळून सांडेल कीं काय अशी त्याला भीति वाटत असावी.

मी अगदीं सहज त्याला म्हणालों—

'तूं पुढें हो. मी आलोंच!'

जरा राग आला त्याला. मला तो कांहीं अध्यक्ष म्हणून बोलवायला आला नव्हता. पण मीं तसें सांगितलें खरें आणि तोहि व्याख्यानाच्या जोरांत असल्यानें निघून गेला. मला काम तसें कांहींच नव्हतें. त्याचें व्याख्यान एवढेंच त्या दिवशींचें काम होतें. पण तरी माझ्या तोंडांतून शब्द निघून गेले.

'पुढें हो-आलोंच!'

तो पुढें गेला. पण फार पुढें गेला. तो गेला त्यावेळीं सभास्थानीं १-२ माणसें होतीं. तीं मनमोकळेपणानें वक्ता व विषय याविषयीं बाचाबाची करीत होतीं. माझ्या मित्राला इतकें पुढें आल्याबद्दल जरा वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. निघतांना त्याच्या डोळ्यासमोर म्हणजे अंतश्चक्षूसमोर निराळेंच चित्र होतें—

—एक तास आधीं लोक आलेत. हाऊस फुल्ल आहे. वेळ झाली आहे. लोक अधीर झाले आहेत. आले-आले! नाहीं नाहीं! अशी हूल मधून मधून उठते आहे. आणि मग जेहेत्ते आपण आंत शिरत आहोंत. 'ते पहा! हे पहा' असे आवाज ऐकूं येत आहेत व अंगुलिनिर्देश दिसत आहे.

पण तसें झालें नाहीं. उलट त्याच्या अति पुढें येण्याचा परिणाम निराळाच झाला.

मी मागाहून आलों त्यावेळीं एका कोपऱ्यांत लोक कुजबुजत होते.

'काहो आले नाहींत अद्याप श्रीयुत?' आणि माझे मित्र श्रीयुत तर अर्धा तास तेथें बसले होते.

अति पुढें येण्याचा परिणाम!

महत्त्वाचीं माणसें कधीं एकदम पुढें चालूं लागायचीं नाहींत. तीं नेहमीं म्हणतात—

‘ पुढें व्हा–आलोंच ! ’

एखाद्या सभेच्या व्यवस्थापकांना याचा फार चांगला अनुभव येतो. आमंत्रण न दिलेलीं माणसें आधीं येतात. सभागृह एखाद्या वेळीं भलत्याच माणसांनीं भरून जाण्याची वेळ येते. आणि चिटणीस त्या प्रसंगाच्या नात्यानें ‘ महत्त्व ’ आलेल्या शिष्टांकडे व्याकुळ होऊन खेपा घालीत असतात.

‘ अहो, चला ! अगदीं वेळ झाली ! ’

तरी ते म्हणतील, ‘ पुढें व्हा–आलोंच ! ’

शेवटीं आपण त्यांना पुढें घातल्याखेरीज ते येत नाहींत. म्हणून तांतडीच्या निरोपाची भाषा ठरून गेली आहे.

‘ त्याला पुढें घालून ये ( किंवा या ) ! ’

समजा, येणारा प्रत्येक निमंत्रित असें म्हणूं लागला कीं, ‘ पुढें व्हा–आलोंच !’ तर शेवटीं आधीं आणि पुढें येणार तरी कोण ?

पण असें होत नाहीं हें किती चांगलें आहे नि सोईचें आहे.

कारण ‘ पुढें व्हा–आलोंच ’ असें सांगणारा फार कामांत असतो किंवा यावयास नाखूष असतो असें सहसा होत नाहीं. आमच्या पुण्यास तरी असें आहे ! बृहन्महाराष्ट्राचें कोणास ठाऊक !

यावयाचीं माणसें यावयास, सभारंभस्थानीं जाण्यास माझ्या वरील मित्रा-इतकीं–अगदीं माझ्याइतकींच उत्सुक असतात. पण ती उत्सुकता दिसली तर बोलावणारा काय म्हणेल ? आमंत्रणाचें आपणास कांहीं महत्त्व नाहीं. आपण काम-गार लोक ! वेळ आहे कुठें ? असें त्याला दाखवून, मग जाऊन जायचें, पण उपकार करीत जात रहावयाचें, यांत मोठेपणा आहे, यांत शिष्टपणा आहे, यांत व्यक्तित्व आहे अशी साधारणतः येऊं घातलेल्या माणसाची कल्पना असते.

माझ्या ओळखीचे कांहीं लोक वेळेवर न येण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. ते अतिशय लवकर येतील किंवा अतिशय उशिरां येतील. पण वेळेवर नाहीं यायचे ! अगदीं रिकामे बसलेले असतात, कोटटोपी घालून बसतात पण बोलावणं गेलं कीं म्हणतील—‘ पुढें व्हा–आलोंच ! ’

त्यांपैकीं एक गृहस्थ दुसऱ्या बोलावण्याला माझ्याबरोबर घराबाहेर सुद्धां पडले पण चालतां चालतां एकदम एका बोळाकडे बोट करून म्हणाले,

"अहो, तुम्ही जरा पुढें व्हा. मी या पलीकडल्या घरांत एक निरोप—नागपूरचे प्रोफेसर आलेत एक—माझे मित्रच—आलोंच !"

असा संताप आला मला! माझ्या डोळ्यासमोर तो गृहस्थ बोळांत शिरला. घाईघाईनें चालूं लागला ! पुन्हां चाल संथ केली त्यानें.

मी कंदिलाच्या खांबाच्या तिथेंच बोळाच्या तोंडाशीं उभा राहिलों. कारण मला पुढें जायचें नव्हतें. त्यांना पुढें घालून न्यावयाचें होतें.

मी पहात होतों. कोणत्या घरांत शिरतो हा आमचा सभ्य ! पण मी अगदीं चकित झालों शेवटीं—

तो गृहस्थ कोणत्याही घरांत शिरला नाहीं. बोळाच्या तोंडापर्यंत तो अगदीं हळू हळू गेला. नंतर मागें वळला व जोरांत परत येऊं लागला.

पुन्हां बोळाच्या तोंडाशीं मी भेटलों तर बिचारा खजिल होईल म्हणून मी मात्र तेथून सटकलों. अत्यंत वेगानें चालते स्वारी माझ्यापुढं येऊन पोहोंचली!

मी मात्र मनांत आश्चर्य करीत होतों कीं कोणी मित्र नाहीं—नागपूर नाहीं—प्रोफेसर नाहीं. या गृहस्थाला वेळेवर येण्यांत कमीपणा वाटत होता एवढेंच. तेवढ्यांत बोळांत रेंगाळला पण माझ्याबरोबर आला नाहीं. आणि मला सांगतो—" पुढें व्हा–आलोंच !"

वेळेवर जाण्याची वेळ ठरलेली असते, पण " पुढें व्हा–आलोंच " या पद्धतीनें जाण्याची वेळ मात्र ठरलेली नसते. मोठेपणा दाखविण्यासाठीं बरोबर किती उशिरां जावें, कितव्या बोलावण्याला निघावें वगैरे गोष्टी एखाद्यालाच जमतात ! तेथें पाहिजे जातीचें ! आणि म्हणून सभेला पुष्कळसे लोक सुरवातीच्याही आधीं येतात ही किती सोय आहे. तेही आपापल्या मित्र-मंडळींत 'पुढें व्हा–आलोंच' असें टक्कापाणी खेळतच असतात. पण शेवटीं येतात बिचारे ! नाहींतर सभास्थानाच्या वेळीं अध्यक्षांच्या स्वागतासाठीं उभें राहण्यासाठीं माणसें कशीं मिळालीं असतीं ?

पण 'पुढें व्हा–आलोंच' ह्या फॅशनचे प्रयोग सगळ्यांनाच जमत नाहींत. समारंभाची आपली उत्सुकता, आमंत्रण स्वीकारण्याचा हुरूप कोणत्या

मर्यादेपर्यंत दडपून ठेवावयाचा, किती सोडायचा, कोठें सोडायचा हें बरोबर जमलें तरच मोठेपणाचा प्रयोग सिद्ध होतो. नाहींतर—अति पुढें येण्यानें आपल्या येण्याची किंमत आपल्याच तोंडावर कळण्याचा प्रसंग येतो.

" पुढें व्हा ! " हें म्हणण्यांत पुष्कळ प्रसंगीं भेकडपणाही झाकण्याचा हेतु असतो. " लढनेकु तुम " अशांतली वृत्तीही या उद्गारांत कांहीं वेळां दिसते. खरे धडाडीचे वीर ' पाहूं बरें कोण पुढें पळे तो ' असें आव्हान देत नेहमीं दोन पावलें पुढें असतात. पण रंगमहाली राजकारण करणारे, अभ्यास–निरीक्षण करण्याच्या रुबाबांत ' पुढें व्हा–आलोंच ' म्हणून कातडी बचावीत असतात.

एखाद्या प्रसंगीं आपल्याला हजर राहण्याची इच्छा नसली आणि बोलावणें तर आलेलें असलें तर असभ्यपणानें ' येत नाहीं ' असें सांगण्यापेक्षां " पुढें व्हा–आलोंच " असें सांगून जाणें टाळतां येतें. उदाहरणार्थ—पण नको. मी स्मशानयात्रेचें उदाहरण सांगणार होतों.

आपण सभेला हजर होतों हें लोकांना कळूं नये अशी कांहींची हौस असते. सभेला तर जायचें, शेवटपर्यंत हजरहि रहायचें. पण व्याख्यान ऐकायचें नाहीं. वाळूंत किंवा गवतावर ' स्काउटिंग ' करीत हिंडायचें असा त्यांचा कार्यक्रम असतो. असे लोक आपल्या मागून येणाऱ्यांना पुढें जाण्यासाठीं वाट देऊन सांगतात, ' पुढें व्हा ना ! '

म्हणजे सांगण्याचा अभिप्राय असा–" आम्हांला हें कांहीं नवीन नाहीं. आम्हीं XXचीं व्याख्यानें लहानपणापासून ऐकलींत. सगळं माहीत आहे काय सांगणार आहे तो तें ! "

असले हौशी श्रोते " पुढें व्हा " म्हणून दुसऱ्याला लोटण्यांत त्याला बावळट ठरविल्याचें समाधान मानीत असतात !

एकंदरींत समाजांत मोठेपणा दाखविण्याचा " पुढें व्हा–आलोंच " हा एक मंत्र आहे.

जो तो दुसऱ्याला दटावीत असतो—" पुढें व्हा–आलोंच ! "

बरोबर येणारे साक्षीदार, जोडीदार असे जरा कमीच. कार्यकर्ता तेवढा आघाडीच्या धामधुमींत आरोळ्या मारीत असतो. लोक त्यालाही सांगतात– " पुढें व्हा–आलोंच ! "

नवखा कार्यकर्ता यानें निराश होतो पण अनुभवी माणूस आपली चाल थांबवीत नाहीं. कारण त्याला माहीत असतें कीं, सगळे आपल्या पाठोपाठ येणार आहेत. कारण समर्थांचें वचन आहे ! ( समर्थ म्हणजे समर्थ ) ! " पुढें व्हा–आलोंच ! " असें म्हणून आढेवेढे घेणारा—" अकस्मात 'तो' ही पुढें येत आहे. " हें कार्यकर्ता जाणतो, व्यवहारी माणूस जाणतो, सभेचा चिटणीस जाणतो. माझा वरील मित्रहि हें ओळखूनच पुढें गेला !

तरी पण आपलं म्हणण्याची रीत आहे—" पुढें व्हा–आलोंच ! "

# प्रगति, उन्नति, वगैरे ५

(१) "सुज्ञ भर्ते हो ! या विषयाकडे लक्ष देऊन आपल्या प्रिय पत्न्यांचें दुःख निवारण कराल तर त्या शरीरानें निरोगी, सुदृढ आणि सुखी होऊन तुम्ही व तुमची संतति सुखी व्हाल."

(२) इतक्यांत त्याची मुलगी रागाच्या आवेशानें बाहेर येऊन म्हणते, "काळच जर आपला प्राण घेत आहे तर सर्व जगमात्राचें भय गेलें. त्या दुष्टास (आपल्या बापास!) एक शिवराई दिला तर मी माझा प्राण देईन. त्याचें मुखावलोकन देखील मी यावत् जन्म करणार नाहीं. माझ्या पूर्वकर्मानुसार त्यांचे पोटीं यावें लागलें. त्यापेक्षां एक दगड झालें असतें तरीही—अशा चांडाळ बापास याहूनहि अधिक पारिपत्य असावें. याला बाप म्हणण्यास सुद्धां मला वीट येतो. या पोटच्या मांसाचा विक्रय करणाऱ्याचा निर्वंश होऊन यास नरक भोगावा लागणारच असा ईश्वरी संकेत आहे."

शेजारच्या खोलींत कोणी तरी वरील मजकूर जोरजोरानें वाचीत होतें. माझी कल्पना होती कीं 'कुंकू' बोलपटाचें पुस्तक आहे बहुतेक! कारण सुज्ञ भर्ते हो म्हणजे 'नवऱ्यांनो' हें संबोधन, स्त्रियांचा कैवार, बापाला चांडाळ वगैरे शिव्या, कन्याविक्रय—खास अगदीं आधुनिक मजकूर आहे. 'कुंकू' मधील नीरा बहुतेक संतापून बोलत असेल. निदान दुसरी एखादी पुरुष लेखकाची कादंबरी असेल. कारण स्त्रियांचा कैवार पुरुषांइतका स्त्रियांनीं सुद्धां कधीं घेतला नाहीं.

मग मीं जेव्हां शेजारच्या दोस्तांना विचारलें, "काय हो ! कोणतं पुस्तक आहे ?" "नवीन नाहीं. जुनं आहे अगदीं !" "वा ! अन् विचार तर ?" "कोणते विचार ?" "तुम्ही आतां वाचीत होतां ते ?" "हें पहा !"

मी तें पुस्तक पाहिल्यावर अगदीं सर्द झालों. अत्यंत फाटका पुट्ठा, विविधज्ञानविस्ताराच्या बांधलेल्या अंकासारखा आकार, पिवळट कागद !

आणि नांव पाहिलें तर--

श्री.

विविधज्ञानविस्तार

कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां

पुस्तक १ लें–जुलै १८६७

जुलै १८६७ म्हणजे विविधज्ञानविस्ताराचा १ ला अंक होता तो ! पण मला किती आधुनिक वाटला तो. ७० वर्षांपूर्वीं सुद्धां लोक हेंच लिहीत होते या विचारानें फार वाईट वाटलें. पूर्वजांबद्दल पुन्हां एकदां आदर तर वाटलाच कारण तें पुस्तक विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं छापिलें होतें ! मंडलीक म्हणजे रावसाहेब मंडलीक ! रावसाहेब रानडे, रावसाहेब मंडलीक, रावबहादुर गोपाळराव देशमुख. वा ! वा ! काय माणसें, केवढीं माणसें तीं !

पण मला त्यावेळीं वरील विचारांपेक्षां आधुनिक वाटणारे विचार १८६७ सालीं लिहिलेले सांपडावेत याचें वाईट वाटलें. कारण मग आम्ही लोक सांगतों तें नवीन नाहीं असें सिद्धच झालें. कारण वरील संग्रहांत अर्थशास्त्रावरसुद्धां लेख आहे. वंदेमातरम् गीताबद्दलचा लेख असाच आणखी एका जुन्या मासिकांत आहे ! मी मित्रांशीं बोलूं लागलों,

"काय 'मॉडर्न' होतीं त्या काळचीं माणसें नाहीं ?"

"कशीं काय ? अहो, त्यांच्याही अडचणी याच होत्या. अर्थात् संतापही तितकाच. त्यांत कसलें आहे मॉडर्न ! आतां हें कन्याविक्रयाचेंच घ्या ना ! तुम्हाला वाटलें 'कुंकू'च आहे. बायका कुंकू लावीत नव्हत्या त्याकाळीं सुद्धां मुली बापाच्या नांवानें असाच शंख करीत असतील. आणि आतां कांहीं

वर्षांनीं बायका कुंकवाचीं दास्यदर्शक चिन्हें पुसून टाकून विमोचन करतील, त्यावेळीं सुद्धां हे उद्गार ऐकूं येतीलच. कारण एखादा तरी बाप आपल्या मुलीचा विक्रय करणारा निघेलच आणि ती मुलगी याच शब्दांत आपल्या तीर्थरूपाचा उद्धार करीत राहणार ! ”

“ तसेंच भर्ते लोकांविषयींही होणार नाहीं का ? कारण नवरेबाजीची रूढी मोडतां मोडतां चळवळीच्या तडाख्यांतूनही कांहीं नवरे वांचतीलच व त्यांच्या बायकांचे हाल होणारच. तें पाहून १९८० सालीं सुद्धां एखादा लेखक नवरा असे उद्गार काढणारच कीं, ‘ अहो भर्ते हो ! आपल्या पत्न्यांना सुखी करा.’ मग प्रगति म्हणजे तरी काय हो ! आणि उन्नति म्हणजे तरी काय ? ”

“ वा ! अगदीं शुक शौनकादिकाप्रत प्रश्न करिते झाले अशा थाटांत विचारलेंत बुवा ! पण मी तितक्याच गंभीरपणानें सांगतों कीं, प्रगति हा शब्द ईश्वर, सत्य, धर्म, काव्य इत्यादि शब्दांइतका मोठा आहे. कारण त्याची व्याख्या करतां येत नाहीं. पण करतां येत नाहीं असें म्हटल्यावर आतां करावयाला हरकत नाहीं. आणि ती अशी कीं, समाजांतील कांहीं मूठभर शहाण्यांनीं लोकांना विसर पडलेल्या कांहीं गोष्टी पुन्हां एकदां करूं लागणें किंवा करण्याचा उपदेश करणें. पण जर का लोकांना एकदां कळलें कीं आपल्या धर्मांत पूर्वीं हें होतेंच तर मग मात्र प्रगति, उन्नति, उत्साह हीं तेथल्या तेथें गारठतात.”

“ पण आतां या पुस्तकाचेंच उदाहरण पहा. माझी तर खात्री आहे कीं आपण आज बोलतों ते प्रगतीचे उन्नतीचे सर्व विचार, अगदीं शब्दन् शब्द जुन्या काळच्या ग्रंथांतही सांपडतील. काय ? तुम्हांला नाहीं असेंच वाटत ? तुम्ही जुनें बरेंच वाचतां म्हणून विचारतों. ”

“ सांपडतील का ? सांपडतातच ! अगदीं प्रगतीच्या पुढाऱ्यांना माहीत असतात. पण ते लोकांना कळले तर समाज–पुरुषाचा उत्साह मावळतो ना ! त्याची वाट काय ? समजा बालविवाह ऋग्वेदांत रूढ होते असें सिद्ध झालें तर लोक लगेच म्हणतील, ‘ होते ना ? मग पहा. काय वाईट झालें त्यांचें ? त्यांच्यांतूनही साहेबाला वाकवणारे ऋषि निघाले ना ? मग असूं द्या जें आहे तें तसेंच ! ’

“ बरें प्रौढविवाह, प्रेमविवाह, गांधर्वविवाह महाभारतकालीं होते असें सिद्ध केलें तरी तेच लोक पुन्हां म्हणणार–‘ मग लेकांनो, आमचेंच आम्हांला

काय सांगतां ! आम्हांला माहीत आहे सगळें ! तुम्ही वाचा. तुमचें वाचन राहिलें आहे. आम्ही तर त्या भगवत्लीलांचें, व्यासवाल्मिकींचें श्रवण, मनन, वाचन करीतच आलों आहों.'

"म्हणजे जुन्याचें अतिसंशोधन प्रगतीला घातक आहे. निदान जुन्या काळचें चांगलें असेल त्याचा फारसा उच्चार करूं नका. केलाच तरी व्यास, वाल्मिकी, पंचकन्या, कीं लगेच एकदम झांशीवाली, आर्यावर्त, अन् एकदम वंदे भारतम् इतका मोघम उल्लेख करावा असें शास्त्र दिसतें. नाहींतर बापसे आपण सवाई आहोंत हा आनंद बेट्यांना कसा मिळणार!"

"अगदींच प्रतिगामी दिसतां कीं !"

"नाहीं नाहीं ! चुकतां तुम्ही ! जुन्या पुस्तकावर जाऊं नका. जुन्या समाजावर हल्ला करायचा असला तर माझ्यासारखे संशोधकच उपयोगीं पडतील. आम्हांला दुखवूं नका ! उतारे काढून कोण देईल आमच्यावांचून ? तुमचें प्रगतीचें काम चालू द्या. तुमच्यासारख्यांनीं इतकें चिकित्सक राहणें चांगलें नाहीं. कारण नाहींतर नाविन्याचा तुमचा हुरूप जाईल ना ? प्रगति म्हणजे काय ? विसरलेल्या मार्गावर पुन्हा गति ! अहो म्हटलेंच आहे ना–चक्रनेमिक्रमेण ! तेव्हां सांगतों काय ! तुम्ही जा आपल्या प्रगतीच्या वाटेला—तोंपर्यंत मी हा ग्रंथ चाळतों. कारण मला जुने आधार काढल्याशिवाय विद्वत्ता व संशोधन दाखवतां येणार नाहीं."

"वा म्हणजे तुमचीही प्रगतीच चालू आहे तर !"

"अर्थातच. 'उन्नतिचा ध्वज उंच धरा रे !' म्हटलंच आहे ना केशवरावाच्या मुलानें !"

मीं खोलींत परत येतां येतां म्हटलें,

"हल्ला नेण्या त्वरा करा रे !
आवेशानें गर्जत हर हर !"

# अत्यंत खाजगी

६

रात्रीं ९।–९॥ वाजले असतील. पावसाळयाचे दिवस होते व मी पुण्याचा पावसाळा अनुभवीत होतों.

पुण्याचा पावसाळा !—पुणेकरांखेरीज कोणाला न कळण्यासारखा विषय आहे तो. पुण्याचें हवामान मोजून किंवा घाटमाथ्यावरील उंची किंवा पावसाच्या नळकांड्यांतील थेंबाच्या स्तंभाची उंची मोजून फार तर पावसाचे फूट-इंच मोजतां येतील, परंतु त्यावरून पावसाचें स्थानिक स्वरूप कळणार नाहीं. पुण्यांत पाऊस पाडण्यासाठीं आभाळांत जमलेले ढग पाहिले कीं एका प्रचंड जलप्रलयाची तयारी चालली आहे असें वाटतें. भूतलावर जणूं काय आग लागली आहे व ती विझविण्यासाठीं वरुणराजानें हे आगीचे बंब पिटाळले आहेत असें वाटतें. पण हे ढग खरोखरच आगीच्या बंबासारखे असतात. प्रचंड आरडाओरडा करीत आणि धावत पळत हे आकाशपंथानें धावूं लागतात व लोक त्यांच्याकडे आगीइतक्याच कुतूहलानें पाहूं लागतात. पण हे जलबंब एकत्र जमल्यावर आगीच्या बंबाप्रमाणेंच मग विचार करूं लागतात कीं "येथपर्यंत तर आलों, आतां पाणी सोडायचें कीं नाहीं !" आग समोर भडकत आहे, लोक पाणी मारीत आहेत, सामाजिक सहानुभूतीचा प्रचंड लोंढा त्या पेटलेल्या घरावर आदळत आहे—अशा गर्दीत कांहीं तमासगिरांशेजारीं आगीचा बंबही नुसता विचार करीत उभा असतो कीं "ही आग विझवावी कीं नाहीं ?"

पुणेरीं ढग तसेच डोक्यावर जमून बसतील, घाबरून सोडतील आणि विचार करीत बसून राहतील. व्यवहारीपणानें माणूस घराच्या छपराखालून निघतांनाच रेनकोट चढवून धोतर मांड्यांपर्यंत खेचून डोक्याला पारदर्शक रबराच्या पिवळ्या टोप्या चढवून सायकलवर बसतो पण शेवटीं बाहेरून पाणी पडावयाच्या ऐवजीं आंतून घामाच्या धारा सुरू होतात ! कारण ढग असतात पण पाऊस नाहीं असा प्रसंग येतो. पावसानें किंवा अगदीं स्पष्ट उन्हानें भिजलेलें पत्करलें पण रेनकोटानें आलेल्या घामानें भिजणें फार चीड आणणारें असतें !

आणि याचें कारण पुणेरी ढग ! एखाद्या वेळीं ओघळूं लागले कीं थंड पाण्याच्या मडक्याप्रमाणें ओघळतील, क्षणांत थांबतील, 'वाट चुकली वाटतं' अशा विचारानें आभाळांतून पळूं लागतील आणि १।२ तासांच्या आंत आपले काळे डगले बदलून, गुलाबी पोशाख घालून, सोनेरी किरणाचे तुरे खोवून पुन्हां पश्चिमदिग्वधूंच्या रंगमहालांत जणूं काय 'मॅरेज पार्टी'ला जमलेल्या पाहुण्यांसारखी गर्दी करूं लागतील.

त्यातल्या त्यांत शाळा सुरू होण्याच्या आधीं व सुटल्यानंतर घर व शाळा यांच्या दरम्यान हे 'मेघदूत' बहुधा हटकून गांठतात. घरांत असेपर्यंत लख्ख ऊन. जेवण करावें, सुपारी वगैरे चघळीत जरा स्वंथ करीत पडावें. धुतलेले कडक इस्तरीचे कपडे चढवावेत आणि "जातों हंऽ" असें म्हणत बाहेर पडावें तों घराच्या कोपऱ्यावर जलधारा ! अगदीं दारांत उभ्या राहिलेल्या 'आपल्या' माणसाचाहि चेहरा दिसत नाहीं इतक्या जलधारा ! आणि हें कोठपर्यंत ? आपलें नोकरीचें, सामाजिक इभ्रतीचें, बौद्धिक वैभवाचें, आर्थिक उत्पादनाचें, अधिकारप्रदर्शनाचें स्थान येईपर्यंत. हापिसांत शिरलें कीं सलाम करून पाऊस पुन्हां परत स्वर्गांत ! श्रीमंताच्या मुलांना शाळेंत पोचवावयास नेणाऱ्या गड्याप्रमाणें पाऊस आपली सोबत करतो ! पुन्हां शाळा सुटल्याबरोबर घरीं येतां येतां पावसाच्या धारांबरोबर नाचत नाचतच यावें लागतें. पुन्हां आपण आपल्या खाजगी दालनांत शिरलों कीं पाऊस पसार !

कदाचित् पावसाचें हें समग्र वर्णन नसेलही ! मला दिसलेली बाजू आहे ही ! पावसाळाभर कोरडे ठणठणीत राहिलेल्या लोकांचा अनुभव ही या प्रश्नाची 'दुसरी बाजू' असेल !

अशाच एका सायंकाळीं पावसानें भिजून मी घरीं आलों होतों. पावसांत भिजण्यासाठीं मीं कपड्यांचा एक ‘ सेट ’ ठरवून टाकला होता. तो दुसऱ्या दिवसासाठीं वाळवीत आणि पावसाशीं केलेल्या ‘ दोन हाताचें ’ वीरश्रीयुक्त अनुभव आठवीत मी बसलों होतों.

कोपऱ्यावर कंदिलाचा खांब होता व तेथें दोन गृहस्थ बोलत उभे होते.

“ अगदीं तुम्हांला म्हणून सांगतों. त्यानें निदान थोडा तरी सभ्यपणा धरायचा होता ? ”

“ पण याचा मला पत्ता नव्हता बुवा ? मी दाखवतों सगळें कळल्यासारखें, पण खरें सांगायचें म्हणजे मला त्याच्याबद्दल पहिल्यापासून जरा कसेंसेंच वाटत होतें. पण बोलायचें कोणाजवळ ? ”

“ खरें आहे ! अहो आपल्या घरांत चार भिंतीआड बोललें तरी वाडाभर पसरतें. तुमच्या घरीं यावें तरी तीच भीति ! तेव्हां तुम्हाला फिरावयास जाण्यासाठीं हांक मारली.”

पण मलाही तेवढ्यांत हांक ऐकूं आल्यानें मी घरांत गेलों. जेवण केलें, गप्पागोष्टी केल्या व पुन्हां खिडकीशीं आलों—

ते दोघे व तिसरा दिव्याचा खांब. त्याच ठिकाणीं कायम होते.

त्यांचा सूर तोच कायम होता. एका गृहस्थानें दिव्याच्या खांबाचा जरा टेकू घेतला होता. त्रिकोणाच्या कर्णाप्रमाणें तो उभा होता.

“ अर्थात् हें मी केवळ तुम्हांला म्हणून सांगतों. उद्यां जर चार लोकांना कळलें कीं हा गृहस्थ माझ्या मुलीचें डोकें चेपीत बसला होता तर लोक माझ्या तोंडांत शेण घालतील. कारण मी मोठ्या दिमाखानें लोकांना सांगत आलों आहें कीं हा माझा जुना, अगदीं बालमित्र आहे. ”

“ आणि तुमच्यासारख्याच्या मनालासुद्धां लागणारी गोष्ट म्हणजे तसलीच असली पाहिजे. कारण तुम्ही म्हणजे तसे उदारमतवादी आहांत. ”

“ पण उदारमतवादाला सुद्धां कांहीं सीमा आहे कीं नाहीं ? स्त्रियांचा मोह, सौंदर्याकर्षण हें काय आम्हांला माहीत नाहीं काय ? आपण काय सुंदर मुली पाहिल्या कीं राम राम म्हणूं लागतों ? पण घर आणि रस्ता यांत कांहीं

अंतर आहे कीं नाहीं ? घराचा उंबरठा आल्याबरोबर माणसानें चष्मा बदलायला पाहिजे. "

" मोठें कठीण आहे हो ! माणसाचा तोल केव्हां जाईल याचा नेम नाहीं. मी सगळ्या प्रसंगांतून गेलों आहें. नशीब म्हणून सुटलों. "

" म्हणजे ? तुम्हाला यांत कांहीं विचित्र वाटत नाहीं ? "

" विचित्रच काय–तिरस्करणीय सुद्धां वाटतें. मी सुद्धां १।२ सुंदर मुलींच्या सहवासांत राहिलेलों आहें. मनाचे चाळे नुसता बघत होतों. पण कधीं रेसभर सुद्धां चळूं दिलें नाहीं मन. "

" हा लेकाचा शिकला सवरलेला ना ? स्त्रियांचा कैवारी म्हणे ! माझ्या पत्नीच्या मनाच्या मोठेपणामुळें वांचला. तिला साध्वीला हें कांहीं कळत नाहीं. "

" पण मुलीला ? "

" तें विचारूं नका बुवा ! मी तर त्या बाबतींत विचारच करूं शकत नाहीं. मी तुम्हांला हें मुद्दाम कशासाठीं सांगितलें—तुमची व त्याची मैत्री आहे. दोन गोष्टी सांगून पहा त्याला. म्हणावें, माझ्या बायकोला आवडत नाहीं हें. माझें नांव नका सांगूं ! अगदीं नाजूक गोष्टी आहेत या. मला तर त्याचा खून करावासा वाटतो अगदीं पण—"

" पण काय ? "

" अहो उपकार घेऊन बसलों आहे त्याचे. माझें त्या × × बाईशीं वागणें चांगलें नाहीं असें मला सांगतो लेकाचा. अन् तूं रे ? बरं जाऊं द्या. पण कुठें बोलूं नका बरं. अत्यंत खासगी आहे हें ! म्हणून तर तुम्हाला रस्त्यांत थांबवून घेतलें. अहो भिंतीला कान असतात."

पण वर खिडकींत माझे दोन कान टवकारून ऐकत होते हें मात्र त्याला कळलें नाहीं.

त्या खांबाजवळ मीं किती रहस्यें अशीं बोललेलीं ऐकलीं आहेत. सगळें अत्यंत खाजगी ! एकएक प्रकारची चमत्कारिक उत्सुकता त्या खिडकीजवळ नेहमीं रेंगाळत असते.

पण त्याचा कांहीं नेम नसतो. कोणत्या क्षणीं त्या कोपऱ्यावर कुजबुज होईल हें सांगतां येत नाहीं. एखाद्या वेळीं त्याच खाजगी कोपऱ्यावर राजकारणाचीही चर्चा ऐकूं येते, एक वेडाही रडत बसतो किंवा कुत्रीं झोंपा घेतात.

पण त्यांतल्या त्यांत तसल्या पावसाळ्यांत पावसानें भिजलेले कपडे सुकवीत मी बसलों कीं, पावसाच्या त्रासानें जवळ जवळ मोकळ्या झालेल्या रस्त्यावर वरील सारखीं कांहीं ' खाजगी ' खांबाला टेकून रेंगाळत असतात. भुरभुर पाऊसहि पडत असतो. रस्त्यावर पाणी, थोडा चिखल, शांत वातावरण, मिणमिणते दिवे आणि असलें अत्यंत खाजगी—

पण थांबा, ही सगळी माहिती अत्यंत खासगी आहे. ती शोधण्याचा प्रयत्न करूं नका. कारण ती खासगी आहे. रस्ता सार्वजनिक असला तरी माणसें तेथें खासगी बोलतात. अगदीं अत्यंत खासगी !

# विलायत आणि विद्वत्ता ७

तो असा एक विचित्र माणूस होता कीं त्याच्याबद्दल भोंवतालच्या मंडळींत कोणती ना कोणती तरी नवीन बातमी उठलेली असे. आणि त्याचा व माझा परिचय झाल्यावर मला आणखी एक बातमी कळली कीं आपल्याविषयीं बातम्या उठविण्याचें तो स्वतःच पुष्कळसें करतो.

माजलेला बैल कोणी प्रतिस्पर्धी लढण्यास मिळाला नाहीं किंवा कर्तृत्वाला वाव मिळाला नाहीं म्हणजे शिंगांनीं माती उकरून समाधान मानून घेतो तशी त्या गृहस्थाची स्थिति होती. कोठेंही चार मंडळींत बसला कीं, त्यानें 'फूं' करून दोनचार बातम्यांची धूळ उडवलीच ! आणि त्या बातम्यांच्या धूलिकणांकडे लोक मग पहात बसत.

त्याची दुसरी एक या बाबतींतली हौस म्हणजे आपल्याविषयींची प्रत्येक बातमी नवीन पाहिजे. कालच्या व आजच्या बातमींत कांहीं संगति नसली तरी चालेल. पण दररोज बातमी ताजी पाहिजे. आपण उठविलेल्या बातमीवर भोंवतालचे लोक भाष्य करतांना ऐकण्यांत त्याला फार आनंद वाटे. त्याच्या मेंदूच्या लोण्यासारख्या मऊ भागाला कोणीतरी खाजवून गुदगुल्या करीत आहे अशा प्रकारचें सुख त्याला त्या प्रसंगीं वाटे ! आणि मग एकदां लोक ती बातमी चघळूं लागले कीं तो तेथें शांत निर्विकार चेहरा करून बसे. त्या बातम्या अद्भुत असावयाच्या. लोक तर थक्क व्हायचेच आणि मग हा सांगायचा—

"तसें कांहीं नाहीं हो! अगदीं सहज! मला कांहीं त्यांत विशेष वाटत नाहीं! आणि माझें तसें नक्कीही कांहीं नाहीं!"

पुन्हां एकदां लोक आश्चर्याचा धक्का खाऊन गप्प बसायचे!

अगदीं त्याची थाप सांगतों—

वर्तमानपत्रांत आलें आहे ना—येथील एका कॉलेजांतील प्रोफेसरांचें कथानक एका प्रसिद्ध सिनेमा कंपनीनें घेतलें आहे!

त्यानें हें वाचलें! त्याची नवी बातमी उठवण्याची गरज त्या बातमींत भागवण्याचें त्यानें ठरविलें.

कांहीं दिवसांनीं त्या प्रोफेसराच्या कॉलेजचें नांव प्रसिद्ध झालें.

त्यानें बातमी उठवली—खोटें आहे तें! मला त्या कॉलेजचे प्रिन्सिपाल भेटले होते. त्यांना नुसतें विचारलें मात्र—भयंकर संतापले ते—आणि तावातावानें बोलूं लागले: 'मी त्या संपादकाला नोटीस देतों! तुम्ही एकादा लेख लिहाल का सणसणीत? आमचें कॉलेजच्या ध्येय व घटना यांची माहिती द्या! सेवा, सेवा आणि त्याग हें आमचें स्लोगन—नव्हे, मॉटो—आहे ना? येथें स्वार्थत्यागी लोक आहेत. दिलेल्या पगाराखेरीज जादा पैसाही मिळवावयाचा नाहीं असें त्यांचें व्रत आहे. रस्त्यांत पडलेलाही पैसा ते उचलीत नाहींत! आपल्या गुणांचा ते बाहेर कोठेंही उपयोग करीत नाहींत. त्यांची विद्वत्ता कॉलेजच्या बाहेर कोणालाही कळणार नाहीं, इतके ते संस्थेचे एकनिष्ठ सेवक आहेत. आणि असें असतांना सिनेमाचा कथानक लिहिणारा आहे होय येथें?—'

आणि नंतर तो थापेबाज म्हणाला: "तेव्हां तें तर कॉलेज नव्हेच! पण प्रोफेसर आहे हें नक्की!"

त्याचे श्रोते म्हणाले—"मग काढा ना तेवढी बातमी!"

"अहो, काढायची काय? मला कळली आहे. पण इतक्यांत नाहीं सांगत!"

तीन दिवसांनीं त्याच्याबद्दल एक नवी बातमी उठली—'अरे, कलकत्त्याला जाणार आहे म्हणे तो! न्यू थिएटर्सनें बोलावलें आहे त्याला. तो मॅट्रिकच्या वेळीं कलकत्त्यास होता. त्यावेळीं तो आंधळा 'डे' रात्रंदिवस त्याच्या खोली-

जवळ गात बसे. त्याची व याची मैत्री ! आतां ‘ डे ’ नेंच त्याला बोलावणें पाठवलें आहे. ’

—नंतर त्यानें आणखी एक बातमी उठवली. ‘ नितिन बोसच इकडे येणार आहे. त्याला भेटायला मुंबईस जातों आहें. ’ नशीब आहे बुवा !

—आणखी एक बातमी ! दरम्यान तो मुंबईस जाऊन आला.

—“ चित्रपट ठरला. मक्केचे कांहीं देखावे पहायला आणि आल्प्स पर्वताचे कांहीं शॉट्स घ्यायला तो विलायतला जाणार आहे. ”

त्यानेंच उठवलेल्या बातम्या या ! ‘त्या’ प्रोफेसरांबद्दल ‘त्या’ कॉलेजबद्दलही तो मधूनच बातमी उठवी—

“प्रोफेसर आहे हें नक्की ! पण न्यू थिएटर्स नाहीं ! नंगा पर्वत प्रॉडक्शन !”

म्हणजे या बातम्यांच्या मारामारींत त्यानें त्या बातमींतील प्रोफेसराला नंगा पर्वतावर पिटाळलें—स्वतःचें नांव न्यू थिएटर्समध्यें गुंतवलें—विलायतची बातमी उठवली—

आणि एक दिवस वृत्तपत्रांत त्यानेंच पाठविलेला मजकूर आला—

‘मी माझ्या अनेक मित्रांस न कळवितां गेल्या शुक्रवारच्या बोटीनें विलायतेस गेलों याबद्दल ते माझ्यावर फार रागावले असतील. त्यांनीं मला क्षमा करावी. पण मला माझ्या क्षुल्लक गोष्टींना प्रसिद्धि देणं हें आवडत नाहीं, इतकेंच नव्हे तर मी तें फार मोठें पाप समजतों. उद्दिष्ट कार्य यशस्वी झाल्यास सर्वांना आल्यावर भेटेनच.’

जो तो आश्चर्य करीत होता. त्याच्या परिचितांना बातम्या मिळेनाशा झाल्या. कित्येकांचा बोलण्याचा विषय तुटला आणि त्याचे दररोजच्या बैठकींतले ‘गण’ कांहीं तरी हरवल्यासारखा चेहरा करून हिंडूं लागले.

“ कोठें गेला बुवा ? ” याचा सारखा शोध चालू होता. त्याला नातलग असे कोणीच नव्हते. लोक विलायतचींही वृत्तपत्रें चाळूं लागले. विलायतहून आलेल्या लोकांना विचारूं लागले—‘ अहो आमचे मित्र पाहिलेत का हो ?’ आणि विलायतला जाणाऱ्यांना कोणी निरोप सांगत—‘कोठें भेटला तर कळवा !’

× × ×

तीन महिन्यांनीं तो एकदम त्याच्या पूर्वीच्या एका अड्डयांत आला.

" हो–हो ! ओ–हो ! अरे काय गृहस्था ! "

तो संथ उभा होता ! आनंदितहि होईना ! दुःखी तर नाहींच. पोशाख तसाच. दाढीसुद्धां अगदीं हिंदुस्थानांत काल केल्यासारखी. बूट देशीच. कपडे हिंदुस्तानमें बनेलो कापडाचे !

आणि इंग्रजी उच्चारांतूनही ' डी ' ' टी ' वगैरे पूर्वीसारखेच खोबळ उच्चार होतेच !

हा काय विलायतला गेला होता ?

कीं सत्याग्रह करून तुरुंगांत ' अ ' वर्गांत होता ?

कीं कोकणांत गेला होता ?

कांहीं फरक नाहीं, आणि हें काय विलायत !

पण मग त्यानें पुन्हां बातम्यांचा कारखाना सुरू केला—

' विलायतला गेल्यापासून माझ्यांत हा फरक पडला आहे. विद्वत्ता म्हणावी तर विलायतेंत. विद्वत्ता आणि अहंकार यांचें तेथें क्षणभर जमत नाहीं. अहो, एक दिवस वेस्ट मिनिस्टर पुलावर एच्. जी. वेल्स बुटाला टाच मारून घेत उभा होता ! चीत झालों मी. मला खरेंच वाटेना. मीं त्याची भेट घेतली. त्याला आर्यन सिनेमाला आपल्या कादंबरीचा चित्रपट लागल्याची हकीगत कळली होती. पण मी स्तुति करूं लागल्यावर रागावून ताडकन् निघून गेला. तसेंच बर्लिनला काय ! पॅरिसला काय ! क्रॉपचा कारखाना, आल्प्स्पर्वत, रोमचे पुतळे, लेनिनचें थडगें–सगळीं दृश्यें अद्याप डोळ्यांसमोर आहेत. मी गेलों होतों एका व्यापारी मित्राबरोबर दुभाष्या म्हणून ! पण हेतु होता रशियाची खरी स्थिति पाहून यावी. कांहीं नाहीं ! सगळें व्यवस्थित आहे अशी माझी खात्री झाली. विलायतला लोक विद्वत्ता वाढविण्यासाठीं जातात ते मूर्ख आहेत. मी गेलों विद्वत्ता विसरण्यासाठीं ! विलायतेचा आणि विद्वत्तेचा हा असा संबंध आहे. आपण मूर्ख आहोंत हें ज्ञान मी मिळवून आलों. नितिन बोसचें काम होतेंच ! पण मीं ठरवलें कीं आपण त्या योग्यतेचे नाहीं. विलायत म्हणजे विद्वत्ता ! त्या मानानें आपण कोठें आहोंत ?'

अशा त्याच्या हकीगती म्हणजे भूवर्णन भाग ३ चें रेकॉर्ड होतें!

आणि एक दिवस असें कळलें कीं, तो गोव्यास होता तीन महिने!

पण तो विलायतला जाऊन आला या त्यानेंच उठविलेल्या बातमीवर लोक इतके खूष आहेत कीं लोक त्याला विद्वान् समजूं लागले आहेत. एक नवा अध्यक्ष मिळाल्याचा उत्साह त्याच्या भोंवतालच्या समाजांत आहे.

कारण विलायतला गेला आणि आलाही. मग तो विद्वान् नाहीं हें शक्यच नाहीं! असा लोकांचा दाट समज आहे!

# माणूस आणि मांजर ८

“ माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे” असें माणसें म्हणतात. कदाचित् खरें असेल हें; पण मांजर हा माणूसप्रिय प्राणी आहे हें मात्र खरें असावें याबद्दल मला शंका नाहीं. माझ्या एका विद्यार्थिनीनें समाजप्रिय हा समास दोन तऱ्हांनीं सोडवला होता. (१) समाज ज्याला प्रिय असा जो तो; (२) समाजाला प्रिय आहे जो तो! मार्क देतांना माझा बराच गोंधळ झाला. पहिलें खरें कीं दुसरें खरें ? मला दुसरें इतकें खरें वाटलें नाहीं. कारण समाजापुरतें ठीक आहे, पण तसा ‘विग्रह’ समाजाला मान्य असावा असें मला पटेना. आतां मांजर माणूसप्रिय प्राणी आहे यांत मात्र दोन्ही विग्रह खरे ठरतील. माणूस ज्याला प्रिय आहे असाच मांजर हा प्राणी आहे. आणि माणसाला मांजर प्रिय असतेंच, नाहीं का ? मांजराची दूधवाटी ज्यांच्या घरांत आहे, पिस् पिस् करून मांजराला दूध पाजण्यांत मुलाचें कौतुक करण्याइतका आनंद जे मानीत आहेत असे मार्जारशौकी काय तुम्हा–आम्हांला माहीत नाहींत ? मांजराला माणूस प्रिय आहे हें तर माणसांना सुद्धां कबूल करावें लागेल. मला वाटतें आज हजारों वर्षें माणूस मांजराला हाकलीत राहिला आहे. दुधाबद्दल मांजर व माणूस यांचें भांडण नीति-अनीतीइतकें सनातन आहे. मांजरानें माणसाचा किती मार खाल्ला असेल याची कल्पना करा ! पण तरी सकाळीं टोला मारून घरांतून हाकललेलें मांजर पुन्हां दुपारीं निर्विकार गंभीर चेहरा धारण करून माणसानें दार

उघडण्याची वाट पाहत बसलेलें आढळेल. प्रयत्नवादी तर खरेंच बिचारें, पण प्रयत्नवादसुद्धां कांहीं तरी जिव्हाळयाचा तसाच जोर मागें असल्याखेरीज टिकत नाहीं. पोत्यांत घालून अगदीं गांवाबाहेर सोडून दिलेलें मांजर पुन्हां कांहीं दिवसांनीं त्याच घरीं परत येतें असा अनुभव असलेले एक गृहस्थ मला माहीत आहेत. अनुभवच म्हटल्यावर काय—तो कबूल करायलाच पाहिजे! त्याची कारणमीमांसा कांहींहि ठरो. आहे हें असें आहे!

आपलीं पिलें माणसाच्या घरांत निर्धास्तपणें ठेवून देऊन मांजरी आपल्या दैनिक फेऱ्या मारीत राहते. आणि मग माणसेंहि त्या पिलांचें कौतुक करण्याइतकीं खुशींत येतात. मांजरीला दुधाच्या कपाटाच्या आसपाससुद्धां माणसें फिरकूं द्यावयाचीं नाहींत. ताटाखालीं सांडलेला सुद्धां दूधभात मांजरीनें खाणें, कांहींना सहन होणार नाहीं. पण तींच माणसें त्या कोळशाच्या खोक्याजवळ 'म्यांव म्यांव' करणाऱ्या पिलांपुढें बशींत दूध घेऊन 'पिस्‌-पिस्' करीत त्यांना बोलावीत राहतात! कारण त्यांत दातृत्वाचा आनंद असतो, दयाळूपणाचा एक मजेदार अभिमान असतो. 'मी माणूस पण मांजराच्या पिलांनाहि दया दाखवण्याइतका मनाचा मोठेपणा आपल्यांत आहे' असें आपल्याला मनांतल्या मनांत वाटत असतें!

पण मांजरें पिलें आहेत तोंपर्यंतच हें प्रेम! त्यांचीं मांजरें होऊं द्या, कीं झाली शुक्‌-शुकूला सुरुवात! मांजराच्या गुबगुबीत पाठीवर एक जोरांत थापट मारण्यांत किती मजा वाटते!

माणूस व मांजर यांचे हे संबंध पाहूनच कुत्रा माणसापासून जरा दोन पावलें दूरच राहतो! 'अतिपरिचयात् अवज्ञा' हें कुत्र्याच्या मानी स्वभावाला सहन व्हावयाचें नाहीं. आतां त्यांतहि कांहीं 'लांगूनचालनवृत्ती'चीं कुत्रीं असतात हें निराळें! माणसांत नसतात का कांहीं नरपशू? तशीच कुत्र्यांतहि लोचट माणसांची वृत्ति दिसते.

तरी पण मांजरापेक्षां कुत्र्याबद्दल माणूस जास्त ऐट बाळगतो! मोठमोठे लोक मित्राऐवजीं 'टॉमी'ला, 'जॅक'ला बरोबर फिरायला नेतात! आणि कांहीं बायकासुद्धां!—कदाचित् त्यांना 'मेल्या आपलपोट्या पुरुषांचा' संताप येत असेल आणि इतर स्त्रिया तर अजून मागासलेल्या—रूढिपंकांत बुडालेल्या—वगैरे!

* * * *

वास्तविक कुत्र्यापेक्षां मांजराबद्दल जास्त आपुलकी वाटावयास पाहिजे. कारण सांगतों. आपल्या भोंवतालच्या माणसांविषयीं स्वतःच्या मनाशीं अगदीं गुपचूप, हळूच, खाजगी विचार करून पहा. त्यांत कुत्र्यापेक्षां मांजराच्या वृत्तीचीं माणसें आपणास जास्त दिसतील. माणसें कुत्र्यासारखीं लुडबुडत नाहींत, तीं मांजरासारखीं लुडबुडतात !

" काय हो काय चाललंऽय् ! " असा निरर्थक प्रश्न करीत आपल्या घरांत शिरणारे चाळींतले शेजारी-पाजारी—" काय हो गोविंदराव ! आहांत का ? " असें रस्त्यावरूनच पुकारणारे व हो-नाची वाट न पाहतां किंवा पर्वा न करतां अगदीं घरोबा दाखविण्यासाठीं तुम्हांला झोपेंतून जागे करणारे—असे लोक काय तुम्हा-आम्हाला माहीत नाहींत ? काय काम असतें त्यांचें ? त्यांना विचारा. ते म्हणतील, " कांहीं नाहीं. सहजच घरीं चाललों होतों. " खरें बोलतात ते; कांहीं काम नसतें. स्वतःच्या घरीं जाण्याचें कामसुद्धां त्यांना करायचेंच असतें असें नाहीं ! अहो, घरीं तरी काय आहे ? तुमचेंहि घरच आहे कीं ! पण स्वतःच्या घराचाही विसर त्यांना पडतो, इतकें का तुमचें व त्यांचें प्रेम असतें ? तुम्हीं जागा बदललीत—गोविंदराव गेले, भगवानराव आले. ते भगवानरावाला पुकारीत राहतील ! तुम्हीच पाहिजे असा कांहीं त्यांचा अट्टाहास किंवा हौस नसते. तुम्हांला कंटाळा असेल, काम असेल—अगदीं झोपेचें काम असेल. असेना ! त्यांनीं कुठें जायचें ? त्यांनीं काय करायचें ? ' सोंगें थोडीं नि रात्र फार ' असें त्यांचें झालेलें असतें. आयुष्यांत शिरणारें रिकामपण ते घरांत शिरलेल्या मांजराप्रमाणें सारखें तुमच्या आमच्या घरीं पिटाळीत असतात. तुम्ही त्यांना कंटाळलां असाल, मनांतल्या मनांत तिटकारा करीत असाल, पण त्यांचा त्याला इलाज नाहीं.

माणसानें अपमान केला, पिटाळलें तरी मांजराला तें मनावर घेऊन चालत नाहीं. कारण मांजर म्हणजे कांहीं कुत्रें नव्हे ! कीं घराची पर्वा न करतां ' शय्या भूमितलं दिशोऽपि वसनं ' अशा वृत्तीनें खुशाल भर रस्त्यांत घोरत पडेल ! तसेंच तुमचे आमचे ' ते ' मित्र म्हणजे कांहीं रस्त्यांतील भिकारी नव्हत, कीं दार लावल्यावर निघून जातील किंवा ' चल् ' म्हटल्यावर चालूं लागतील ! ' ते ' मित्र म्हणजे घरें असून निराश्रित, कामें असून निकामी, आणि अशा रीतीनें माणसें असून मांजरासारखे असतात !

बाजारच्या पिशव्या बरोबर घेऊन, मुलाला कपडे करायचे आहेत म्हणून त्यालाहि बरोबर घेऊन, ते घराबाहेर पडतात आणि तुमच्या घरीं स्वतःचें 'घर'च जणूं काय घेऊन येतात. कांहीं तरी बोलत रहातात, कांहीं तरी सांगत राहतात, हंसतात, खिदळतात आणि तुम्ही कामांत असलां तर गेल्या महिन्याचा किर्लोस्कर वाचीत गप्प सुद्धां बसतात. खूप वेळ घालवला, तुम्हीं आंघोळीला उठण्याचें रामबाण निमित्त केलेंत, कीं मग हळूच कंटाळून उठतात आणि 'दुपारीं घरींच आहांत ना ?' अशी खात्री करून घेऊन १२–१२॥ ला तुमचें घर सोडतात. पुन्हा दुपारच्या चहाला हजर ! त्यांनाच तेवढा रविवार घालवायचा असतो, त्यांनाच तेवढी सुटी घालवायची असते. मांजरापेक्षांहि जास्त माणूसप्रिय ! मांजरापेक्षांहि जास्त निःस्वार्थी ! चहा द्यायलाच पाहिजे असें नाहीं. तिरस्कार केलात तरी चालेल. 'जरा' बसूं द्या एवढेंच. अशा प्रसंगीं संसार उपयोगीं पडतो. बायकापोरें सोडवणुकीस येऊं शकतात. कांहीं तरी काम काढून 'खाजगी'च्या दालनांत पळतां येतें. पण पुन्हा बाहेर आलांत, दारें उघडलींत, खिडक्या उघडल्यात, कीं ते आहेतच. " काय भगवानराव, काय चाललंय् ?"

अशा माणसांपुढें तुमचें कांहीं चालायचें नाहीं. घरांत सोकावलेलीं मांजरें आहेत हीं, आणि मांजरापेक्षांहि तीं माणूसप्रिय आहेत. मांजर हा शब्द माणूस या शब्दापासून 'अपभ्रष्ट' झाला आहे असा कोणी शोध लावील काय ? निदान या मुद्द्यावर एक चर्चा पेटवून देऊन वाचकांचीं मतें गोळा करायला हरकत नाहीं !

# नव्या सालचा पाऊस ९

पाऊस ! मुसळधार पाऊस !! एकसारखी झड लागली आहे. गेल्या १२ महिन्यांचा जगाचा जुनेपणा धुवून काढण्यासाठीं स्वर्गांतली पवित्र गंगा आभाळांतून धावत आहे, नद्या दुथडी भरून चालल्याहेत आणि दोन्ही तीरावरचा खळमळ वाहून जाऊन नव्या सालचें स्वच्छ पाणी वाहत आहे. कांठावरच्या झाडाझुडपांचा पाचोळा आणि मरून गेलेल्या वेलींचे अवशेष सातासमुद्रांत वाहून गेले आहेत आणि नव्या हिरवळीला गवती फुलांच्या कळ्या आल्या आहेत. आपलें जुनें घरटें वादळांत वाहून गेलें म्हणून कोकिळा नव्या वर्षाचें नवें गाणें झाडाच्या उंच फांदीवर बसून गात आहेत. जगाच्या पहिल्या दिवशींच पवित्रता जगावर पसरली आहे. पक्षी नव्या वर्षाची नांदी गात आहेत.

भगवन् ! माणसांना तूं जबर शाप कां दिले आहेस ? भूतकाळाचें पाप त्यांना कधींच धुवून काढतां येत नाहीं. सर्व सृष्टि नव्यानें जन्माला येत आहे. पण माणसाच्या हृदयावर भूतकाळाचें दडपण वाढतच आहे. जुनीं पानें गळून जाऊन झाडांना नवी पालवी आली आहे. सर्व सृष्टीचें पाप तुझ्या अमृतधारांनीं धुवून जाऊन भूतकालाची आठवणही त्यांच्या देहावर राहिली नाहीं. परंतु आमचा गळा भूतकालांतून मोकळा होतच नाहीं ! आमच्या वर्तमानकाळावर भूतकाळाचें दडपण इतकें जबरदस्त वाटत आहे कीं आमचा भविष्यकाळही निराशामय दिसतो आहे. नव्या वर्षांत उत्साह वाटायच्या

ऐवजीं गेल्या वर्षीच्या दडपणानें निरुत्साह मात्र वाटतो. कृतकर्मांची राख आमच्यावर वर्षानुवर्षे सांचत जाते.

भूतकाळाचें ज्ञान, भूतकाळची आठवण राहाणें हा माणसाला ईश्वरी वर आहे असें चार लोक म्हणतात. माझ्या बालबुद्धीला वाटतें भूतकाळची आठवण हा शाप आहे. झाडांच्या नव्या पानांफुलांना जुन्या सडक्या पानांची आठवण राहात नाहीं पण आमचीं भूतकाळाचीं पापें आम्हांला धुवून काढतांच येत नाहींत. जगांतल्या सर्व सुंदर व पवित्र वस्तूंचा उपभोग घेऊन या जगाचा माणसांनीं नरक बनवला आहे! नव्या वस्तूंची जुनेपणांत राख व नाश करण्याचें काम आम्ही करीत आहोंत. तुझ्या या आनंदवनांत आम्हीं सारखी नासधूस चालवली आहे म्हणून या पापांची सारखी आठवण राहण्याची बुद्धि हा तुझा शाप तर नाहीं ना? नद्या आपला गाळ धुवून काढतात. आम्ही आमचीं गेल्या वर्षींचीं पापें कशीं धुवावीं? भोंवतालच्या निसर्गावर जन्म-काळची टवटवी आहे, आमच्यावर मात्र जवळ येणाऱ्या मृत्यूची प्रेतकळा वाढत आहे. भूतकाळांत डोकावून पाहण्याचें आम्हास धैर्य नाहीं. भविष्यकाळ तर अंधारमयच आहे! आमच्या आयुष्यांतला एकच आनंदाचा दिवस आणि तो म्हणजे तूं जग निर्माण केलें तो!

तुझें हृदय कृपेनें कांठोकांठ भरलेलें आहे! तुझ्या मूल्यवान् सृष्टींत आम्हीं केलेली नासधूस तूं मनावर घेणार नाहींस. तूं आईच्या ममतेनें आमच्या खोडकरपणावर पांघरूण घालशील आणि म्हणून या अमृतधारांनीं सर्व सृष्टीचा जुनेपणा धुवून तूं आमचें जग नव्या वर्षासाठीं सुंदर आणि आनंदमयच करून ठेवीत आहेस. तुझ्या कृपेचा पाऊस जगाला दरवर्षीं पवित्र करीत आहे.

असाच मुसळधार पाऊस जगावर पडूं दे. आमचें जग पुन्हां नवें कर! तुझें अंतःकरण आकाशाएवढें विशाल आणि महासागराएवढें खोल आहे. त्यांत आमचे प्रमाद वाळूच्या खड्यासारखे आहेत. त्यांनीं तूं क्षुब्ध होऊं नकोस! या जगावर कृपेचा अखंड वर्षाव कर!

# आचार आणि विचार १०

" Everything that glitters is not gold. "

मराठींतहि अगदीं समानार्थक अशी म्हण आहे कीं, " जें जें पिवळें दिसतें तें सगळें कांहीं सोनें नसतें. " परंतु पिवळेपणा हा सोन्याचा एक धर्म आहे हें तितकेंच खरें आहे. पिवळेपणाचा व सोन्याच्या सोनेपणाचा कांहींच संबंध नसता तर सोनें निराळ्या रंगांतहि असूं शकलें असतें. परंतु जें जें सोनें आहे तें तें पिवळें आहे असें आपण पाहतों. तेव्हां ह्या दोन वाक्यांची संगति अशी लावतां येईल कीं, पिवळेपणा व सुवर्णत्व ह्यांचा गुण व गुणिन् असा संबंध नसला तरी सोन्याची ती एक खूण आहे. पिवळेपणा हा सोन्यापुरताच व्यापलेला नाहीं. सोन्याखेरीज पितळ वगैरे धातूंतहि पिवळेपणा हा गुण आहे. पितळ व सोनें ह्यांना पिवळेपणा हा धर्म सामान्य आहे. एखाद्या वस्तूचे अमुक एक गुणधर्म म्हणण्याचें कारण, त्या गुणधर्माखेरीज त्या वस्तूचें अस्तित्वच संभवत नाहीं. ते गुणधर्म हे त्या वस्तूंचे घटक असतात. त्या वस्तूंचें अस्तित्व व ते गुणधर्म यांचा वेगळेपणा क्षणभरहि संभवत नाहीं. ज्यांना आपण गुणधर्म म्हणतों ते वस्तूपुरतेच मर्यादित असतात. इतर वस्तूंमध्यें ते गुणधर्म सामान्य नसतात. एखाद्या पदार्थाची व्याख्या करतांना असे विशिष्ट गुणधर्म असतील त्यांचाच समावेश केला जातो. पाण्याची व्याख्या करतांना तर्कशास्त्रांत ' थंड-पणा ' हा त्याचा गुणधर्म सांगितला आहे. ज्या ज्या ठिकाणीं शीतत्व आहे

त्या त्या ठिकाणीं पाणी आहे. पाणी व शीतत्व निराळें असूं शकत नाहीं. पिवळा कागद, पितळ व सोनें, हीं सारखींच पिवळीं दिसली तरी त्यांच्या गुणधर्मांत कमालीचा फरक असतो, व्यवहारांत आपणास हेंच अनुभवास येतें. सारखा पोषाख करणारीं, सारख्या वागणुकीचीं माणसें पुष्कळ वेळां दिसतात. परंतु आचारांत विलक्षण साम्य असलेलीं माणसें विचारांत तशीं नसतातहि.

प्रत्येक आचरण हें अनुकरणच असतें असें नाहीं. अनुकरणास सुरुवात आचारापासूनच होते. मूल आईचें अनुकरण करतें त्या वेळीं आईच्या विचाराशीं त्याचा संबंधहि पोहोंचत नाहीं, परंतु कांहीं आचार असे असतातच कीं त्यांचा विचाराशीं अत्यंत निगडित संबंध असतो. शारीरिक हालचालीवरून आपण आचार ठरवतों. विचार हे मानसिक व्यवहार असतात. डोळ्याची पापणी मिटणें, उघडणें, एखादा पदार्थ अंगावर येतो आहे असें वाटतांच डोळे मिटणें, वगैरे शारीरिक हालचाली अशा आहेत कीं, त्यांचा मज्जातंतूंशीं प्रत्यक्ष संबंध यावयाच्या आंतच त्या होतात. मेंदूकडून आज्ञा व्हावयाच्या आंतच त्या क्रिया होतात. विचाराशीं प्रत्यक्ष संबंध न येतां जे आचार होतात त्यांचा आपण ‘संवय’ या नांवानें उल्लेख करतों. परंतु सर्वच हालचाली अशा संवयी नसतात. संवयी या अनुकरणात्मक असतात. परंतु त्यांची सुरवात आचारापासून होत असली तरी आरंभीं त्या आचारविचारापासून जशा अलिप्त असतात तशा नेहमींच राहतात असें नाहीं. संवयींची सुरुवात शरीरापुरती मर्यादित असली तरी कांहीं दिवसांनीं त्यांचा विचारावर परिणाम होतोच. ज्या संवयींचा विचारावर परिणाम होत नाहीं त्यांना आपण अंधानुकरण म्हणतों. विचारापेक्षां आचार हे जास्त व्यापक आहेत, व त्यांचें महत्त्वहि जास्त मूलभूत आहे. आचाराचें श्रेय विचारावर परिणाम होण्यांत आहे.

यावरून असें दिसून येईल कीं, सगळ्याच आचारांना विचारांचा आधार असेलच असें नाहीं. परंतु विचारांचा आधार नसल्यामुळेंच केवळ ते आचार हीन ठरतात असें नाहीं. विचारावर परिणाम होणें व परिवर्तन होणें हें आचाराचें अंतिम पर्यवसान आहे. फळें येणें हें झाडाच्या वाढीचें अंतिम ध्येय आहे. परंतु फळें आलीं नाहींत तोंपर्यंत झाडें निकामी ठरत नाहींत. आचार विचार हा वाद असा अन्योन्य आहे. झाड आधीं कीं बीज आधीं

या वादाइतकाच हाहि प्रश्न गूढ आहे. कारण दोन्ही बाजू आपणास खऱ्या दिसतात. कांहीं विचारांचा आचारांपासून उगम होतो, तर कांहीं आचारांचा विचारांपासून उगम होतो. म्हणून अनुकरण हें मूलतःच त्याज्य किंवा दोषास्पद ठरवतां येत नाहीं. एखादा महात्मा पाहिला कीं त्याच्या विभूतिमत्त्वाचा आपल्यावर इतका व्यापक परिणाम होतो कीं, आपले आचारविचार कांहीं काळपर्यंत त्या विभूतीनें व्यापले जातात. अशा वेळीं आचार व विचार या दुहेरी मार्गानें अनुकरणास सुरुवात होते. त्या विभूतीच्या विचारांचा आपणांस परिचय नसला तरी त्या विभूतीच्या आचारांचाच आपल्या विचारावरहि परिणाम होतांना दिसतो. त्या विभूतीच्या आचारांचें अनुकरण करतांना आई-बाप किंवा शिक्षक सांगतात म्हणून मुलें कांहीं गोष्टी करतात. सकाळीं उठण्याची संवय, खरें बोलणें, वगैरे आचारधर्म या सदराखालीं येतील. या आचारांचे परिणाम पुढें पुढें मुलांच्या विचारांत दिसून येतात. धर्मामध्यें नित्यकर्मे ज्यांना म्हणतात त्यांचा हेतु हाच असावा. तीं नित्यकर्मे संध्या वगैरे होत. तीं केलीं तर पुण्य नाहीं, परन्तु न केलीं तर पाप आहे, अशी धर्माज्ञा आहे. याचा मूळ हेतु, तीं नित्यकर्मे निर्हेतुकपणें आचरलीं तरी त्यांचा विचारावर परिणाम होतोच, म्हणून विचार न करतां तीं निरपवादपणें आचरावींत, हाच असावा. एखादा पुढारी व बहुजनसमाज यांचे संबंध याच प्रकारचे परंतु थोड्याशा उच्च दर्जाचे असतात. मुलांना आई-बापांचें ऐकावेंसें वाटणें याला कारण जो मूलभूत आदर किंवा प्रेम त्या भावनांचें जास्त स्पष्ट अस्तित्व जनता व नेता यांच्या संबंधांत असतें. महात्माजी किंवा जवाहरलालसारख्या विभूतीविषयीं प्रथमदर्शनींच आदर वाटतो. विचारावर त्या आदराचा परिणाम होतो. त्यांतूनच त्यांच्या आचारात्मक अनुकरणाची जिज्ञासा जागृत होते. त्यांच्यासारखें व्हावें असे विचार व तसें होण्याचे प्रयत्न म्हणून आचार, दोन्ही सुरू होतात. परंतु सूत काढणें वगैरे आचारात्मक अनुकरण लवकर शक्य होतें व त्यांच्यासारखें होण्याच्या विचारात्मक अनुकरणाची जिज्ञासा तशीच राहते. ती जिज्ञासा तृप्त होण्यासाठीं किती तरी आचाराचा मार्ग चालावा लागतो. कारण त्या विभूति आचार व विचारांनीं एकरूप असतात. तेव्हां,

तें आचारविचारांचें एकरूपत्व मिळवण्यासाठीं आचारधर्मांची यातायात करावी लागते. असें आचाराचें क्षेत्र विचारापेक्षां जास्त व्यापक आहे.

गांधी सूत काढतात परंतु सूत काढणारा प्रत्येक गांधी नव्हे. अशा रीतीनें आरंभींच्या म्हणीची सत्यता पटते. परंतु गांधी होतां आलें नाहीं तरी सूत काढण्याचें महत्त्व कमी होत नाहीं. सूत काढणें हा आचार गांधींच्या विचारसरणीपासून फारसा दूर नाहीं. पितळेचें पिवळेपण सुवर्णत्वापासून जितकें दूर आहे तितका सूत काढण्यासारखा आचारधर्म त्या विचारसंप्रदाया-पासून फारसा दूर नाहीं. तेव्हां वरील म्हणींतला अतिव्याप्तिदोष आपण लक्षांत ठेवला पाहिजे. एका विशिष्ट संप्रदायांत विचारसरणीपेक्षांहि आचार-धर्मांचें महत्त्व जास्त असूं शकतें. वरील गोष्ट विभूतीच्याच बाबतींत खरी ठरते असें नाहीं; एखाद्या अधम कृत्यास प्रवृत्त होतांना किंवा सांथ देतां-नाहि हेच आचार व विचारसंबंध संभवतात. एखाद्या चांगल्या किंवा वाईट कृत्याला तनमनधनेंकरून एखादा माणूस वाहून घेतो त्या वेळीं त्या कृत्याच्या असामान्य स्वरूपाचा पगडा त्या व्यक्तीच्या आचारावर व विचारावर एकदम सामुदायिक स्वरूपांत होत असतो. त्या कृत्याशीं समरस होऊन माणूस आपलें व्यक्तित्व विसरतो. बऱ्याचशा आचारानंतर होणारा वरील परिणाम श्रद्धा टिकण्यापुरताच राहिला आणि आचारांचें अनुकरण सारखें करीत राहिलें तर कांहीं काळानें आचारानुरूप विचारांचें परिवर्तन खात्रीनें होतेंच असा लोकनीतीचा सिद्धान्त दिसतो. एवढ्यासाठींच कोणत्याहि धर्मांत आचाराचें महत्त्व फार आहे. व्यवहारांतील आचारावरून केलेली पारख पिवळेपणावरून केलेल्या सुवर्णपरीक्षेइतकी चुकीची ठरत नाहीं. परंतु हें मात्र नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आचार व विचार यांची एकरूपता हें चारित्र्याचें ध्येय गांठण्यासाठीं आचारप्रधान अनुकरण हा एक सामान्य व व्यापक नियम असला तरी त्या आचारांतला विचारपरिवर्तनाचा हेतु नेहमीं डोळ्यासमोर असला पाहिजे. त्यालाच श्रद्धा म्हणतात. श्रद्धाहीन आचरण हें भारवाही वृत्तीचें ठरणार आहे. आचारधर्माची या विचारपरिवर्तनाच्या हेतूपासून फारकत झाली, आचारधर्माला विचारांची संगति मिळविण्याची बूज राहिली नाहीं, कीं त्या श्रद्धाहीन आचारधर्माला रूढि म्हणतात. कशासाठीं संध्या करावयाची याचा विसर पडतो. संध्येच्या आचारधर्मामुळें

विचारावर होणारा परिणाम लक्षांत घेतला जात नाहीं. असे आचारधर्म 'रूढि' या सदराखालीं येतात. त्या वेळीं 'बाबावाक्यम् प्रमाणम्' हाच न्याय ठरतो. सांप्रदायाची इतिश्री होते ती अशीच. सांप्रदायाचा नायक डोळयांसमोर असतो तोंपर्यंत आचार व विचार यांचा एकसमयावच्छेदेंकरून परिणाम दीक्षाधारी लोकांवर होत असतो. नायक गेला, गुरु गेला, कीं आचार व विचार यांचा एकरूप आदर्श गेला. मग निव्वळ ग्रंथ राहतात. माळ घालणें, टिळा लावणें, छाटी नेसणें, नि दंडकमंडलू घेणें, यावरच सांप्रदायाची इभ्रत येऊन बसते!!

# गरीब बिचारे श्रीमंत ११

" श्रीमंतांना हल्लीं फार वाईट दिवस आले आहेत " असा दुःखाचा उद्गार परवा एका श्रीमंत गृहस्थानें काढलेला मीं ऐकला !

तो गृहस्थ चांगला श्रीमंत आहे. त्याची संपत्ति अद्याप सावकारांनीं मोजावयास सुरवात केली नाहीं. उलट त्याच्याच जमाखर्चाच्या वह्यांत इतर लोकांच्या श्रीमंतीची आंकडेमोड नमूद केलेली आहे.

पण तो गृहस्थ स्वतः दिसायला मात्र अगदीं गरीब दिसतो. एक खादीचा सदरा, गांधी टोपी, खादीचा पंचा व पायांत एकाच बंदाची व आंगठाही नसलेली मद्रासी वहाण तो वापरतो. श्रीमंतीबद्दलचीं कोठें बोलणीं चाललेलीं असलीं तर त्याचा जीव तळमळतो. पण समाजांत तो जरा लोकप्रिय असल्यानें त्याला स्वतःला उघड उघड आपल्या पैशाचा कैवार घेतां येत नाहीं. चोरापेक्षां समाजाला आपली संपत्ति कळेल कीं काय अशी त्याला भीति वाटते—

लोकप्रीतीच्या लोभानें त्यानें कांहीं प्रसंगीं औदार्याचे प्रयोग केले व त्याच्या औदार्याचा कोणीं उल्लेख केला कीं त्याला धसकाच बसतो. लोक उघड उघड त्याच्या औदार्यावर हल्ला चढवतात आणि त्यावेळीं त्याला असा संताप येतो कीं—

पण त्याच्यापेक्षांही त्याच्या संपत्तीचा लोकांना फार मोह आहे. लोक कांहीं केल्या ऐकत नाहींत. त्याच्या श्रीमंतीची त्याला सारखी जाणीव देऊन जणूं काय त्याचा पैसा त्याला नकोसा करावा असें लोकांनीं व्रत घेतलें आहे.

तो कोठेंही गेला कीं बसल्या बैठकींत एकदम हालचाल होते, चुपचाप होऊं लागते. सारवासारव होते व लोक त्याची श्रीमंती भर चव्हाट्यावर मांडल्याखेरीज रहात नाहींत. श्रीमंतीमुळें नागवला जाण्याची त्याची स्थिति अत्यंत केविलवाणी आहे.

पण मी त्याचें सांत्वन करण्यासाठीं म्हणालों, "अहो, जगांत सर्व प्रकारच्या श्रीमंतीचें असेंच आहे. गुणाची श्रीमंती असो, शक्तीची असो, फार काय चांगल्या कुळांत जन्म झाल्यामुळें जी रक्ताची श्रीमंती येते तिचेंही असेंच आहे. श्रीमंती लोकांना कळल्याखेरीज खरा आनंद मिळत नाहीं व लोकांना कळलें कीं लोक असा पिच्छा पुरवणारच."

"अगदीं खरें आहे तुमचें म्हणणें. श्रीमंतांत काय गुण नसतात असें वाटतें लोकांना? पण ते गुणांचा उल्लेखसुद्धां करणार नाहींत. श्रीमंत माणसाला श्रीमंत राहाण्यापलीकडे दुसरें कांहीं करूंच देणार नाहींत. एखाद्या सभेचा एखादा श्रीमंत अध्यक्ष पाहिला कीं, माझ्या तर अंगावर कांटा उभा राहतो. त्याला बनवण्यासाठीं वक्त्यांची नुसती अहमहमिका चाललेली असते. त्याला मतें असलीं, तरी त्याला तीं सांगूं द्यावयाचीं नाहींत. त्याचे विचार त्याला बोलूं द्यावयाचे नाहींत. बरें पुन्हां जरा औदार्याचा कंटाळा केला, जरा नाखुषी दाखवली कीं, लोकांनीं फेकलाच त्याला! आणि कीर्ति सोडून गेलेली श्रीमंती अगदीं स्मशानाच्या मालकीसारखी आहे! कीर्ति हमखास मिळावी म्हणून पैसा मिळवावयाचा व कीर्तीपायीं तो सगळा घालवावयाचा! काय हाल आहेत श्रीमंतांचे! श्रीमंत असून सुखी राहावयाचें म्हणजे मनुष्य निर्लज्जच पाहिजे! तो थोडा जरी 'माणूस' असला कीं, त्याचे हाल विचारूं नका!

"आणि सगळयांत मजा सांगतों तुम्हाला, दरिद्री माणसेंच गुणी असतात असें लोक आमच्या तोंडावर आम्हांला ऐकवतात. श्रीमंतांना गुणी ठरूं द्यावयाचें नाहीं व गुणी लोकांवर दारिद्र्य लादीत रहावयाचें असें अगदीं ठरून गेलें आहे."

"खरें आहे तुमचें म्हणणें! मी आतां तुम्हांला एक अनुभवच सांगतों. एका लेखकाच्या मृत्यूबद्दल एक दिवस साजरा करावा असें एकदां लोकांनीं ठरविलें. झालें. मंडळ स्थापन झालें. चिटणीस आले, अध्यक्ष आले, प्रचारक

आले, स्मारक निधीचीं तिकिटें सुद्धां निघालीं! मी या वावटळीनें थक्क झालों होतों.

" माझ्या चांगला माहितीचा तो लेखक होता. मला आनंदच झाला. आणि मीहि त्यांत सामील झालों. पण लोक माझ्याबद्दल जरा साशंक दिसले. कां?

" कारण मला त्या लेखकाबद्दल जी माहिती होती ती समारंभाला उपयोगी नव्हती. तो कसा असावा हें मंडळानें ठरविलें व धडाधड व्याख्यानें झालीं. एकजात सर्वांनीं त्याला दरिद्री ठरवलें व मग गुणी ठरवलें. डोळयांत पाणी आणून त्याचे हाल वर्णन केले. आणि अशा गुणांची जोपासना करण्यासाठीं फंड उभारले.

" मी थक्कच झालों."

" कां? तो गुणी नव्हता कीं दरिद्री नव्हता?"

" अहो दरिद्री नाहीं. हाल नाहींत. कांहीं नाहीं! चांगला खाऊन पिऊन सुखी होता. त्याला कधीं पैशाची भाजी आणावी लागली नाहीं. तो काय समाजासाठीं तडफडत होता वाटतं? कधीं तो कोणाला आपले लेख दाखवीत सुद्धां नसे. श्रीमंत असून व्यसनी नव्हता म्हणून गुणी होता व लिहीत असे तें करमणूक म्हणून पण त्याचे लोकांनीं केलेले हाल पाहून मला खरोखर वाईट वाटलें! त्याला जें जन्मभर शिवलें नाहीं तें दारिद्र्य लोकांनीं शेवटीं त्याला पिंडांतून चारलें!

" पहा मी म्हणतों तें खरें आहे कीं नाहीं! लोकांना दारिद्र्याखेरीज गुण दिसत नाहींत व श्रीमंताखेरीज मूर्खपणा दिसत नाहीं. श्रीमंतांनीं पुस्तक लिहिलें तर ' श्रीमंत असून पुस्तक लिहिलें ' असें लोक म्हणतात. एकदां तर एका सभेंत एका मित्रानें आपल्या दुसऱ्या एका मित्राचे गुण वर्णन करतांना त्याच्या आईबापांना सुद्धां भिकारी ठरवलें. ते त्या सभेंत असते तर काय वाटलें असतें त्यांना?

" आणि असें हृदयद्रावक वर्णन केलें त्या बहाद्दरानें कीं लागलीच त्याच्या शेजारचा माणूस च्च् च्च् करूं लागला. पहाणाऱ्याची दृष्टि बदलली व एका विद्यार्थ्यानें तर संदेश मागितला कीं, दारिद्र्याचें वैभव सांगणारा संदेश द्या, कारण मी दरिद्री आहें. मला तुमच्या सारखें व्हावयाचें आहे. आणि सभा

झाल्यावर त्या मित्रानें आपल्या मित्राची कानउघाडणी केली. तेव्हां तो बहाद्दर म्हणतो: " अरे, दारिद्र्याखेरीज गुणांना बैठक येत नाहीं ! श्रीमंतांना गुणांचें वैभव ! तूं बैस गुपचिप ! श्रीमंत होतास असें कळलें कीं, आज एका क्षणांत मिळविलेला मोठेपणा घालवून बसशील ! श्रीमंतांनीं गुणी होण्याचें कारण नाहीं. त्यांनीं फक्त श्रीमंत होण्याचें व रहाण्याचें काम करावें ! नाहींतर दरिद्र्यांना ध्येय काय ? त्यांना कांहीं श्रीमंत होतां येणार नाहीं. तेव्हां निदान त्यांना गुणी होण्याचा तरी अधिकार मिळाला पाहिजे ! "

" पण दरिद्री माणसांना मदत करणारे श्रीमंतच असतात कीं ! त्यांचा तो तरी गुणच आहे कीं नाहीं ? "

" गुण कसला त्यांत ? तो गरीबांचा जन्मसिद्ध हक्क आहे. ते दरिद्री जन्मले हाच त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे. ते श्रीमंतांच्या मदतीनें श्रीमंत झाले तरी आपला दारिद्र्याचा जन्मसिद्ध हक्क सोडणार नाहींत ! "

" एकंदरींत दारिद्र्याबद्दल लोकांना फारच प्रेम आहे तर ! आणि आतां तर दरिद्री माणसांचेच दिवस आले आहेत. मोठमोठ्या नवकोट नारायणांना दारिद्र्याचें सोंग धारण करावें लागतें. आपल्या हक्काचे पैसे वापरायची चोरी झाली आहे. नाहीं तर हा ३॥ रु. चा सूट कशाला अंगावर घातला असता ? भांडवलशाहीविरुद्ध बोलतांना मध्येंच एकदम मनाला धसका बसतो कीं आपण हें काय आत्मघातकी प्रवचन करीत आहोंत. चारपांच दरिद्री, ३।४ निरुपयोगी माणसें व लोकोपयोगी संस्था हीं बाळगल्याखेरीज श्रीमंतांना सुख नाहीं ! कांहीं दरिद्री फितूर करून घेतल्याखेरीज सुखानें जगतांच येणार नाहीं. असे दिवस आले आहेत आतां श्रीमंतांना. "

" पण तुम्हाला तरी दारिद्र्याचें नुसतें ॲक्टिंगच करावें लागतें ना ! तेवढं केलें कीं मग कोण तुमच्या पैशाला हात लावतो ! खादींत काय तलम खादी मिळत नाहीं ? शंकराचार्य सुद्धां मोटारींत बसतांना गादीवर मृगाजिन घालतात !"

" पण पैसा वापरायचा तरी केव्हां मग ? दरिद्री नारायणाचा पोशाख करायचा, दरिद्र्यांसाठीं व्याख्यानें द्यावयाचीं, दरिद्र्यांसाठीं भांडावयाचें आणि श्रीमंतीकडे पहावयास वेळ कुठें आणि संधि कुठें ? श्रीमंतांचा खरा आनंद

दरिद्र्यांपुढें श्रीमंती दाखविण्यांतच असतो! पण आतां ते दिवस जात चाललेत! चांगलीं घरंदाज श्रीमंतांचीं कारटीं सुद्धां भंगडासारखा पोशाख करण्यांत भूषण मानतात! काय अवदसा आठवली आहे त्यांना! आज काल फकिरीला मान आहे बाबा!"

"पण हिंदुधर्माच्या शिकवणुकीला हें अगदीं सुसंगत आहे, नाहीं का? 'संपत्ति मातीसमान' आहे या लोकप्रिय तत्त्वाचाच हा विजय आहे! पण स्वतःला श्रीमंतीचा मोह आवरला नाहीं तरी निदान कांहीं मृतात्म्यांवर दारिद्र्य लादून दारिद्र्याचें वैभव बोलून घेण्याचें लोकांनीं ठरवलेलें दिसतें!"

"गरीब बिचारे श्रीमंत! लोकांचे गुण घाशीत असण्याचें त्यांच्या नशिबीं येतें पण स्वतःचे गुण दाखविण्याचा त्यांना परवाना नाहीं. श्रीमंत असून विद्वान् असला तर त्याच्यासारखा दुर्दैवी तोच! म्हणून म्हणतों मी या अवताराकडे पहा! मग पटेल तुम्हांला कीं मी गरीब बिचारे श्रीमंत कां म्हणतों तें!"

मी त्या गृहस्थांकडे खरोखरच पाहूं लागलों! "सगळें जग एकदां होऊं द्या बुवा श्रीमंत! चार पैसे पदरचे खर्चतों लागेल तर! म्हणजे मग तरी एकदां श्रीमंतीचा मनमोकळेपणानें उपभोग घेतां येईल!" असेंच जणूं काय ते तळमळून म्हणत असावेत असें मला वाटलें.

# गणपति बाप्पा-मोऽऽर्या ! १२

क्रमांक ८८७२

मी रहात असलेल्या चाळींत एक दिवस रात्रीं १०-१०। वाजतां एकदम तबला वाजूं लागला !

मला अतिशय आश्चर्य वाटलें. चाळींतल्या सर्व माणसांची व माझी ओळख नसली तरी तेवढ्या समाजाचे उद्योगधंदे मला माहीत होते. त्यांत कांहीं लोकांना व्यसनें होतीं हेंहि मला माहित होतें. परंतु गाण्याचें 'व्यसन' कोणालाच नव्हतें हें मला नक्की माहीत होतें. कारण माझें मागील बिऱ्हाड मीं यासाठींच तर बदललें. त्या मागील बिऱ्हाडीं शेजारीं 'गायन क्लास', मागील बाजूस घरींच गायनाचा अभ्यास करणारा तबलेवाला, समोर हार्मोनियम व फोनो, अन् पलीकडील घरावर रेडिओची दांडी ! असा भोंवतालीं गायनाचा मलेरिया अगदीं लागून राहिला होता !

परंतु या नव्या घरांत ही तबल्याची पहिली थाप ऐकून माझ्या पोटांत धस्स झालें. अभ्यास थांबला, झोंप उडाली व मीं कान टवकारून पडून राहिलों.

जरा वेळानें काठ्यांचा व त्यांच्या टोकाला बांधलेल्या त्या घुंगरांचा आवाज ऐकूं येऊं लागला. पेटीचा भाता सुरू झाला. व शिटी वाजल्याबरोबर—

'हे गजानना ऽऽ तुला नमन घे अमुचें ।'

ही ओळ ऐकूं आली !

एकदम माझ्या डोक्यांत प्रकाश पडला कीं, गणपति आले !

मागील वर्षी ' लवकरच या ' म्हणून दिलेलें आमंत्रण पाळण्यांत गणपती-इतका प्रामाणिक देव दुसरा नसेल !

आणि पुण्यांतले गणपति ते ! आले आले म्हणजे सगळा समाज हालचाल करूं लागतो !

* * *

आमच्या चाळींतल्या त्या खोलींत एक आचारी रहात होता. त्यानें यंदा मेळा काढण्याचें ठरवलें असें मला त्या दिवशीं कळलें. आज तो मेळा ठिकठिकाणची ' सुपारी ' घेत व नारळ गोळा करीत हिंडत आहे.

दुसऱ्या दिवशीं तो आचारी माझ्याकडे आला. मी तर थक्कच झालों. माझ्याकडे यंदा कांहींही 'कर्तव्य' नव्हतें किंवा मी कोणत्याही आचारी वाढपी मंडळाचा अध्यक्षहि नव्हतों.

" साहेब, एक काम आहे तुमच्याकडे ? "

" काय हो ! माझ्याकडे काय काम निघालें ? "

" नाहीं. तुम्ही लेखक आहांत. आम्हीं तुमचीं पुस्तकें वाचतों ना नेहमीं ! आमच्या क्लबांत येतात सगळीं वर्तमानपत्रें ! "

" बरं मग ? लेख पाहिजे कीं काय ? "

" नाहीं. पद पाहिजे. म्हणजे त्याचं असं. आम्ही यंदा एक मेळा काढला आहे. अन्नपूर्णा मेळा हें नांव आहे त्याचं."

मला त्या नांवाला हंसल्याखेरीज राहवलें नाहीं. पण तिकडे लक्ष न देतां तो समाजसेवक पुढें म्हणाला—

" आचारी व त्यांचीं मुलें यांचा मेळा आहे हा ! आम्हाला या वर्षी खूप सुपाऱ्या मिळाल्या आहेत ! मोठमोठ्यांच्याकडे आमचीं जाणीं येणीं असतात ना ? तुम्ही आम्हाला एक पद द्या सुंदर ! "

" मी कविता करीत नाहीं हो ! "

" कविता नको, पद पाहिजे. ' आयडिया ' सांगतों ना ?, कौन्सिलावर पाहिजे. कौन्सिल ही समजा एक खाणावळ. मेंबर लोक सगळे आचारी. अध्यक्ष मॅनेजर आणि—"

" आणि सुधारणा हीं पक्वान्नें का ? "

" अगदीं बरोबर ! चाल अशी फाकड्र घालतां ! ' ब्याहो ब्याहो—' च्या चालीवर बसवा. गणपतिरायाच्या कृपेनें चार पैसे मिळाले तर तुम्हांला विसरणार नाहीं. एक पोरगा असा फाकडू मिळवलाय ! तुम्ही सांगाल तसं बसवून घेऊं. पण अगदीं चीत झाले पाहिजेत लोक. लोकशाही आणा त्यांत !"

" तूं तर लोकशाहीवाल्याकडे स्वयंपाक करतोस ना ! "

" मग त्यांत काय ? तिला म्हणा एक बुडालेली खाणावळ ! "

परंतु मला त्या आचाऱ्याची हौस भागवतां आली नाहीं तरी त्याच्या पद्यावलींत एक पद आहे—

" जेवा ! जेवा ! तुम्ही जेवाऽ अम्ही जेऊं—" वगैरे.

त्या रात्रीं गणपतीच्या वार्षिक आगमनाची बातमी मला लागल्यापासून मीं कितीतरी गंमती पाहिल्या. कांहीं ठिकाणीं मांडव सुरू झाले. आळींतले तालीमबाज ठिकठिकाणीं मेळ्यांतला पोशाख घालून हिंडूं लागले. आमच्या दूधवाल्याचा महाद्या कार्डबोर्डाचा जिरेटोप घालून एक दिवस हिंडतांना मीं पाहिला. तपास करतां असें कळलें कीं, एका मेळ्यांत त्याला शिवाजीचें काम मिळालें आहे. सोन्या मारुतीच्या सत्याग्रहावर एक संवाद असून त्यांत ऐन वेळीं शिवाजी महाराज रक्षणार्थ धावत येऊन देऊळ आपल्या ताब्यांत घेऊन मारुतीशेजारीं तरवार उपसून उभे राहतात व तें काम महाद्याकडे आहे. तो मारुतीशेजारीं उभा राहून जें पद म्हणतो तेंही मीं एका ठिकाणीं कालच ऐकलें.

' जर पाउल टाकाल टाकाल एक् पुढें ! '

' एक बंगला ' या पदाचे पडसाद उठवण्याचा महाद्या कमालीची खटपट करतो.

माझ्या आळींत मला ४ आणे डोईपट्टी द्यावी लागलीच. आणि वर्गणी दिली म्हणून मी जरा त्या उत्सवाबद्दल चौकशी करूं लागलों. एका पत्रकांत गेल्या वर्षीचा हिशेब वगैरे चोख लिहिलें आहे. त्यांत अगदीं एका कवीला पाजलेल्या कॉफीच्या कपाचा सुद्धां खर्च आहे आणि खालीं ऑडिटर म्हणून गोखले यांची सही आहे. आळींतले हे ऑडिटर कोण म्हणून मीं तपास केला तर असें कळलें कीं, त्याचें गणपतीचें एक दुकान आहे रविवारांत एका फुटपाथवर !

काय सामाजिक जागृति आहे ही ! गणपति उत्सवानें लोकांना राज्य-व्यवस्थेचें शिक्षण मिळतें असा मुद्दा एखाद्या निबंधांत एखाद्या विद्यार्थ्याला सांगावयास मुळींच हरकत नाहीं.

आळींतली चार आणे वर्गणी दिली त्या दिवशीं संध्याकाळीं चार पहिल-वान घरीं आले.

"साहेब वर्गणी ?"

मीं त्यांच्या धिप्पाड देहाकडे पाहून आवाज जरा सौम्य केला.

"कशाची ?"

"वाः ! पेठेचा गणपति नाहीं का आपला ?"

"अरे बुवा ! मीं दिली आमच्या पेठेला !"

"कोणाला दिली ? आमचा गेल्या शंभर वर्षांपासूनचा गणपति आहे ! आतां ६०० रु. जमवून कंक्रीटाचा मंडप बांधायला काढलाय. त्याचा उच्चाटन समारंभ व्हावयाचा आहे आतां !"

उच्चाटन ? त्याला उद्घाटन म्हणावयाचें होतें. पण पहा ! त्याच्याही अंगवळणीं समाजसेवेचें टेक्निक किती पुरेपूर बाणलें होतें !

"पण मग हा आणखी गणपति कोणाचा ?"

"अहो ! तो काय गणपति आहे का ? ४ पैशाची बाहुली आणून कुठें गणपति होतो ? आमच्या गणपतीपुढें हजेरी दिल्याखेरीज एक मेळा पुढें सरकायचा नाहीं. तुम्हीं प्रोग्रॅम पहा ना !"

त्यानें एक कार्यक्रमपत्रिका हातांत दिली. त्या पत्रिकेंत—

१ तीन कविता गायनें

२ चार पोवाडे

३ पंचवीस मेळे

४ सहा नकला

५ तीन व्याख्यानें

इतका कार्यक्रम होता.

व्याख्यानांचे विषय खालीलप्रमाणें होते—

१ आपलें स्त्रीशिक्षण.

२ आपलें प्राचीन अर्थशास्त्र.

३ विमानें कशीं तयार करतात !

सगळा समारंभ होता. समारंभाचें अस्सल एकजिनसी स्वरूप गणपति-उत्सवाइतकें दुसऱ्या कोणत्याही उत्सवांत दिसणार नाहीं. कारण उत्सवाच्या गरजेप्रमाणें त्यांत सगळें चालतें. मागील वर्षीच्या राजकारणाचा इतिहास त्यांत असतो. समाजांतील चालू फॅशनचा त्यांत आढावा असतो. तरुण पिढींतील व्यसनांची नोंद असते. कांय वाटेल तें असतें. फक्त 'गणपतीला' त्यांत फार थोडी जागा असते.

समाजाच्या सगळ्या हौशी भागवण्यासाठीं गणपति हें एकच लोकप्रिय दैवत आहे. कांहीं करा. तो आपला प्रसन्न तो प्रसन्न ! त्याला गांधी टोपी घाला, हातांत चरखा देऊन सूत काढायला बसवा ! आपली सोंड गुंडाळून ठेवून पोटावर चरखा घेऊन सूत काढीत बसलेला गणपति मीं पाहिला आहे. लोकांना प्रिय असा देव म्हणजे गणपति ! भक्तांसाठीं वाटेल तें करायला तयार ! ज्यांच्यासाठीं भक्त खपतात असे देव पुष्कळ असतात पण आपल्या भक्तांची इतकी सेवा करणारा असा हा एकटाच देव आहे.

यंदाच्या गणपति उत्सवांत माझ्या एक हौशी श्रीमंत उत्सवाध्यक्षानें गणपतीला कौन्सिलचा अध्यक्ष करून त्याला श्री. मावळंकरांचा पोषाख दिला आहे !

फक्त गणेशोत्सवापुरता जागा होणारा असा पुण्यांत एक निराळा वर्गच आहे. उत्सवाच्या आधीं ते १–१॥ महिना चळवळी करूं लागतात आणि गणपतिविसर्जन केलें कीं पुन्हां शांत बसतात.

तसेंच उत्सवांत मनोरंजनाच्या कार्यक्रमास उपयोगीं पडणारे असेहि लोक ठराविक असावेत असें वाटतें. मागील पत्रिकेंतील व्याख्यानाचे विषयच पहा ना ! हजारों उत्सवकेंद्रें असल्यानें प्रत्येक गणपतीपुढील व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे सगळ्यांत हाल होतात. ज्यांना कांहींही मतें नाहींत अशा निरुपद्रवी बायका आसपासच्या वाड्यांतून बोलवाव्या लागतात. बायका जम-

वण्यांत त्यांचीं मुलेंबाळें जमविण्याचें काम आपोआपच होतें. सुनालेकी मांडवाखालीं जमवा कीं मग सासवा घरीं बसून काय करणार ? त्याही येतात. वृद्ध तर असतातच. मग व्याख्यान सुरू होतें. आळींतले एखादे शिष्ट अध्यक्ष. एका गणपतीपुढें अगदीं परवां पाहिलेला एक व्याख्यानसमारंभ सांगतों.

अध्यक्षाशेजारीं एक गृहस्थ अंगावर नुसतें उपरणें टाकून बसले होते. २०।२५ बायका उजव्या बाजूस होत्या. डाव्या बाजूला रस्त्यांतला चौक होता. तिथें कांहीं टांगेवाले विडी फुंकीत बसले होते. 'पुरुष' समाजापैकीं फक्त १०।१२ मुलें बसलीं होतीं व तीं पेंगत होतीं. मंडपाच्या पुढल्या अर्ध्या भागांतून तांगे, सायकली, मोटारी यांची वाहतूक चालली होती आणि व्याख्याते सांगत होते कीं,

" स्त्रिया कीं, ज्यांच्या पोटांतून आपण बाहेर येतों त्या शिकूं नयेत असें कोण म्हणेल ? यावर आगरकरांचें मत वाचतों. "

इतक्यांत एक तांगा आला. वाटेंतलीं मुलें घोड्याच्या मागें लागलीं. जाऊं द्या ! थांबवा ! परतवा ! अशी आरडाओरड सुरू झाली. घोडा बिचकून गणपतीकडे वळूं लागला. व आगरकरांचें स्त्रीशिक्षणाविषयींचें मत कोणाला ऐकूं आलें नाहीं !

पलीकडल्या चौकांत एक नकलाकार प्रस्तावना करीत होता.

" मुंबईंत जसे गद्रे, पुण्यांत जसे अत्रे, तसे महाराष्ट्रांत आम्ही एक आहोंत. हो ! आम्ही आहोंत ! "

सगळ्यांत कींव कोणाची येत असेल तर मेळ्यांतील लहान मुलांची व त्यांच्या बरोबर हिंडणाऱ्या पोलिसांची ! बत्तीवाल्याबरोबर रस्तोरस्तीं हिंडत रहावयाचें यांत पोलिसला काय आनंद मिळत असेल कोणास ठाऊक !

आणि लहान-लहान मुलें ! मंडपांत येईपर्यंत तीं पेंगतच असतात. मंडपांत बत्तीचा उजेड डोळयावर पडला कीं जागीं होतात. आणि त्यांतही सगळयांत हाल होतात बिल्लेवाल्या मुलांचे. मेळ्यांतला हीरो अगदीं कोवळया वयाचा, सुंदर गळयाचा असा लागतो. मला वाटतें एकदां मेळ्यांत हिंडून आलेला मुलगा " लहानपण देगा देवा " असें चुकूनसुद्धां म्हणत नसेल.

जसजशी अनंतचतुदर्शी जवळ येते तसतशी दंगल वाढत जाते. पुण्यांतील राजकारणाचीं केंद्रें, गायकवाडवाडा व शिवाजी-मंदिर, तेथें प्रचंड गर्दी जमते. कित्येक म्हाताऱ्या बायका तर संध्याकाळीं ७ वाजेपासून वाती करीत जागा धरून बसतात. व रात्रीं १२–१२॥ वाजतां तेथें जमलेला समाज पाहिला कीं असें वाटतें, कीं धर्म ही अफू आहे असें म्हणणाऱ्यांना तेथें एकदां आणावें. पण कदाचित् तेही तिथेंच कुठें तरी असतीलच !

शेवटीं अनंतचतुर्दशीच्या विसर्जन–मिरवणुकींत तर सार्जंटांनासुद्धां गणपतीच्या गुलालाचा प्रसाद मिळतो.

या गर्दींतून धक्काबुक्की खात असतांना लो. टिळकांची आठवण होते. काय प्रचंड महायंत्र सुरू करून दिलें आहें हें त्या ‘ बलवंत ’ बळवंतरावांनीं ! किती आनंद होत असेल त्यांना ही मिरवणूक स्वर्गांतून पहातांना ! कारण स्वर्गापेक्षां जास्त उंच जागा नाहीं. तेव्हां त्यांच्याइतकी चांगली कोणालाही मिरवणूक पाहतां येत नसेल !

या कितीही उत्सवांत त्रास झाला, जागरणें झालीं, पैसे गेले, अभ्यास बुडाले, तरी मीही दरवर्षी त्या मिरवणुकीबरोबर ओरडतों—

गणपति बाप्पा मोर्या—
पुढल्या वर्षी लौकर या !

# किंचित् आधुनिक १३

‘ आधुनिक ’ हा शब्द आतां हळू हळू इतका व्यापक झाला आहे कीं, त्याचें ‘ विशेषण ’ हें मर्यादित परावलंबी ( विशेष्यावलंबी ) क्षेत्र संपून तो आतां वर्गवाचक शब्द झाला आहे ! नाहीं—कालवाचक शब्द झाला आहे.

भोंवतालच्या जगांत उभें राहून मनानें आधुनिक अशी हांक मारल्या-बरोबर किती तरी व्यक्ति व वस्तु जमा होतात. तरुण स्त्री–पुरुष तर मोठ्या अभिमानानें ‘ ओ ’ देतीलच. परंतु याशिवाय त्याच गर्दींत कांहीं हौशी वृद्धहि काठी टेकीत टेकीत, रुमाल सावरीत व हरदासी झग्याचे बंद बांधीत घुसूं लागतील. फार काय पण बालकेंसुद्धां आधुनिक या हांकेला ‘ ओ ’ देतील. ‘ Who said Mellin’s food ?’ या जाहिरातींतील ‘ बेबी ’प्रमाणें आपलें जावळ सावरीत, व एक एक गुडघा उभा करून गुबगुबीत गाल फुगवीत तीं बालकें विचारतील,

“ आधुनिक ? ”

समाजांत चालू अशा कांहीं फॅशन्स असतात. तसेच आपले विचार आचार कांहींही असोत आपण निदान आधुनिक होऊन बसावयाचें हीही एक फॅशन आहे.

आधुनिक असणें म्हणजे जिवंत आहोंत त्या कालांतले आपण आधुनिक जिवंत असलें म्हणजे पुरें आहे. तरुण असायलाच पाहिजे असें नाहीं. आपलें असेल तें वय संभाळून आपल्याला आधुनिक राहतां येतें.

तुम्ही वृद्ध असलांत तर तरुणांना शिव्या देऊं लागा, लगेच आधुनिक ठराल. तुम्हांला मतें आहेत असें लोक म्हणूं लागतील. तुमच्या तत्त्वनिष्ठेबद्दल अभिनंदन करतील. तुम्ही मनांत आणलेंत तर त्याची तुम्हाला चळवळसुद्धां उभारतां येईल. मारवाडी लोकांचें असें सांगतात कीं, देशांतून निघतांना ते फक्त एक लोटा व दोरी घेऊन निघतात. देशावर मधल्या कोणत्याही शहरांत न थांबतां थेट एखाद्या खेड्यांत जातात. आणि तेथें दुकानाला सुरुवात करतात. हळूहळू २।३ ऱ्या दिवाळीला त्याच्या दुकानच्या भिंतींना चकचकीत भडक मेणचट तांबडा व हिरवा रंग चढलेला दिसूं लागतो. पोट सुटूं लागतें. पोटावरच्या सांखळीच्या पदरांची व किल्ल्याच्या झुबक्यांतील किल्ल्यांची संख्या वाढूं लागते. समईवर घाणीच्या पुटें चढूं लागलात, डबडीं वाढत जातात व गादीवर खड्डा तयार होऊं लागतो! कीं झाला मरुपुत्राचा मारवाडी.

चळवळीचें तसेंच आहे. डोक्यांतला कोणता तरी विचार घ्यावयाचा. त्याला तत्त्व म्हणायचें, त्याचें एक ध्येय तयार करावयाचें. आपण नेहमींचीच धडपड करीत रहावयाची, पण मग त्याला लोकसेवा म्हणावयाचें! नेहमींप्रमाणेंच खर्च करीत रहावयाचें पण त्याला स्वार्थत्याग म्हणूं लागायचें पण लोकांजवळून पैसे मागतांना उसने न मागतां संस्थेला साहाय्य म्हणून मागावयाचे. [म्हणजे परत करावे लागत नाहींत!] आपल्या नेहमींच्या सावकारांना आश्रयदाते म्हणावयाचें व श्रीमंत मित्रांना तहाहयात सभासद म्हणावयाचें. संस्थेला कांहीं आधुनिक नांव द्यावयाचें त्यांत 'नव', 'नूतन', 'अभिनव' वगैरे विशेषण व 'समाज', 'देश', 'युग' यासारखें एकादें नाम असलें पाहिजे!

एवढी धडपड केल्यावर म्हातारपणींसुद्धां आधुनिक होतां येईल! कारण चालू काळांतील आधुनिकतेचें गमक म्हणजे जें कांहीं करावयाचें तें राष्ट्रासाठीं किंवा राष्ट्र ही कल्पना अवजड वाटत असली तर निदान समाजासाठीं केलें असें दाखवीत राहिलें पाहिजे. कांहींही खातांना देवाला अर्पण करून मग खावें अशांतलाच व्यवहार आहे हा!

एकापेक्षां जास्त माणसें एकत्र जमलीं कीं, त्यांचें मंडळ व्हावयास पाहिजे. असे किती तरी वृद्ध आहेत कीं, मरतां मरतां त्यांनीं मंडळ काढून ते आधु-

निक झाले ! धर्म, नीति, संस्कृति हे शब्द तरुण व वृद्ध या दोघांनाही आधुनिकतेच्या चळवळीचीं अत्यंत सोईस्कर साधनें आहेत. कारण त्यांची नक्की व्याख्या, मर्यादा, अर्थ यांपैकीं कांहींही अद्याप ठरलें नाहीं. हजारों वर्षे आपल्या वाडवडिलांनीं याविषयीं परिश्रम करून जें त्यांना सिद्ध झालें नाहीं इतकेंच नव्हे तर साध्यसुद्धां वाटलें नाहीं तें काय आतां आपल्याला जमणार आहे ?

तेव्हां तत्त्वाच्या बंधनांत न सांपडतां आधुनिक होण्यासाठीं सामाजिक चळवळ करणाऱ्यांनीं हीं ढोलगीं वडवावयास घ्यावींत ! जगाच्या अंतापर्यंत यांतून मतभेदाचे आवाज घुमत राहतील. पण ढोलगें फुटणार नाहीं !

आणि या तत्त्वांच्या शापाचें पाणी फेकायला तरुणांखेरीज दुसरें सोइस्कर स्थान नाहीं ! कारण तरुणांना शिव्या दिल्याखेरीज कोणत्याही वृद्धाला आधुनिक ठरण्याचा दुसरा जास्त सुखावह मार्ग नाहीं. कारण वृद्धपणीं पडल्या शरीराचा व घसरल्या बुद्धीचा तोल संभाळून सगळीं कामें करायचीं असतात. आम्ही असे नव्हतों ! आमच्या वेळचें हें काय ! तें काय ! आम्ही काय ! असें बेधडक म्हणण्यांत बौद्धिक श्रम कांहींही करावे लागत नाहींत ! आपल्याही जन्माच्या किती तरी आधींपासून बुडालेलीं तत्त्वें तरुणांनीं बुडविलीं असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं ! कारण मुडदा बेपत्ता झाल्यावर खुनाच्या आरोपाचा निर्णय लागतो कशाला ? खटला दाखल करून ठेवावा ! तरुण अभ्यास करीत नसले—त्यांना मूर्ख म्हणावें ! आणि अगदीं त्यांच्या कंपूंत हिंडून रसेल, फ्राइड, मार्क्स वगैरे शब्द ऐकून घ्यावेत व मग ओरडूं लागावें हे परपुष्ट आहेत ! यांनीं अकला विकल्या आहेत ! शिक्षणावर ताशेरे झाडावेत. ते अभ्यास करीत असले तर पुस्तकांतले किडे म्हणावे ! आणीबाणीच्या वेळीं त्यांना 'बेकार' हा टोला मारावा कीं रामबाणाचा गुण !

तुम्ही तरुण असलांत तर काय ! आधुनिकपणा तर तुम्हाला जन्माच्या दाखल्यावरून सिद्ध करतां येईल ! तुमच्यावर विचार करण्याची जबाबदारी नाहीं. कारण तुमचें हें कार्य करण्याचें वय आहे ना ? विचार मागाहून, शरीर दमल्यावर ! ती आपली मनाची गंमत आहे ! जें तुम्हाला करतां येत नाहीं तें समाजांत कधींच नव्हतें असें म्हणा ! तें 'करा' असें सांगणाऱ्यांना प्रतिगामी

म्हणा, किंवा Reactionary म्हणा ! म्हणजे तुम्ही काय म्हणतां हें फारसें कोणाला कळणार नाहीं. कांहीं साहेबांचीं नांवें जमवा ! आणि अगदीं संकोच न बाळगतां सांगा कीं, त्या साहेबानें Evolution च्या पुस्तकांतील २०२ पानावर असें म्हटलें आहे ! एकदां म्हणून तर पहा काय चमत्कार होतो तो ! कारण साहेबाच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका घ्यावयाची नाहीं हें राणीच्या जाहीरनाम्यांतील अलिखित कलम आहे. दुसरें एक कारण म्हणजे साहेबांना पुस्तकें लिहिण्याची फार खोड आहे. ते बोलण्यापेक्षांही जास्तच लिहितात ! पुन्हां वाटेल त्या विषयावर अगदीं परस्परविरोधी मतें मांडलेलीं कमींतकमी १०।१० पुस्तकें तरी निघतातच ! आपल्याला नांवाची फारशी ओळख नसतेच ! साधारण जॉनसन्, लुई वगैरे नांवें घ्यावींत. वृद्धांनासुद्धां धसका बसेल तुमच्याबद्दल ! आणि ऐन आणीबाणीच्या वेळीं पुराणांतील शकुंतला–मेनका–विश्वामित्र वगैरे आख्यानें काढा ! वेदांचा आधार द्या. कारण वेदाबद्दल माहिती कमी व श्रद्धा फार अशी एक सोय आहे. अगदीं अध्याय आणि श्लोक सांगा दडपून ! आणि मग सांगणें संपवावयाच्या आंत फडके, खांडेकर, रशिया, लेनिन, मार्क्स, फॅसिझम या सारखीं जीं आठवतील तीं निदान दोन नांवें घ्या ! जवाहरलालसारखें जाकीट किंवा रंगानें जरा मध्यम असलांत तर रॉयसारखा पायजमा व भोंगळ सदरा घाला, सूट सोडवत नसेल तर केस विंचरूं नका. फक्त भांग पाडा व सिगारेट ओढा ! आवाज खूप मोठा पाहिजे ! आणि एक मुख्य गोष्ट आहे. रेड्यासारखी ताकद पाहिजे ! एवढें सगळें जमत नसेल आणि तरी तरुण असाल तर वृद्धांत मिसळा कसे ! सगळ्या कादंबऱ्या खुणा करून वाचून मग नवमतवादावर हल्ला करा ! रशियांत असें नाहीं असें सांगा ! कारण ज्यांना सांगायचें असतें ते लगेच रशियांत जाऊन येण्याइतके कांहीं कोणतेंही मत जिवाला लावून घेत नाहींत. व्यवस्थित पोशाख करून ( दाढी, पोमेड, वगैरे इत्यादि ) आपल्या मित्रांची भाई म्हणून रेवडी उडवा ! हंशा टाळ्या अगदीं ठरलेल्या ! आधुनिक कवि व प्रेमकविता हें एक ताजें खेळणें आहे. फडक्यांच्या कादंबऱ्यांबद्दल थोडी नापसंती दाखवावी, खांडेकरांची थोडी कींव करावी, अत्रे यांच्याविषयीं आश्चर्य दाखवावें, 'मामां'ना हंसावें. म्हणजे

तरी आधुनिक होतां येईल. आणि हजारों वृद्धांचे हात शुभाशीर्वादासाठीं तुमच्या डोक्यावर कमान करतील. आचाराची जबाबदारी नाहीं व विचाराची दगदग नाहीं !

अन् स्त्री असाल तर—! विवाहसंस्था हा लोकप्रिय विषय आहेच खेळायला ! त्याचा कंटाळा आला तर आर्थिक स्वातंत्र्य आहे, मतदान हक्क आहे. विद्वत्ता दाखवायची असली तर दत्तक बिल आहे, वारसा बिल आहे. नाजूक असलांत, श्रम होत नसले तर शिशुसंगोपन व किमानपक्षीं बटाट्याचे कांदे कसे करावेत किंवा फोडणीच्या भाताला मोहऱ्या किती घालाव्यात या विषयावर लेख लिहून आधुनिक होतां येईल ! रिकामपणीं विभावरी, गीताबाई वगैरे नांवें जमवावींत ! आणि जरा 'चक्क' होऊन माफक बावळटपणानें, अशक्तपणाची फॅशन करून सभांना जावें !

कारण अगदींच नुसतें जिवंत असण्यापेक्षां थोडेंफार आधुनिक असणें बरें नाहीं का ?

# आज रोख उद्यां उधार १४

" जयलाभ "

" उद्योगाचे घरीं ऋद्धि सिद्धि पाणी भरी. "

" उधार माल द्यावा कैसा, उद्यांचा नाहीं भरंवसा. "

" गिऱ्हाइकांचा संतोष हाच आमचा फायदा. "

त्या दुकानच्या चार भिंतींवर या चार गोंडस म्हणी लावल्या होत्या. त्या म्हणीच्या खालींवर फोटो व चित्रें होतीं. त्यांत लो. टिळकांचा १९०८ सालचा फोटो आतां लोकमान्यांच्या वयोमानाप्रमाणें जुना झाला होता. पलीकडे एकाद्या इंग्रजी वर्तमानपत्राच्या रद्दींतून दुकानदाराच्या मुलानें कापून काढलेला एका इंग्लिश स्त्रीचा फोटो होता. एका ठिकाणीं आगपेट्यांच्या मोठ्या खोक्यावरील तीन माकडांचे माणसाएवढे फोटो होते आणि मेनकेला 'हात' दाखविणारा विश्वामित्र दाराच्या चौकटीवर गिऱ्हाइकांना हात दाखवीत उभा होता.

अशा थाटांत दुकानदार बसले होते. गिऱ्हाइकांची ये जा पावसाच्या सरीसारखी असते. कधीं एकही थेंब नाहीं, कधीं एकदम धडाका, तर कधीं नुसती टिप टिप गळती लागलेली. समोर गिऱ्हाईक नसलें कीं, दुकानदार बेगडानें तयार केलेल्या एका पाटीकडे पहात बसे.

" आज रोख; उद्यां उधार. "

" हें पहा रोखीचें फळ, अरेरे मीं सर्व व्यापार उधारीनें केला. " असें

दोन व्यापारी दाखवलेलें चित्र त्या दुकानांत अद्याप लागलें नव्हतें. पण दुकानदाराच्या अंतश्चक्षूपुढें तें चित्र स्पष्ट होतें.

आणि त्या चित्रांतल्या पहिल्या चित्रांची त्याला हौस होती, नि दुसऱ्या चित्राची धास्ती वाटत होती. तरी काय करणार बिचारा !

तो पाटीप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करी आणि गिऱ्हाईक उद्यां पैसे आणून देतों, मुलाबरोबर पाठवतों, संध्याकाळीं फिरायलो जातांना येतों–असें कांहीं वाटेल तें सांगून शक्य तितकें रोखी टाळून उधार नेण्याच्या पराक्रमासाठीं हट्टास पेटलेलें ! तो दुकानदार गिऱ्हाइकांवर संतापतो, चिडतो, पण गिऱ्हाईक समोर आलें कीं, पुड्या बांधूं लागतो.

एक दिवस एक बडें गिऱ्हाईक आलें. त्यानें ५।१० रु. च्या मालाची यादी समोर टाकली व तें माणूस निघून गेलें. गिऱ्हाइकानें पाठ फिरवल्या-बरोबर दुकानदारानें त्याला एक शिवी हासडली, वेडावून दाखवलें पण लगेच दुकानच्या गड्याला हाक मारून त्याला यादी समजावून दिली.

नंतर एक गरीब कुणबी आला.

" दादा, पैशाची सूंट द्या अन् मिरे–दालचिनी एक पैशांत. "

" पैसे आणलेस का ? "

" दोपारीं देतो दादा ? पोर बेमार पडल्या. कामावरबी गेलों नाहीं. "

" पैसे आण आधीं ! दोन दमड्यांत दहा जिनसा न्यायच्या नि पैसे म्हणे ' दोपारी ' ! "

दुकानदार मधून मधून त्या पाटीकडे पहात होता–" आज रोख उद्यां उधार. "

तो गरीब पाटील निघून गेला ! त्याला कोणीं उधार दिलें कीं नाहीं कोणास ठाऊक ? त्याच्या मुलाचा ताप कदाचित् सुंटीवांचूनच तसाच निवला असेल ! किंवा—?

पण दुकानदाराची ही चीड प्रतिक्रिया मला फार चमत्कारिक वाटली. दोन पैशाच्या विक्रीच्या वेळीं 'तो' नियम पाळण्याची त्याची ती ऐट पाहून मला आश्चर्य वाटलें आणि मघाची त्याच्या अंगावर फेकलेली यादी मात्र निलाजरे-पणानें त्यानें बांधूं लागावें !

दुकानदारापेक्षां आणि दुकानापेक्षां लोक आणि जग बरे ! जगाच्या व्यवहारांत असा अट्टाहास नसतो ! तेथें बहुतेक उधारच आणि रोख केव्हां तरी !

जग आणि त्यांतील माणसें यांच्यांत चाललेल्या खरेदी-विक्रीचें स्वरूप अगदींच निराळें आहे. या दुकानांतही पाट्या लावल्या आहेत.

"मना चंदनाचे परि त्वां झिजावें"
"जे कां रंजले गांजले"—
"सत्यं वद धर्मं चर—"
"क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे"

पण 'जग' 'जग' म्हणून ज्याला म्हणतात तो एक विचित्र प्राणी, 'जगू' शेट, येथील दुकानदार आहे. कीर्तीच्या मालाची प्रचंड वखार आहे ही आणि तेथें कित्येक लोकांच्या याद्या पडल्या आहेत. पण हा विचित्र दुकानदार लहरी आहे, बावळट आहे, मूर्ख आहे ! त्याच्या दुकानीं आपल्या रक्तामांसाची किंमत रोख मोजून कार्याचें मोल देऊन टाकून कीर्तीच्या मालाची वाट पहात बसणारें गिऱ्हाईक आहे. पैसे दुकानदार आधीं घेऊन बसला आणि आतां माल देईल किंवा देणारही नाहीं ! अमोल आयुष्याची किंमत घशाखालीं घालून पुन्हां तो गिऱ्हाइकांनाच लाथा मारणार आणि मग बाहेर जमलेले व्यवहाराच्या रुसव्यानें चाललेले लोक त्या प्रामाणिक गिऱ्हाइकांची कींव करतात, 'आबाळ झाली बिचाऱ्याची !'

याच्या उलट त्याही जगूशेटला बनवणारें गिऱ्हाईकही पुष्कळ आहे. श्रमाचा नुसता देखावा करून, कळकळीची, स्वार्थत्यागाची खोटी चोपडी, बनावट नाणीं तेथें चालवून, 'सत्यं वद' वगैरे दुकानांतील पाट्यांकडे उपहासानें फिदीफिदी हांसून ते या जगूशेटला खूष करून कीर्तीचा माल पळवतात. सध्यां मिळते आहे, तर कीर्ति मिळवून घेऊं या. कार्याची किंमत देऊं पाठीमागून ! आणि तो बावळट-लहरी जगूशेटही अशा गिऱ्हाइकांना संपत्ति, कीर्ति यांचा वाटेल तितका माल उधार पुरवतो, नराला नारायण करून दाखवतो आणि कार्याची रोख किंमत देऊन सर्व आयुष्य चंदनी खोडासारखें झिजवून जनसेवेनें थकल्याभागल्या गिऱ्हाइकांना मात्र दरडावीत असतो कीं—

'आज रोख, उद्यां उधार !'

पैसे टाका माल मग ! किंवा माल नाहींच ! आणि माल तरी काय तर मेल्यावर कोठें तरी भटकणारा कीर्तीचा सुगंध ! स्तुतीच्या फुलाची एखादी पाकळी ! दुकानांत लावलेला एखादा फोटो !

पण बहुतेक गिऱ्हाइकी मात्र उधारीचीच ! कार्याची कांहींही किंमत न देतां प्रसिद्धीचा खंडोगणती माल या दुकानांतून, 'जगू'शेटकडून पळवण्याचें काम अहोरात्र चालू आहे तरी दुकानांत पाट्या आहेत—

'सत्यं वद धर्मं चर !'

'आज रोख उद्यां उधार !'

पण त्या पाट्या कांहीं मोजक्या सज्जनांसाठीं !

'जगू'शेटच्या खरेदीविक्रीच्या सूत्राचें हें वैचित्र्य पाहून अस्सल सज्जनांनाहि एखादे वेळीं मनांत खेद होत असेल. कारण सत्कार्य, जनसेवा वगैरे कार्यांतलें पळतें समाधान टिकवतां टिकवतां एखादा सज्जन मनांतल्या मनांत केव्हां तरी हळूच म्हणतांना ऐकूं येतें कीं—

**"अशा जगास्तव काय झुरावें ?"**

# गाई आणि बैल १५

एका खेडेगांवांत एक पाटील होता. त्याच्या गोठ्यांत खूप मोठें खिल्लार होतें. त्याला सगळ्या जनावरांत गाई व बैल फार आवडत.

त्याचा गोठा पाहून एखाद्याला पांजरपोळाची किंवा एखाद्या गोशाळेची आठवण झाली असती. सगळीकडे कालवडी, गोऱ्हे, मोठमोठ्या गाई व शिंगाडे बैल ! त्या मायलेकरांच्या बाजारांत कोणाचीं मुलें कोणतीं हें ओळखणें फार कठीण होतें. त्या पाटलाला सुद्धां हें सांगतां आलें नसतें.

कोणती तरी गाय जिभेच्या जवळ सांपडेल त्या वासराला चाटूं लागे व कोणतेंही वासरूं जवळ सांपडेल त्या गाईच्या कुशींत घुसून हुंदडूं लागे.

आणि मधून मधून म्युनिसिपालिटीच्या रस्त्यावरील दीपस्तंभासारखे उभे असलेले बैल अगदीं आपुलकीच्या भावनेनें हें मायलेकरांचें वात्सल्य पहात रहात. त्यांचे मोठे डोळे कांहीं वेळां पाण्यानें भरून येत हें दृश्य पाहून ! व मग डोळे मिटून ते रवंथ करूं लागत.

कर्तींसवरतीं मुलें, नातू, पणतू यांनीं गजबजलेला संसार पाहून एखाद्या वृद्धाला जसें समाधान वाटत असेल, तसें त्या बैलांना वाटत असावें.

सकाळीं त्या पशुसंस्कृतींतले पुरुष कामावर जात, स्त्रिया रानांत चरण्यासाठीं जात व शिशुगृहाप्रमाणें तीं ' वासरें ' दिवसभर त्या गोठ्यांत बालोद्यान-पद्धतीच्या शाळेप्रमाणें खेळत रहात.

कोणी शिंगांनीं गवत उधळीत, कोणी खुरांनीं जमीन उकरीत, तर कोणी एकमेकांना प्रेमानें चाटीत रहात. एखादें वासरूं लहर आली कीं दाव्याशीं दंगा करूं लागे व फा–फूं करीत सगळा गोठा दणाणून सोडी.

मग तो दंगा ऐकून घरांतून कोणी तरी मनुष्य येई व वर्गांत मास्तर शिरल्यावर पूर्वींच्या काळचीं मुलें ( गेले ते दिवस आतां ! ) जशीं गप्प बसत तशीं तीं वासरें गप्प बसत.

हळू हळू एक एक वासरूं मोठें होऊं लागल्यावर त्यास पोटापाण्यासाठीं श्रम करावे लागत व त्या वासरांतून एखादा गोऱ्हा असा शेतावर खेचला जातांना पाहून इतर वासरांना फार वाईट वाटे. त्याच्या बहिणी घाबऱ्या होत वं भाऊ घाबरून जात. पण तें तेवढ्यापुरतेंच ! कारण दुःखाचे मुरंबे आणि मोरावळे आठवणीच्या बरण्यांत भरून ठेवण्याची त्यांना संवय नव्हती. कारण तीं कांहीं माणसें नव्हतीं ! अगदीं अस्सल जनावरें होतीं तीं !

पण एक दिवस त्यांच्यांतलें पशुत्व भ्रष्ट होण्याचा धोका उत्पन्न झाला !

त्या गांवांत एक शहरचा माणूस आला. खूप तावातावानें व्याख्यानें देई तो, व खेडेगांवांतलीं माणसें जनावराप्रमाणें स्तब्ध बसून त्याचें व्याख्यान ऐकत रहात. तो शहरचा माणूस त्या खेडवळांना त्यांच्या अडाणीपणाबद्दल खूप बोले. चांगले फटकारे मारी, अगदीं गाडीवान बैलाला बडवतात तितक्या निष्ठुरपणानें ! कारण तो पुढारी होत होता. स्पष्टवक्तेपणा एवढा एकच गुण सध्यां तो पिकवीत होता.

त्याचें एक मोठें व्याख्यान ठरलें. त्या व्याख्यानास वर सांगितलेला पाटील गेला. त्याच्या शेताच्या कुंपणाजवळ एक मोठें हिरवेंगार मैदान होतें. तेथें व्याख्यान ठरलें.

संध्याकाळची वेळ होती. सहस्ररश्मि भगवान् अरुणाचल, पश्चिमा, तिचें आरक्त मुख वगैरे सर्व 'मंडळी' होतीच. खूप शेतकरी जमले होते. शेतकऱ्यांच्या आसपास शेतांतले बैलही कामचुकारपणानें व्याख्यान ऐकत उभे होते व रानांतून परत येणाऱ्या गाईही मग तेथें रेंगाळूं लागल्या. कारण गुराखीसुद्धां व्याख्यानास हजर राहिले !

व्याख्यान जोरांत चालू होतें. तो उमलता पुढारी ग्रामसुधारक होता. शहरांत बसून त्यानें एका ग्रामोद्धार शाळेंत खेडेगांवचें शिक्षण घेतलें होतें आणि आपल्या सामाजिक टिपणावरून तो बोलत होता.

" शहरांत जाऊं नका. खेडेगांवांतील निसर्गसौंदर्य पहा. तुम्ही निसर्ग-देवीचीं लेंकरें आहांत. शहरांत सगळी अनीति आहे. ही सुधारणा बोकाळली आहे. भांडवलवाले तुमचा गळा दाबायला यंत्रें जमवून बसले आहेत. तुमच्या पवित्र जीवितांची राखरांगोळी करायला भट्टया पेटवून बसले आहेत—"

इथपर्यंत ठीक होतें. नंतर त्यानें मोर्चा फिरवला—

" पण तुम्ही फार मूर्ख आहांत. तुमच्या वैभवाची तुम्हांला जाणीव नाहीं. तुमच्यांत जुन्या समजुती आहेत. तुम्ही बायकांना स्वातंत्र्य देत नाहीं."

कांहीं शेतकरणी आपल्या घरधन्याकडे केविलवाणेपणानें पाहूं लागल्या. व्याख्यान जोरांत आलें.

" अनीतिकारक संबंधावरून तुमच्यांत खून, मारामाऱ्या होतात. तुमच्या बरोबरीनें राबणाऱ्या बायकांना तुम्ही लाथेनें तुडवतां, दारूंत बुडवतां.

" —बायकांनीं हा मवाळपणा सोडायला पाहिजे. त्यांनीं आपल्या घर-धन्याच्या नाकांत वेसण घालायला पाहिजे. "

एक बाई बोलली–" ए मेल्या ! " पाटील हसूं लागला.

त्याच्या गाडीचे बैल गळ्यांतल्या घंटा जोरांत वाजवूं लागले व पलीकडे उभ्या असलेल्या गाई एकमेकींना शिंगानें खाजवूं लागल्या !

व्याख्यान आतां पराकोटीचें चढलें. " प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र आहे. लहान मोठा हीं सर्व कृत्रिम नातीं आहेत. जो तो वाटेल तसें वागायला स्वतंत्र आहे. जनावरांत आपल्यापेक्षां जास्त स्वातंत्र्य असतें. तुम्ही बैलांना नांगराला जुंपतां व गाईंना पिळून काढतां. पण माणसांना असें वागवतां येणार नाहीं. गाई या बैलांपेक्षां श्रेष्ठ आहेत. स्त्रिया या पुरुषांपेक्षां श्रेष्ठ आहेत. त्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळालाच पाहिजे ! गाईंच्या दुधावर बैल पोसतात. स्त्रियांच्या श्रमावर पुरुष जगतात. गाईंनीं व स्त्रियांनीं आपलें महत्त्व ओळ-खून हक्कासाठीं लढावें. जिच्या हातीं पाळण्याची दोरी—"

पाटील घरीं आला. जनावरें घरीं आलीं व त्या गोठ्यांत शिरलीं. पण त्या दिवंशीं एक म्हातारा बैल आजारी असल्यानें रानांत गेला नव्हता. गोठ्यांत परत येण्यास त्यांना उशीर कां झाला याचें त्याला आश्चर्य वाटत होतें.

चौकशी करण्याकरितां तो एका गाईच्या कानाशीं लागला.

पण ती गाय एकदम मान हलवूं लागली. नाकानें जोरांत श्वास सोडूं लागली. डोळे वटारून पाहूं लागली.

त्या म्हाताऱ्या बैलाला सगळाच प्रकार निराळा दिसला. बैल गाईंशीं बोलेनात. गाई बैलांशीं बोलेनात. जो तो व जी ती आपापल्या खुंट्याशीं धुसफुसत होतीं.

म्हातारा बैल शेवटीं तसाच धीर धरून एका कालवडीजवळ गेला.

"काय ग ? काय भानगड आहे ही ?"

"दूर हो ! तूं शिंगाडा बैल आहेस ना ? आम्ही स्वतंत्र होणार आतां ?"

"आं ? स्वतंत्र ? तूं काय मनुष्याच्या जातीची स्त्री आहेस का ? तूं परतंत्र होतीस केव्हां ? काय म्हणणें आहे तुझें ?"

"व्याख्यान ऐकलें मीं एक ! सगळें कळलें मला. पुरुष स्वार्थी आहेत, आम्हाला पिळून काढतात, बनवतात. माता म्हणून चढवतात. बस्स ! आतां मी स्वतंत्र होणार !"

म्हातारा बैल हसूं लागला व मग म्हणाला—

"पण माणसांतले पुरुष असतील तसे. आपल्या समाजांत ही मारामारी कशाला ?"

दीर्घ निःश्वास टाकून तो वृद्ध वृषभ पुढें बोलूं लागला—

"बैल तशा गाई ! तुम्ही खपतां, आम्ही खपतों. कोण कोणाला पिळतो येथें ? हे मानेवरचे नांगराचे चट्टे बघ. आपण या गोठ्यांत इतके जण राहतों. अशीं चार सुद्धां माणसें रहात नसतील. तेव्हां उगाच माणसाच्या बायकांसारखी बिथरूं नकोस. माणसांनीं आपलीं घरें पेटवलीं म्हणून तूं आपला गोठा उधळूं नकोस ! माणसांना आपल्यासारखें व्हायचें आहे.

त्यांना जनावरांसारखें स्वातंत्र्य पाहिजे आहे. ते एकमेकांना आपल्या नांवानें चिडवतात ! म्हणे शिंगाडे बैल व गोगलगाय ! पण बैलासारखे कष्ट व ताकद्‌फार काय गाईच्या कालवडीएवढीही ताकद माणसांतल्या बैलांतसुद्धां नाहीं. ते करूं देत चळवळी. आपण त्रिथरायचें कारण काय ? आपण तर माणसांचीं ध्येयें दैवतें आहोंत ! चल, अशी माणसांतल्या नायकांसारखी मूर्ख होऊं नकोस. चारा मुकाट्यानें खा. धार काढायची वेळ झाली आहे ! ”

आणि खरोखरच त्यावेळीं पाटील चर्वी घेऊन गोठ्यांत शिरत होता !

# प्रेक्षक आणि श्रोते १६

तीस चाळीस हजार लोकांचा प्रचंड समुदाय जमला होता. सभेची व्यवस्था करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या तोंडावर "जितम् जितम्" असें समाधान दिसत होतें. त्यांच्या कपाळावरून घामाच्या धारा सुद्धां एक प्रकारच्या तेजानें चकाकत होत्या.

त्या कार्यकर्त्यांपैकीं दोघे जण एका कोपऱ्यांत बोलत बसले होते.

"आले कीं लोक! काय प्रचंड सभा झाली आहे!"

"आणि कोण लेकाचा म्हणत होता कीं बहिष्कार घालणार आहेत सभेवर!"

"अरे, बहिष्कार घालणारे मुद्धां यांत असतील! तो यशवंत गुप्ते! काल रात्रीं माझ्या खोलींत घसा फुटेपर्यंत भांडत होता कीं तुमची सभा बेकायदेशीर आहे."

"मग तो आला आहे कीं काय?"

"अर्थात्! अरे अध्यक्षाच्या मोटारीबरोबर आंत शिरला. तोंडानें ओरडत होता शेम्-शेम्-शेम् आणि हातानें गर्दी ढकलीत स्वतःला आंत जाण्यासाठीं वाट काढीत होता."

"कंटाळा आला असेल बिचाऱ्याला निषेधाचा!"

"अर्थात्! त्यानें आंत डोकावून पाहिलें, तेव्हां त्याला दिसले आपले सगळे

मित्र, गांवांतले सभ्य, शिष्ट सगळे आंतच आहेत. मग आपणच कशाला ही मतभेदाची आणि तऱ्हेवाईक सत्याची जळती मशाल हातांत घेतली आहे ?"

"पण या नव्या धंडाचीं मतें काय निषेधकांना माहित नव्हतीं ? ते आले याबद्दल आश्चर्य वाटणें म्हणजे आपलें अज्ञान प्रकट करण्यासारखें नाहीं का?"

"एक प्रकारें अज्ञानच आहे हें ! अरे त्या जातीच्या लोकांना मतें नसतात. एका विशिष्ट वयानंतर ते मतें सोडून देतात. संध्याकाळीं कोणत्या तरी सभेच्या आमंत्रणाचा स्वीकार करावयाचा, एवढेंच यांचें कार्य असतें."

"सभेला हीं माणसें फार चांगलीं. संख्येची भरती होते. आणि पुन्हां मतभेदांची धास्ती नाहीं."

"आपण यांना उगाच पेन्शनर म्हणून चिडवतों. पण पेन्शनर मनोवृत्तीचीं माणसें या ३०।४० हजारांत किती तरी सांपडतील. येथें आलेलीं सगळीं माणसें काय आपापल्या मताचे गंडे दोरे बांधून आलीं आहे वाटतें ?"

"म्हणजे येथें प्रत्यक्ष या सभेचा उद्देश वगैरे हेतु कळूनही जर लोक आपापल्या मताची पर्वा न करतां आले असले तर मग आले कशाला ?"

"मतासाठीं आले नाहींत. पेन्शनर मनोवृत्तीनें आले आहेत. त्यांना संध्याकाळीं काम नसतें. व्यायामावर विश्वास नसतो. खेळण्याचें वय निघून गेलेलें. निराळें कांहीं कार्य करण्याइतकी ( लष्करच्या भाकरी भाजण्याइतकी ) ते कोणतीच गोष्ट जिवाला लावून घेत नाहींत. मग काय करावें अशा लोकांनीं संध्याकाळीं ?"

"प्रश्न आहे खरा."

"आणि अशा वृत्तीचा म्हातारपणाशीं कांहीं संबंध नसतो. रोगाचा कांहीं संबंध असतो का ? तीन वर्षांचें कारटें सुद्धां अगदीं गोपाळराव आगरकरांसारखा खोकला होऊन मरतें ! मृत्यूचें वय आणि माणसाची योग्यता यांचा जितका संबंध तितकाच मनोवृत्ति व वय यांचा संबंध ! २२ व्या वर्षीं मरतां मरतां आपण ज्ञानेश्वरासारखे मरतों असें का कोणी समाधान मानतो ? पेन्शनर मनोवृत्तींतच आपला यशवंत गुप्ते नाहीं का बसत ? कांहीं

तरुण पेन्शनर, कांहीं म्हातारे ! लेकाला काम नव्हतें. निषेधाच्या कार्याचा कंटाळा आला, शिरला सभेंत ! पुन्हां सभा संपल्यावर सर्वांच्या आधीं पुढें येऊन तो शेम् शेम् ओरडतो कीं नाहीं पहा ! त्याच्या हातांत ४००–५०० निषेधपत्रकें आहेत तेवढीं संपल्याखेरीज तो घरीं जाणार नाहीं. "

इतक्यांत दारापासून कोणीं तरी शुक् शुक् केलें. या दोन स्वयंसेवकांना उद्देशूनच ते गृहस्थ शुक् शुक् करीत होते.

" काय हो कसली सभा आहे ? "

" व्याख्यान आहे व्याख्यान. या ना आंत. "

" व्याख्यानावांचून सभा होते वाटतं ? मला काय बावळट खेडवळ समजलांत तुम्ही ? मी तुमच्या जन्माच्या आधींपासून पुण्यांत आहें समजलांत. "

" जशी कांहीं पुण्यांत मूर्खांना नि बावळटांना राहण्यास बंदी केली आहे !" एक स्वयंसेवक दुसऱ्याला हळूच म्हणाला.

" नाहीं–तसें नाहीं. रागावूं नका. मला सांगावयाचें होतें, सभा आहे म्हणजे परिषद् नाहीं. "

त्या गृहस्थाच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह दिसूं लागलें ! त्याला हा भेद कळला नाहीं.

" सभा अन् परिषद ? काय म्हणतां तुम्ही कळलें नाहीं मला. "

" नाहीं म्हणजे येथें तिकिट नाहीं. पक्ष नाहीं. परिषद् कोणत्या तरी पंथाची नि पक्षाची असते. तिला ठराव असतात. तिचें अनावर विषयांतर नियमित करण्यासाठीं विषय–नियामक कमिटी असते. संदेश असतात. नंबर असतो. त्याला अधिवेशन म्हणतात. तसें कांऽहीं नाहीं. ही एक सभा आहे."

" अरे जाऊं दे रे ! कोणाला येथें रुखरुख आहे सभेची नि परिषदेची ? व्याख्यान आहे ना ? बस्स झालें तर. "

इतक्यांत आंत आरडाओरड सुरू झाली.

एक व्यक्ति उभी राहिली होती व्यासपीठावर.

त्यानें दोनच शब्द उच्चारले होते.

" लेडीज् अँड जँटलमेन."—

त्याबरोबर सभ्य स्त्रीपुरुष जागे होऊन ओरडूं लागले—

" मराठी–मराठी—! "

" हिंदी–हिंदुस्थानी ! "

" उर्दू–फारशी–तेलगू ! "

आणि मघा स्वयंसेवकाशीं बोलणारा गृहस्थ ओरडतच आंत शिरतां शिरतां ओरडला—

" इंग्रजी–इंग्रजी–इंग्रजी ! "

त्यानें आपल्या विचित्र मागणीबरोबर सर्व लोकांचें लक्ष वेधून घेतलें. लोक तोंडें फिरवून त्याच्याकडे पाहूं लागले.—

मातृभाषेला उचलून धरायचें सोडून हा कोण परकीय भाषा मागतो आहे बुवा !

आपण काय ओरडलों याची त्या गृहस्थांना दाद नव्हती.

" काय हो इंग्रजी इंग्रजी काय ओरडतां ? "

" मग काय ठरलें आहे तुमचें सांगा ना ? मला माहीत नाहीं. मी आत्तांच आलों आहें. "

" हिंदी नाहीं का आतां राष्ट्रभाषा ? "

" हिंदी ? मराठी मेली ? बरं–हिंदी. ओरडा हिंदी ! हिंदी ! "

पुन्हां मोठा आवाज—

" हिंदी–हिंदी–हिंदी "

आणि मग व्यासपीठावर सुरवात झाली—

" भाइयो–ओर भैनो–! "

एकदम शांतता.

पुन्हां ते स्वयंसेवक दाराशीं बोलूं लागले.

" काय ऐकतात लोक लक्ष्य लावून ! "

" वा ! अगदीं टांचणी–बिंदु शांतता ! "

" म्हणजे ?"

" पिन-ड्रॉप-सायलेन्स !"

" आतां ठरावाचें कॅनव्हासिंग करायचें ना ?"

" होय. एकच ठराव आहे म्हणा !"

" पण तोच मिळवायला पाहिजे. म्हणजे मग उद्यां देतों सगळीकडे 'शीर्ष ओळींत' '× चा प्रचंड निषेध !'

" आणि मघां भेटलेल्या व्यक्तींसारख्यांचीं मतें नाहीं ? प्रचंड बहुमत ! वा: ! मतं नसलेल्यांचें बहुमत ! याला म्हणायचें सामाजिक पाठिंबा !"

" मग काय करायचें त्याला ! एवढ्या चाळीस हजार लोकांची खरीं मतें तपासायचीं म्हणजे आभाळाएवढी सूक्ष्मदर्शक किंवा पारदर्शक कांच पाहिजे. अरे, चळवळी अशाच होतात. चळवळीला श्रोत्यांपेक्षां प्रेक्षकच बरे उपयोगी पडतात. हे सगळे प्रेक्षकच आहेत. हे पाहतात, ऐकत नाहींत. यांना काय करायचें ऐकून ! सभेला येतात ते कांहीं मानसिक श्रम करण्यासाठीं येत नाहींत. हे बहुतेक पेन्शनर आहेत. त्यांचें कर्तृत्व संपलें आहे. आतां फक्त मृत्यु देईल तेवढ्या वर्षांचें पेन्शन घेत रहावयाचें !"

इतक्यांत त्या स्वयंसेवकावर एकजण ओरडला.

" अहो बोलूं नका. ऐकूं द्या आम्हाला !"

" लाउड स्पीकर लावलेत कीं ! चार गल्ल्या ऐकूं जातें आहे."

" नाहीं, खालीं बसा. दिसत नाहीं."

" अस्सं" तो स्वयंसेवक आपल्या सहकाऱ्याकडे पाहून म्हणाला, " पहा ! प्रेक्षक आहेत हे, श्रोते नाहींत."

त्या प्रेक्षकाला हें ऐकूं गेल्यानें तो चिडून म्हणाला, " तुम्ही तर ना श्रोते ना प्रेक्षक ! ऐकतही नाहीं आणि अध्यक्षांकडे पाठ करून बसतां !"

" अहो गप्प बसा. आम्ही कार्यकर्ते आहोंत." एक स्वयंसेवक आपल्या फितीकडे बोट दाखवून म्हणाला.

" वा: ! कार्यकर्ते कोणाचें ऐकतही नाहींत. आणि कोणाकडे ढुंकून पहातही नाहींत वाटतं !"

खरोखर जगांत श्रोत्यांची संख्या शून्य झाली नि सगळे प्रेक्षक राहिले तर कार्यकर्त्यांचें कार्य किती सुकर होईल नाहीं ? आणि तसें आहेहि, कारण फोटो जमवणारे लोक फार, ग्रंथ जमवणारे थोडेसे, व असें असल्याखेरीज का बहुजनसमाजाची उन्नति होते ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

# गिऱ्हाइक १७

( एका व्यापाऱ्याचें आत्मचरित्र )

विद्याभ्यास चालू असतांना जो रिकामा वेळ सांपडे तो बहुतेक माझा एखाद्या मित्राच्या हवाली करून मी निर्धास्त रहात असें. रिकामा पडलेला वेळ घेऊन कोणत्या तरी मित्राच्या जवळ नेऊन 'ठेवला' म्हणजे मग मला तो वेळ कसा जाईल याची काळजी करण्याचें कारण उरतच नसे. पण तरी एखादे वेळीं असें होई, मित्र वेळेवर मिळावयाचेच नाहींत आणि अनपेक्षितपणें तो रिकामा वेळ माझ्या बोकांडीं बसे. अशा वेळीं कांहीं प्रसंगीं मी अवांतर वाचन करीं. स्वतःच्या भवितव्याबद्दल विचार करीं. वर्गांतला फळा रिकामा सांपडला व हातीं खडूचा तुकडा लागला कीं, विद्यार्थी जसे काळ्या फळ्यावर पांढरें करून पाहतात त्याप्रमाणें मी भवितव्याच्या काळ्या फळ्यावर कल्पनेच्या खडूनें आशा व मनोराज्यें खरडीत बसें. आणि त्या चिरखाडण्यापैकीं कांहीं वेळा मी व्यापारी झालों अशीं मनोराज्येंही काढीत असें—

'अद्याप ब्राह्मण लोक व्यापारांत पडले नाहींत. तेव्हां तिकडे 'पडायला' भरपूर जागा आहे. सुशिक्षित दुकानदार तेव्हांच गिऱ्हाइकाला खूष करीत. हे लेकाचे बेपारी-मजूर सगळे ! कोणी विद्वान् त्या प्रांतांत गेला नाहीं तोंपर्यंत या मूर्खांना ऐट आहे. व्यापारांत शिरतों आणि सगळे सुशिक्षित गिऱ्हाइक

काबीज करतों. शिकलेला माणूस दोन पैसे जास्त गेले तरी पर्वा करायचा नाहीं. पण त्याला असभ्य वागणूक आवडत नाहीं. तें कांहीं नाहीं. समाजांत एक आदर्श दुकान चालवून दाखवलेंच पाहिजे. अगदीं किराणा-भुसार माल ! पण तेथें सभ्य माणसें आलीं पाहिजेत.'

त्या मनोराज्याची अद्याप मला आठवण होते. अद्याप दुपारच्या वेळीं रखरखीत ऊन पडलेलें असतें आणि गिऱ्हाइकें घरोघर झोपलेलीं असतात आणि मी दुकान उघडून बसतों, त्यावेळीं मला त्या मनोराज्याची आठवण होते. कारण मी खरोखरच त्या मनोराज्याच्या मृगजळाचा पाठलाग केला आणि दुकानदार झालों आहें.

माझ्या डिग्रीची मला कित्येक दिवस आठवण सुद्धां होत नाहीं. कारण मला अगदीं पहिला अनुभव आला तो हा कीं, डिग्री घेऊन मी बाजारपेठेंत गेलों कीं माझ्या धंद्यांतील पिढीजाद लोक मला बावळट समजतात ! त्यांच्या व्यापारांतील आंतल्या खुब्या कळण्यासाठीं मी त्यांच्यांत मिसळतांना डिग्री बरोबर असली कीं, ते मला अस्पृश्यासारखा बाहेर ठेवीत. गादीलोडावर बसवीत, पानसुपारी देत, अगदीं पानपट्टीसुद्धां देत. थोडक्यांत म्हणजे मी आज एखाद्या बड्या गिऱ्हाइकाला जसा वागवतों तसा ते मला वागवीत ! पण मला त्यांच्यांत व्यापारी म्हणून मिसळावयाचें होतें. आणि त्यासाठीं मला डिग्रीचे जोडे बाहेर काढून ठेवल्याखेरीज व्यापारमंदिराच्या आंतल्या गाभ्यात प्रवेश मिळाला नाहीं. स्वावलंबनानें पैसा मिळतो हें माझें हौशीचें तत्त्व होतें. पण आतां ती माझी गरज झाली आहे, आणि आज वेळेवर मी खांद्यावर तांदुळांचें पोतें घेतों त्यावेळीं स्वावलंबनाचा मला आनंद होत नाहीं तर खांदे अद्याप तयार झाले नाहींत याचें दुःख होतें ! नुसता नेहरू सदरा घालून मी कॉलेजांत फिरत असें त्यावेळीं 'साधी रहाणी' याच उच्च विचारांत मी गुंग असें आणि आज—आजही मी कमालीचा साधा रहातों पण तें साध्या राहाणीसाठीं किंवा विचारसरणीसाठीं नव्हे तर इस्तरीचे कपडे घालून मला तुपाच्या आणि तेलाच्या डब्याजवळ वावरतां येत नाहीं याच एका अडचणीनें ! आणि माझ्या मनोराज्यांतील तीं गिऱ्हाइकें ! एक वर्षाच्या व्यापक अनुभवानंतर मीं त्यांचा लोभ सोडला आहे. मी व्यापारांत

पडल्याबरोबर किती तरी सुशिक्षितांनीं मला सक्रिय सहानुभूति दाखविली. माझी खातेवही पहिल्याच महिन्याला पंचवीस पदवीधरांच्या नांवांनीं सुशोभित झाली, पण ती खातेवही काखोटींत मारून मी अद्याप हिंडतों, तीं बिलें वसूल करण्यासाठीं! सुशिक्षित गिऱ्हाईक हें एखाद्या सार्वजनिक चळवळीच्या दुकानदारालाच परवडेल! व्यापारी माणसाला परवडणार नाहीं. सुशिक्षित माणूस हा आपल्या दुकानदाराशीं वेदांत्यासारखा वागतो. त्याला पैसा नश्वर वाटतो. आयुष्य नीरस वाटतें. कर्जबाजारीपणा किंवा उधारी हा दैवयोग वाटतो! हेंच तत्त्वज्ञान सुशिक्षित गिऱ्हाइकें मला नेहमीं पाजतात.

गेल्या दिवाळीचें बिल मागायला एका कलाकुमाराकडे (बी. ए.) मी गेलों, तेव्हां त्यानें बायका आणि त्यांचीं बाळंतपणें यांवर मला एक मुलाखत दिली! आपण काम करीत असलेल्या संस्थेला ६ लाख कर्ज आहे हें सांगितलें. आणि शेवटीं "तुम्हीच सुखी आहांत बुवा! आमचे पहा हाल. गेल्या दिवाळीचें तुमचें बिल द्यावयाला आणखी एक दिवाळी उजाडणार बहुतेक! कारण आज-काल—"

पण मी त्यावेळीं त्याचा निरोप घेण्यासाठीं पायांत बूट घालूं लागलों होतों.

संध्याकाळीं एक सात वर्षांचें पोर आलें! दुकानची पायरी सुद्धां न चढतां रस्त्यांतून ओरडलें, "अहो- शुः! शुः!-अहो वाणी!" मी वर पाहिलें तों आमच्या देशपांडेसाहेबांचे चिरंजीव! त्याचा बाप माझ्याइतका सुद्धां शिकलेला नव्हता, त्याच्या बापाकडे माझी ७० रु. ची उधारी होती, पण तें पोर, माझ्या गिऱ्हाइकाचें पोर होतें ना! मी त्याच्या 'वाणी' या हांकेला सुद्धां ओ दिली! "काय साहेब? काय हुकूम आणलाय्? यादी?" माझ्या निर्लज्जपणाचा मलाच संताप येत होता! पण तो प्रिन्स ऑफ वेल्स ओरडला—

"बदाम बी चे नमुने पाठवून द्या!"

"घेऊन जा ना! हे पहा—"

"मला वेळ नाहीं!" आणि तो प्राणी ऐटींत निघून गेला!

कारण त्याला एकच गोष्ट माहीत होती कीं, आपण गिऱ्हाइक आहोंत व हा वाणी आहे!

अशीं हीं नमुनावारी मणभर तेल जाळणारीं गिऱ्हाइकें मीं आतां तोडलीं आहेत ! त्यापेक्षां सकाळीं फळी उघडल्याबरोबर एका पैशांत चहा व साखऱ्या मागणारी पलीकडल्या खोपटींत रहाणारी 'रखमा' बरी ! कारण ती माझ्या दुकानांत येते, थांबते, एखादा डबा उचलूं लागते आणि चार पैसे बाकी राहिली तरी तिचें मन अस्वस्थ होतें.

पण एखादा व्यापार पत्करल्यावर गिऱ्हाइकांची स्वयंवर पद्धतीनें निवड करणें परवडत नाहीं ! जो येईल तो साहेब ! जी येईल ती बाईसाहेब ! माझ्या दुकानीं येणाऱ्या अशा कांहीं बाईसाहेब आहेत कीं त्यांचें मला दररोज दर्शन होतें पण त्यांचे ' बुवासाहेब ' मला महिनेच्या महिने दिसत नाहींत.

त्यांचे गडी माझे रिकामपणाचे स्नेही आहेत. कारण ते आपल्या मालकांचीं कुलंगडीं मला सांगून त्यांच्या मालकशाहीवर मानसिक सूड घेण्याचें समाधान मानतात. मलाही त्या ' उधार ' सभ्य गृहस्थाची निदान निंदा तरी केल्याचें सुख मिळतें !

कांहीं गिऱ्हाईकसाहेब तर मला मुलाखत घेणाऱ्या रिपोर्टरासारखे वाटतात. अगदीं माझ्यापेक्षां जास्त ऐटीनें ते माझ्या दुकानांत शिरतात. एकदम पोत्यांत हात घालतात आणि प्रश्नांचा भडिमार सुरू करतात—

—" कमोद पाहूं ! "

—" आंबेमोहोर कसे देतां ? "

—" १०० माणसांच्या प्रयोजनाला किती लागतील ? "

—" तुम्ही डायरेक्ट रंगूनहून आणतां का ? "

—" बेलापुरी साखर बरी खपते का हो ? "

—" तुम्हाला पल्ल्यामागें किती मार्जिन राहतें ? "

सगळ्या प्रश्नांना उत्तरें देत मी त्या साहेबांच्या ऑर्डरची वाट पहात राहतों—

आणि मग नमुने पाहून दमल्यावर सुपारी व अडकित्ता घेऊन चहाच्या पेटीवर बसतां बसतां ते विचारतात—

" पुनमचंदला कसें परवडतें हो सगळा माल स्वस्त द्यायला ? "

मी मनांतून चरफडत असतों. किती सुपाऱ्या खपतात हें डोळ्यांनीं पहात असतों आणि तोंडानें मात्र छ्यः ! छ्यः ! करीत असतों.

कांहीं गिऱ्हाइकें नुसत्या बाजारभावाच्या थापा मारीत येतात.

" वाः ! रविवारांत २ आणे कमी पडतात. कालच मीं तीन रुपयांची खरेदी केली. तुम्ही कां महाग देतां ? "

मनांत असें उत्तर तयार होतें—

" लेका, मग रविवार सोडून सोमवारांत कां आलास मरायला ? आणि जेथें तीन रुपयांची खरेदी केली तेथेंच आतां राहिलेले रुपये कां नाहीं उडवीत ! आणि मला रविवारांतले बाजारभाव सांगून बनवतोस काय ? मी काय शनिवारवाड्यांतून माल आणतों वाटतं ? "

पण शेवटीं मी म्हणतों मात्र—

" नाहीं साहेब ! असें नाहीं व्हायचें ! पुन्हां मालामालांत फरक असतो. "

पण अलीकडल्या गिऱ्हाइकांची एक सोईस्कर जात आहे. त्यांना मालाच्या गुणाची कदर नसते. आपण व्यापाऱ्याला–दुकानदाराला–बनवलें याच समाधानाची त्यांना हौस असते.

" तुम्हाला म्हणून २ आणे कमी ! " असें मी एखाद्या गिऱ्हाइकाला चार आणे किंमत वाढवून सांगतों त्यावेळीं त्याच्या तोंडावरचें बावळटपणाचें हसूं, प्रसन्नता, अभिमान, पाहून मला हसूं आवरणें मुष्कील होतें.

" तुम्हाला म्हणून–" असें म्हणत एकाद्या ऐटबाज गिऱ्हाइकाला इतरांपेक्षांही जास्त महाग माल देण्यांत जो आनंद मिळतो तो अस्सल व्यापाराचा खरा आनंद आहे. खरेदीची मी त्यांना वही दाखवतों आणि माझ्या कारकुनाचें मोडी अक्षर समजल्याचा ते आव आणतात—आणि शेवटीं ६ आण्याचा माल सात आण्याला घेऊन ऐटींत जातात. मग मी मनाशीं विचार करतों—

" आतां हे साहेब घरीं जातील आणि बायकोला रुबाब मारीत असतील– पहा, ×× राव आपल्याशीं किती आपुलकीनें वागतो ! आणि त्यांची पत्नी आपल्या पतीच्या सामाजिक वजनाचा विचार करीत डोळे भरून त्यांच्या मुखाकडे पाहील. "

अशा गिऱ्हाइकांच्या सामाजिक इभ्रतीच्या आनंदाची सोय करण्यासाठीं मला रद्दी माल व्यवस्थितपणें सांठवून ठेवावा लागतो !

सुशिक्षित गिऱ्हाइकांची ही ' मधली जात ' मला फार फायदेशीर आहे. हे अव्वल श्रीमंताइतके उधारीला निर्ढावलेले नसतात; मालाच्या बाबतींत चोखंदळ नसतात; उलट विचार न करतां धाडकन् पैसे काढण्यांत त्यांना आनंद वाटतो. बिलावरची बेरीज न तपासतां एकदम पैसे देण्याची ऐट त्यांना मोहक वाटते आणि आपली सामाजिक इभ्रतीची हौस वाण्याच्या दुकानांत जरी भागली तरी जीवितकलहांत हतबल पराभूत झालेल्या त्यांच्या मनाला पुष्कळ बरें वाटतें ! विशेषतः असलें 'मध्यमवर्ग' गिऱ्हाइक माझ्या दुकानीं " मेहुण " आलें कीं मग—पण तो आनंद दुकानदार होऊनच कळेल.

सामाजिक क्रांतीच्या कामीं 'मध्यम वर्ग' निकामी ठरला आहे म्हणतात—पण तें सगळें गिऱ्हाइक मला मिळालें तर हवें आहे ! माझ्या रिकाम्या वेळेचे ते दोस्त आहेत आणि दुकानचे तहाहयात गिऱ्हाइक आहेत.

# शिवरामपंतांचा अपमान १८

हॉटेलांत आम्ही चहा पीत बसलों होतों. चहा हें एक आपलें कारण होतें. विश्रांतिगृहांत आपण जी विश्रांति मिळवतों ती स्वगृहींसुद्धां मिळत नाहीं अशा विचाराचे जे कांहीं लोक असतात त्यांपैकीं आम्ही होतों. दोन तीन पैसे देऊन जितका जास्तींत जास्त वेळ काढतां येईल तितका काढावयाचा असा आमचा विचार होता.

टेबलावर वर्तमानपत्रें होतीं. प्रभात, ज्ञानप्रकाश, चित्रा, वसुंधरा, सकाळ, त्रिकाळ, नवभारत सर्व एकमेकांचे अंगावर लोळत होतीं. फार काय, केसरीच्या सिंहमुखावर विविधवृत्ताचें आरक्त मुख पडलें होतें. कांहीं तरी उचलायचें व कांहीं तरी वाचायचें अशा वृत्तीनें एका गृहस्थानें एक पान उचललें. क्षणार्धांत तें खालीं ठेवून तो उसळला—

" सुटले बुवा शिवरामपंत ! "

" अं–? कोण शिवरामपंत. "

" अहो आपले काळकर्ते ! जप्ती उठली त्यांच्या वाङ्मयावरची. "

" अस्सं ! बाकी आम्ही काय म्हणा ! आमचे आजोबा 'काळ'चे वर्गणीदारच होते. सगळ्या फाइली पडल्याहेत आमच्या गांवीं माळयावर. " एक सभ्य म्हणाले.

" पण त्या जप्त कशा झाल्या नाहींत ? "

" आमचे आजोबा तसे फार वस्ताद होते. त्यांना पहिल्यापासून माहित

होतें कीं, हें पत्र केव्हांतरी जप्त होणार ! त्यांनीं पहिला अंक वाचल्याबरोबर अग्रलेखावर बोट ठेवून आमच्या वडिलांना सांगितलें होतें कीं, ' काळ ' सरकारला पसंत पडणार नाहीं. "

" वा ! त्यांचा राजकारणाचा अभ्यास बराच होता तर ! "

" अभ्यास तसा नाहीं. पण त्यांना अंदाज करण्याची फार संवय होती. सहज कळण्यासारखी गोष्ट असली, सत्य अगदीं जवळ असलें तरी ते अंदाज केल्याखेरीज रहावयाचे नाहींत. "

" अंक जप्त होतील हा अंदाज त्यांनीं कधीं केला होता ? "

" अगदीं ' काळा 'ची जाहिरात पाहिल्यापासून ! आणि आपला अंदाज खरा ठरण्याची ते फार तळमळ बाळगीत ! त्यांनीं ' काळ 'ची जाहिरात पाहिली व तेव्हांपासून ' काळ 'चा प्रत्येक अंक ते सगळ्यांच्या आधीं विकत घेऊन न उघडतां, ' काळ ' एवढीं अक्षरें फक्त पाहून ताबडतोब फाइलीला लावीत ! "

" असें करण्याचा हेतु काय बुवा ? "

" 'काळ' जप्त होणार हा अंदाज ! एक सुद्धां अंक त्यांनीं वाचला नाहीं. 'काळां'त काय येतें यापेक्षां 'काळ' जप्त होणार याबद्दलचा आपला अंदाज खरा कधीं ठरेल याबद्दल त्यांना फार उत्सुकता होती. आम्हीं त्या फाइली मग गांवीं नेऊन टाकल्या. पोलिसांना कदाचित् माहित असेल कीं, आमचे आजोबा ' काळ ' कधींही वाचीत नाहींत. तेव्हां त्यांच्याजवळ 'काळ' असला काय, 'नवा काळ' असला काय, किंवा 'त्रिकाळ' असला काय सारखेंच ! "

" त्या फाइलींत मग 'काळ'बरोबर हे बाकीचेही काळ असतील कदाचित्! "

" असतील—असतील. आमचे आजोबा अतिशय संग्राहक वृत्तीचे होते. तुम्ही कांहींही सांगा. आमच्याजवळ आहे तें हें—ते मोठ्या अभिमानानें सांगत. जप्ती उठली ही बातमी त्यांनीं वाचली असती तर त्यांना कदाचित्—कदाचित् कां, अगदीं नक्की—वाईट वाटलें असतें. जप्ती बसण्याचा त्यांचा अंदाज खरा ठरण्यास उशीर होत होता याबद्दल त्यांना फार वाईट वाटत होतें. ते नेहमीं म्हणत, सरकारचें जप्तीचें धोरण फार चांगलें आहे. "

" कसें काय ? आजोबा काय करीत होते तुमचे ? "

" अव्वल कारकून होते. पण राजकारणाचा त्यांना फार नाद. "

" बरोबर आहे. कारण अंदाज करण्यास राजकारणाइतका मुबलक वाव दुसऱ्या कोणत्या क्षेत्रांत आहे बरं ! जप्तीवरचीं त्यांचीं मतें सांगत होतां तुम्ही."

" त्यांचींच असें नाहीं. माझ्या वडिलांचीं तींच होतीं व माझींही तींच आहेत. "

" पाहूं पाहूं एकदां मतें ? हं ! "

" असें पहा—आज शिवरामपंतांच्या वाङ्मयावरील जप्ती उठल्याबद्दल आपणास आनंद कां वाटतो तर जप्ती बसली होती म्हणून ! "

" वा : ! वाः ! ! "

" ऐकून घ्या. जप्ती बसली तेव्हां लोकांचें त्या वाङ्मयाकडे लक्ष गेलें व जप्ती उठली त्यावेळीं जप्ती उठवण्याचा पराक्रम केल्याच्या आनंदांतच लोक गर्क आहेत. तुम्हाला काय वाटतं आतां बाजारांत ' काळां 'तील निबंधाला सारखी मागणी येईल ? नांव काढूं नका ! पराक्रमाचा खरा आनंद आहे. जिंकलेल्या वस्तूचा प्रश्न नाहीं. जप्त झालेलें अश्लील पुस्तक वाचण्यासाठीं जे वाचक तळमळतात ते खरे त्या पुस्तकाचे वाचक ! आधींचे व नंतरचे नुसते हौशी. त्यांची हौस त्यांना प्राप्तीपेक्षांही जास्त आनंद देते. जप्ती बसली—ठोका निषेध. जप्ती उठली—उडवा अभिनंदनाचे भुइनळे ! पुस्तकें जप्त करून सरकार त्यांची जेवढी जाहिरात करतें तितकी दुसरें कोणीही करीत नाहीं. तुम्ही वाचकांच्या साक्षी काढा. त्यांना नेहमीं आठवणारीं पुस्तकें विचारा. त्यांत ते जप्त झालेल्या पुस्तकांचीं नांवें जास्त सांगतील. त्यांना ' थोरली आई ' आठवेल, पण गॉर्कीची आई किंवा श्यामची आई आठवणार नाहीं. त्यांना झपूर्झा आठवेल, पण तो केशवसुतांचा नव्हे. एकंदरींत काय, कोणत्याही गोष्टीच्या भोंवतीं अलभ्यता, अशक्यता, बंदी, यांचें महावस्त्र गुंडाळलें कीं त्या वस्तूला भाव येतो. समाजांत समाजसेवा, राष्ट्रसेवा करतां करतां हाल भोगणाऱ्या सेवकाकडे कोणी पाहणार नाहीं. तेंच तो माणूस जप्त होऊं द्या. मग अगदीं कोठडींत जाऊन त्याच्या मुलाखती घेतील, त्याच्या पाठीवरचे वळ मोजतील, मोडलेल्या हाडाचे फोटो देतील ! कारण माणूस जप्त झाला कीं त्याला भाव

येतो. आमचे वडील सत्याग्रहाच्या चळवळीच्या वेळीं नेहमीं म्हणत, कीं ब्रिटिश सरकारचा मुत्सद्दीपणा १००–१५० वर्षें वापरून आतां संपत आलेला दिसतो."

"कसा काय ?"

"ते म्हणत, माणसें तुरुंगांत घालून त्यांचा भाव वाढतो हें सरकारला कळत नाहीं. त्यांनीं अगदीं खून केले तरी त्यांना तसें मरूं द्यावें. पण तुरुंगांत घालूं नये. मग आपोआप बसतील गप्प कांहीं दिवसांनीं ! कारण समाजांत लोक आपल्याला विचारीत नाहींत म्हणून तुरुंगांत जाऊन त्यांना शेवटीं ते आपली चौकशी करावयास लावतात. तसेंच ते पुस्तकाबद्दल म्हणत. कांहीं जप्त करूं नये. अश्लील असो, राजकीय असो, खुशाल लिहूं द्यावें. कोण वाचायला बसले आहेत त्यांचें ? पुस्तक खपतें कशाला ? मग एकदां पुस्तक अंगावर आलें कीं आपोआप लागतील कवि कविता करायला नाहीं तर ललित लेखन करायला."

ते गृहस्थ आवेशाच्या तृतीयावस्थेंत बोलूं लागले—

"नको असलेली गोष्ट बंद करण्याचा उपाय बंदी नव्हे. स्वैर मुक्ति ! कॉंग्रेस सरकार अव्वल सरकारला सामील आहे असें म्हणतों मी अगदीं. टिपून घ्या–आमचे पवित्र ग्रंथ सगळे मुक्त करून त्यांचें मातीमोल करून टाकण्याचा बेत आहे त्यांचा. शेतकऱ्यांना सारा माफ देऊन त्यांची चळवळ हाणून पाडायची ! त्यांचें शेतकरी हें वैशिष्ट्य नाहींसें करावयाचें ! आणि मी तर म्हणतों—"

"अंदाज म्हणा, अंदाज."

"अंदाज नाहीं. ठासून सांगतों. ब्रिटिश सरकार एखादे दिवशीं कॉंग्रेस प्रधानांना फितूर करून घेऊन धाडकन् स्वराज्य देऊन टाकील ! मग बसा ओरडत ! मग ५० वर्षें टिकवलेली राष्ट्रीय सभा, ते टिळक, ते दास, ते लालपाल, त्यांचे हाल, त्यांचा त्याग, सत्याग्रह, युद्ध, चळवळी–सगळें सगळें धुळीस मिळेल ! त्या सर्व लोकांशीं प्रतारणा आहे ही प्रतारणा ! जप्त होण्या-इतकें ज्यांनीं तें जळजळीत वाङ्मय लिहिलें तें काय वाटेल त्या मूर्खांनीं वाचण्यासाठीं ! तुरुंगाच्या खडतर तपश्चर्येच्या ध्येयानें ज्यांनीं अचाट कार्यें

केलीं तीं काय हातांत झाडू घेण्यासाठीं ? जप्ती करून एखाद्या व्यक्तीचा वा वस्तूचा भाव खूप वाढवायचा आणि मग एकदम जप्ती उठवून त्याला खूप उंचावरून समाजाच्या तळाशीं लोटून द्यावयाचें हा फार भयंकर डाव आहे. जप्ती उठल्याबद्दल आनंद काय मानतां ! चला. शिवरामपंतांचा हा भयंकर अपमान आहे अपमान ! माझें भविष्य लक्षांत ठेवा.'

" हें कॉंग्रेस सरकार गव्हर्नमेंटशीं फितूर होऊन स्वराज्य देऊन टाकून स्वराज्यावरची जप्ती उठवील व शेवटीं राष्ट्राचा तेजोभंग करील !"

आम्ही विश्रांतिभुवनाच्या मालकाला दिलेले पैसे विश्रांतीच्या मानानें फारच कमी आहेत हें आमच्या लक्षांत येऊन आमची सभा मोडली !

# माणसाचा पहिला प्रश्न–मृत्यु ?  १९

आपला नव्हे, दुसऱ्याचा ! कारण आपल्याला दुसऱ्याच्याच मृत्यूबद्दल विचार करतां येतो. मृत्यूचें अस्सल स्वरूप आपल्याला दुसऱ्याच्याच मृत्यूंत दिसतें आणि तें आपल्या नातलगांच्या, फार जवळच्या नातलगांच्या ! ज्या मृत्यूच्या पुण्यतिथि होतात, स्मारकें होतात, मोठमोठे मृत्युलेख होतात ते मृत्यु आपल्याला मृत्यूची खरी ओळख करून देत नाहींत आणि आपला मृत्यु या विषयाच्या जवळ आपण फारसे सहसा जात नाहीं. आपण ज्या किंवा ज्याच्या मृत्यूशीं झगडलों आहोंत, ज्या झगड्यांत आपण आपलें तन–मन–धन खर्च केलें—आणि जें सामर्थ्य पूर्णपणें फोल ठरून शेवटीं मृत्यूनें आपणांस पराभूत केलें आहे असा मृत्यु आपणांस मृत्यूचें खरें स्वरूप दाखवतो !

माणसाला मृत्यूचें प्रथम दर्शन केव्हां झालें असेल ? मृत्यूचें दर्शन होण्यासाठीं कमींत कमी दोन प्राणी लागतात. एक मरणारा व दुसरा ज्याच्या डोळ्यांसमोर तो मरणारा मरत आहे तो ! जगांत केव्हां तरी असा काळ असेल कीं नाहीं, कीं ज्या वेळीं जगांत एकच माणूस होता. पहिला माणूस तो. माणसाच्या ज्ञानाच्या मर्यादेंत बोलावयाचें तर तो आपल्या सगळ्यांचा परमेश्वरच ! आणि त्या पहिल्या माणसाला माणसावांचून करमेना म्हणून मग त्याला एक जोडीदार मिळाला. ही बहुधा स्त्री असावी. जगांत आलेलें पहिलें जोडपें तें ! त्यांनीं खूप हिंडून सगळ्या जगाची पाहणी केली असेल

आणि त्यांना शेवटीं वाटूं लागलें कीं बरी आहे जागा ! मग त्यांनीं बाकी-च्यांना निरोप पाठवला. "या रे या रे सारे जण !"

तितक्याच उत्साहानें त्या या जगांतल्या पहिल्या प्रवाशांनीं बाकीच्यांना हाक मारली असेल आणि किती तरी जण सारखे येऊं लागले आणि जों जों ते जगभर हिंडूं लागले तों तों त्यांचा आनंद दुणावला गेला. प्रचंड उंच पर्वत, घनघोर अरण्यें, सुंदर हिरवळी, आणि त्या नद्या–नाले–ओढे. ते हजारों आकारांचे लहानमोठे प्राणी ! पाहतां पाहतां डोळे दमून गेले आणि कोणाला तरी डोळे जडावल्यासारखें वाटूं लागलें. त्याला झोंप म्हणतात हें कोठें कोणास माहीत होतें ! बाकीचे सर्व सहप्रवासी घाबरले. तो दमलेला प्रवासीही घाबरला. असें काय होतें हें ? डोळे मिटूं कां लागले ? पण असें वाटतां, वाटतां डोळे मिटतां मिटतां त्याला सुखही होऊं लागलें आणि तो इतरांना म्हणाला, "–अरे दोस्तांनो, मला डोळे मिटून कांहीं निराळेंच सुख मिळत आहे. तेव्हां क्षणभर पाहतों मी डोळे मिटून ! पहा, तुम्हीही पहा. काय ? तुमचे डोळे पाहून पाहून जड झाले नाहींत ?–" पुष्कळांचे डोळे मिटूं लागले होते आणि मग मिटल्यावर बरेंहि वाटूं लागलें. पण—कांहींच्या मनांत शंका आली. सगळेच डोळे मिटूं नका ! कांहींजण डोळे मिटून पडा व कांहीं पाहरा करीत बसा. एकादा चांगला देखावा तेवढ्यांत दिसला तर डोळे मिटणाऱ्यांना कसें कळणार ?

शेवटीं कांहींजण डोळे मिटण्याचें सुख अनुभवीत होते व कांहीं ती सुखावस्था घाबरत पहात होते. त्यांना नंतर वाटूं लागलें, किती वेळ हे असे पडणार ? यांना पुन्हा उठण्याची आठवण आहे कीं नाहीं ? आतां हांक मारूनही उठत नाहींत ! पण बऱ्याच वेळानें ते उठले. काय अपूर्व आनंद वाटला त्यांना ! थकवा गेला. हुशारी आली, सगळें जग नवें वाटूं लागलें. आणि त्यांनीं आपला अनुभव सांगितल्यापासून मग प्रत्येकजण दमल्यावर निर्धास्तपणें डोळे मिटून पडूं लागला. आपण आपोआप जागे होतों ही खात्री झाल्यावर मग माणसांना झोपण्याची भीति वाटेनाशी झाली. किती मोठी सुरक्षितता आहे ही ! म्हणूनच मला वाटतें कीं, एका कवीनें याला ईश्वराची दया म्हटलें आहे.—

'घेतों झोंप सुखें फिरून उठतों, ही ईश्वराची दया ! ॥'

फिरून उठावयाची झोपेंत आठवण राहिली नाहीं तर—? या धसक्यानें आलेली झोप सुद्धां उडेल !

माणसाच्या त्या पहिल्या टोळींत शेवटीं हा प्रसंग आला. एक दिवस सर्व जण उत्साहानें फिरत होते. एकजण जरा कुणकुणत होता. त्याला दररोजच्यापेक्षां निराळेंच वाटूं लागलें. आणि दररोज हें निराळें वाटणें वाढत होतें. त्याचें अंग तापलें–डोक्यांत कांहीं विचित्र वाटूं लागलें. हातपाय उचलवेना. पहिलें दुखणें तें जगांतलें ! त्या बिचाऱ्यालाही कळेना असें काय होतें तें ! आणि इतरांनाही त्याच्याकडे पाहून जें वाटे त्या वाटण्याचाही अर्थ कळेना ! डोळ्यांत पाणी येऊं लागलें. त्याबरोबर सर्व जण घाबरले. हें काय ? डोळ्यांत कांहीं चीर पडली काय ? त्यांनीं पहिले अश्रु पुसले. पुन्हा आले. इकडे त्यांचा तो दोस्त दमून थकून खालीं बसला. शेवटीं निजला आणि सर्वजण त्याच्याकडे 'आ' करून पाहात राहिले; पण एक म्हणाला, '–अरे त्याला डोळे मिटूं द्या ! कांहीं वेळानें बरें वाटेल !–'

सगळ्यांना पटलें तें. मानवजातींतल्या त्या पहिल्या रोग्यालाही पटलें आणि त्यानें डोळे मिटले. पण कांहीं वेळानें त्यानें हातपाय झाडायला सुरुवात केली. प्रथम इतरांना वाटलें उठला वाटतें ! पण उत्साह दिसेना. 'काय रे ! उठणार ना ? चल भटकायला ?' एक ना दोन ! जीभ वळवळे पण शब्द फुटेना ! डोळ्याचीं बुबुळें गरगर फिरूं लागलीं; आणि मग त्यानें पुन्हा डोळे मिटले.

किती तरी वेळ झाला. इतर दोस्तांना आतां त्याच्यावांचून राहवेना. ते त्याला हांका मारूं लागले, हालवूं लागले. त्याला त्यांनीं उठवून उभें केलं व तो सोडल्याबरोबर धाडकन् पडला ! हातपाय ढिले झाले. तोंड उघडेना. आवाज नाहीं ! हालचाल नाहीं !

सगळ्यांना छातींत, पोटांत, डोक्यांत कळा निघत आहेत असें वाटूं लागलें. पुन्हां ते 'अश्रु' आले. आणि ते थांबेनात ! जगांतला पहिला मृत्यु तो ! पण त्या पहिल्या टोळीला काय माहीत त्याचें स्वरूप, त्याचा अर्थ !

माझी खात्री आहे ते आपल्या झोपलेल्या दोस्ताच्या शवाजवळ कित्येक

महिने बसून राहिले असतील. केव्हांतरी तो उठेल अशा वेड्या आशेनें त्यांनीं त्याचा मृत देह बरोबर वागवला असेल. स्वतः झोपावयाच्या वेळीं कोणी तरी ते त्याच्या झोपेवर पहारा करीत जागत बसत असतील. आजसुद्धां कांहीं समाज त्याच वेडेपणानें मृतांचीं शवें झांकून स्वच्छ करून ठेवतातच ना ? आणि त्यांना 'वेडे' म्हणून हसणारे जे समाज त्या शवाला भस्मीभूत करतात त्यांना काय त्या वेड्यांपेक्षां या प्रसंगाचें जादा ज्ञान असतें काय ? त्यांनाही हा प्रश्न सुटला नाहींच ! 'तें' सगळें करीत असतांना पहिला मृत्यु पाहिलेल्या माणसाच्या टोळीसारखाच मनाचा गोंधळ होतो–कीं काय झालें आहे ? आणि आपण हें काय करीत आहोंत ? त्या पहिल्या टोळीला झोप कळली ! पण कोणास ठाऊक त्यांना किती दिवसांनीं आपल्या त्या दोस्ताच्या विचित्र झोपेचा अर्थ कळला ? किती दिवसांनीं त्यांचे अश्रु थांबले ? किती दिवसांनीं त्यांच्या अंतःकरणांतली कालवाकालव थांबली ?

पण तेव्हांपासून जगांत त्या झोपेचा–मृत्यूचा–अर्थ कळण्याचे प्रयत्न चालू आहेत. हजारों जिवंत माणसें याचा शोध करीत आहेत आणि हा शोध त्या झोपेचा–मृत्यूचा–अर्थ लावण्यापेक्षां मृत्यूमुळें जिवंत माणसांना होणारें दुःख कमी करण्यासाठींच विशेषतः चालला आहे. मृताच्या नातलगांची समजूत घालण्याचा किती तरी मार्गांनीं सर्वजण कित्येक वर्षांपासून प्रयत्न करीत आहेत. आणि स्वतःच्या काळजाचा एखादा तुकडा मृत्यूनें तोडला कीं त्याच समजुती स्वतःवर घालून पाहिल्यावर त्यांना अनुभवास येतें कीं, तें भेसुर दुःख झांकून टाकण्याएवढी ऐसपैस समजूत अद्याप सांपडत नाहीं.

आत्मा आहे, तो अमर आहे. तनु नाशवंत आहे, वरच आहे तो. जगरूढि आहे, जन्म आहे तेथें मृत्यु आहेच. दैव आहे.—काय वाटेल तें सांगून पाहिलें तरी तें दुःख ऐकत नाहीं. मग त्या दुःखाचें तत्त्वज्ञान करून पाहण्याचे प्रयत्न होतात. मृत्यूच खरा–जीवन खोटें–असें एकदां म्हणून पाहतात. पण पुन्हां मृत्यूनें स्वतःच्या काळजाचा लचका तोडून विचारलें कीं, सांगा याचा अर्थ ? कीं मग पुन्हां जगांतल्या पहिला मृत्यु पाहिलेल्या त्या मृताच्या दोस्तांसारखीच स्वतःची धांदल होते. पुन्हां तेच अनावर अश्रु ! तीच कालवाकालव. दूरचे मृत्यु पाहून आपण जमवलेलें तत्त्वज्ञान कमी पडूं लागतें आणि आपण अगदीं पहिल्यापासून विचार करूं लागतों कीं, हा आपला प्रियकर, हा आपला जीव कीं प्राण

असें कां करतो ? त्याला हांका मारण्याचा आपण धडाका सुरू करतों. त्याला ती भयंकर झोप घेऊं न देण्यासाठीं आपण वाटेल ती धडपड करतों. अंजनें घाला, टोचून पाहा, चिमटे घेऊन पाहा, शेकून पहा, चटके देऊन पहा– आणि तो त्या मृत्यूच्या पांघरुणांत भराभर गडप होत असतो ! आणि आपले विचार मग चालू होतात—काय कारण झालें असेल ? कोणी त्या कारणाचीं शास्त्रीय नांवें सांगतात—हार्ट नि लिव्हर ! पण तरी आपला प्रश्न कायमच. पण तरी सुद्धां हें असें कां ? हा आपला प्रश्न आहेच.

माणसाचें समाधान करील असें या दुःखाचें–प्रश्नाचें उत्तर सांपडत नाहीं म्हणून मग मघा सांगितलेले खेळ–आत्मा अमर आहे, वगैरे ! तें मृत्यूचें ज्ञान आहे का ? कीं अज्ञान झाकण्याची धडपड आहे ? दुःखाला गप्प करणारें उत्तर आहे का तें ?

जगांत पहिला मृत्यु होऊन अनंत वर्षें लोटलीं परंतु अद्याप मृत्यु अगदीं जवळ आला कीं त्या आदि मानवांच्या टोळीसारखीच आपलीही मनःस्थिति वावरते ! आपला पहिला धडा अद्याप पुरा व्हावयाचा आहे ! इतकीं वर्षें मोठमोठ्या महात्म्यांना जो प्रश्न सुटला नाहीं तो आपल्याला कसचा सुटणार ? अशा विचारांनीं आतां आपण तो धडा–तो प्रश्न–सोडून देण्याचाच प्रयत्न करतों. त्या प्रश्नाचें उत्तर म्हणजे तो प्रश्नच विसरणें हा मार्ग आपण पत्करला आहे ! विस्मृतीची माती मराभरा लोटून आपण तो प्रश्नच गाडून टाकतों. आपल्या पहिल्या प्रश्नाची ही वासलात लावून आपण इतर अवांतर ज्ञाना-साठीं मोकळे होतों, पण तो पहिला प्रश्न ?

# अध्यक्षांची सभा

## २०

" आज रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां 'ज्ञानदान' सभेचा वार्षिक समारंभ ज्ञानमंदिरांत मोठ्या थाटानें साजरा होणार आहे. त्या प्रसंगीं नामदार—अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत व इतरहि नामदार हजर राहणार आहेत. नामदार—( अध्यक्ष ) 'ज्ञान' या विषयावर व्याख्यान देतील तरी मंदिराच्या सर्व सभासदांनीं व ज्ञानेच्छु लोकांनीं हजर रहावें अशी चिटणिसांची विनंति आहे."

वरील बातमी वाचल्याबरोबर तो अतिशय अस्वस्थ झाला. त्यानें २।३ वेळां ती बातमी वाचली आणि नंतर समोरच्या भिंतीवरील अक्षरांकडे तो पहात राहिला.

"ज्ञानमंदिर वार्षिक समारंभ १९३७" हीं तीं अक्षरें होतीं. त्याच्या खोलींत तीं दिसण्याचें कारण तो त्या समारंभाचा, १९३७ च्या समारंभाचा अध्यक्ष होता. त्या समारंभाचें तें मोठें छायाचित्र होतें व त्या छायाचित्रावरच वरील अक्षरें लिहिलीं होतीं.

कांहीं वेळानें तो अक्षरांच्या ओळीवरून माणसांच्या ओळीवर उतरला व मग मध्यभागीं खुर्चीवर पुष्पहारांनीं मंडित अशा खुर्चीवर बसलेल्या एका व्यक्तीच्या छायाचित्रावर त्याची नजर खिळली. ती व्यक्ति म्हणजे तो स्वतःच. तोच १९३७ च्या समारंभाचा अध्यक्ष होता आणि खिशांतल्या दिडक्या खर्चून त्यानें तें समारंभाचें छायाचित्र विकत घेतलें होतें !

वार्षिक समारंभ १९३७ !

वार्षिक समारंभ १९३८ ! !

किती फरक झाला एक वर्षांत !

गेल्या वर्षीचे समारंभ-चिटणीस त्याच खोलींत एके दिवसें सकाळीं आले. किती नम्रपणें बसले. मंदिराची माहिती त्यांनीं सांगितली. मंदिराशीं संबंध असलेल्या लोकांचीं व बड्याबड्या लोकांचीं, त्याच्या व्यवसायबंधूंचीं त्यांनीं नांवें सांगितलीं. आणि—आणि—

शेवटीं त्या चिटणिसांनीं त्याला अध्यक्षपदासाठीं विनंति केली. रिवाजाप्रमाणें त्याला प्रथम नकारच देणें जरूर होतें. महत्त्वाचीं कामें ही सबब सांगणें जरूर होतें. त्याच दिवशीं परगांवचें बोलावणें आहे हेंहि चिटणिसास कळवणें जरूर होतें आणि पहिल्या भेटींत चिटणिसास मोघमांतच सांगितल्यावर दुसऱ्या भेटींत आमंत्रण स्वीकारावयाचें असा प्रघात होता तो त्यानें पाळला. किती भाव होता १९३७ सालीं ! न्यावयास मोटार, बोलण्याचा सुद्धां आग्रह नाहीं. घरीं पोंचवण्यास मोटार, काय वाटेल तें घ्या पण या, असा भाव गेल्या वर्षीं !

असा भाव आजपर्यंत होता. अध्यक्षीय हारांनीं त्यांच्या घरीं माळ्याचें दुकान झालें होतें. घरच्या मंडळींना गजरे मिळत. दोऱ्याचें एक बंडल तयार झालें होतें आणि हारांतील पानांच्या निर्माल्याचा ढीग साचत असे ! निमंत्रणपत्रिकांच्या डिझाइन्सचे सर्व नमुने त्यांच्या घरीं जमले होते. भाजीबाजाराची यादीसुद्धां एकाद्या निमंत्रणपत्रिकेच्या पाठीवरच तयार होई, आणि अध्यक्षीय भाषणांचा संग्रह हेंच त्याच्या घरांतील वाङ्मय होतें ! कोणतेंहि नवें आमंत्रण आलें कीं भाषण तयार करण्यासाठीं तो तें वाङ्मय काढी व २।४ जुनीं व्याख्यानें मोठ्या खुबीनें मिसळून कांहीं "ताजा कलम" घालून तो नवें व्याख्यान तयार करी. साधें व्याख्यान झालें तरी त्याचा तो लेख तयार करी. चिटणिसांनीं प्रसिद्धि दिली नाहीं तरी तो त्या लेखाखालीं टीप मारी 'येथें' प्रसंगीं, रोजीं दिलेलें व्याख्यान !

कांहीं सभांचीं आमंत्रणें तर ठरलेलीं असत. तिथिवाराइतकें तें निश्चित. आषाढांत ११ व्या दिवशीं आषाढी एकादशी यावयाची म्हणजे यावयाचीच,

तशींच त्याचीं कांहीं आमंत्रणें ठरलेलीं असत. त्यांत अध्यक्ष होण्याचे प्रसंग, व्याख्यान देण्याचे प्रसंग हेहि ठरलेले असत. गणपति बोलावून आपण जशी घराच्या रंगरंगोटीची तयारी करतों; कारण दिवाळी येणार, पुढल्या महिन्यांतच येणार हें आपल्याला अनुभवानें नक्की, माहीत झालेलें असतें, त्याप्रमाणें कांहीं कांहीं सभांचे दिवस जवळ आले कीं तो व्याख्यानें तयार करूं लागे ! आणि त्याचे अंदाज सहसा चुकत नसत. पहिल्या आमंत्रणांत अडचणी, अशक्यता वगैरे किती प्रमाणांत करावयाचें, त्यांतून दुसरें आमंत्रण कसें आणावयाचें, मग चिटणिसावर मेहेरबानगी लादून आमंत्रण कसें स्वीकारावयाचें वगैरे सर्व 'तंत्र' त्याचें पाठ झालें होतें.

कारण तो त्याचा व्यवसायच होता. पोटाची निराळी कामगिरी होतीच. पण तरी मुख्य व्यवसाय वक्ता नि अध्यक्ष हाच ! आणि असे त्या गांवांत त्याचे पांच सहा व्यवसायबंधू होते. सगळयांची एक तऱ्हा. विद्वत्तेचीं विषयवारीचीं लेबलें मात्र निराळीं. या व्यवसायांतूनच त्यांचें अमुक एका विषयावर प्रभुत्व आहे असा लोकभ्रम पसरला होता. प्रत्येकाचा प्रभुत्वाचा विषय लोकांना माहीत झाला होता. त्या त्या सभेचे चिटणीस त्या त्या अध्यक्षाच्या 'प्रभुत्व' विषयाचा प्रास्ताविक ओळखींत उल्लेख करीत. वारंवार त्या विषयाचा त्यांच्यासंबंधानें उल्लेख झाल्यामुळें ते त्या विषयांतले विद्वान् असें समजण्याची रूढि पडली होती ! मग संस्था कोणतीही असो, समारंभाचा प्रसंग कांहींही असो, विषय कांहींही असो, आपल्या प्रभुत्वाच्या विषयावर टोपी टाकून मग ते वाटेल त्या विषयांत चक्कर मारून येत. केव्हां तरी चार ओळी एखादें चोपडें त्या प्रभुत्व विषयावर लिहून टाकलें कीं मग पुन्हा त्या विषयावरचा अधिकार अबाधित राही ! खरी गोष्ट अशी होती कीं, अध्यक्षपदाचें 'कंत्राट' घेणारे ५।६ च कंत्राटदार त्या गांवांत होते आणि त्या मानानें गांवांत सभेचें वेड फार. पुष्कळ वेळां त्याच त्या व्यक्ति निरनिराळ्या संस्थांचे सभासद असत. एखादी व्यक्ति या संस्थेची चिटणीस तर त्या संस्थेचा श्रोता, कोठें खजिनदार तर कोठें हिशेबतपासनीस ! पण एकंदरींत संस्थांचें वेड त्या गांवांत फार. त्यामुळें या ५।६ अध्यक्षांवर अतिशय बोजा पडे व आपल्या लोकप्रसिद्ध विषयावर कांहीं लेखनवाचन करावयास त्यांना वेळच मिळत नसे. लोकांनीं त्यांना

विद्वान् म्हणून पत्करलें होतें. आणि संसर्गजन्य रोगासारखी त्यांची लोकप्रियता वाढत होती. येईल त्या आमंत्रणाचा स्वीकार करून ते काम पार पाडीत. त्यांच्या आयुष्याची सार्वजनिक बाजू वैयक्तिक बाजूपेक्षां फारच मोठी असल्यानें त्यांच्या आयुष्याला बेढबपणा आला होता. पण ती गोष्ट आतां त्यांच्या हातची राहिली नव्हती. इतिहासवाला संगीत परिषदेचा अध्यक्ष होई तर कादंबरीकार औद्योगिक संस्थेचा उद्घाटन समारंभ साजरा करी. समाजशास्त्रज्ञ तंतुकलागृहाच्या वार्षिक सभेचा अध्यक्ष, तर संतवाङ्मयविशारद इटालियन वाङ्मयाचें आधुनिक स्वरूप या विषयावर अधिकार–वाणीनें बोले !

गणपति उत्सवांत तर या अध्यक्ष जातीच्या लोकांना इतकें काम पडे कीं, अनंतचतुर्दशीच्या दिवशीं गणपति बाहेर पडल्याबरोबर हे घरांत आजारी पडत.

पण १९३८ सालांत क्रांति झाली व तो अध्यक्ष एक क्रांतिकारक वृत्तच त्या दिवशीं वर्तमानपत्रांत वाचून दुःखी झाला होता ! कॅांग्रेसनें अधिकार-स्वीकार केल्यापासून त्या अध्यक्षांचे दिवस फिरले होते. त्याचेंच उदाहरण पहा. गेल्या कित्येक महिन्यांत ना अध्यक्ष ना वक्ता ! घरांतल्या मंडळींना गजरे न मिळाल्यानें त्यांचे केशसंभार कोमेजून गेले होते. बरेच दिवस व्यासपीठावर जाण्याची वेळ न आल्यानें त्यांच्या घशाचा कांहीं भाग मिटून गेला होता. त्याच्या पत्नीनें कित्येक दिवसांत पेटींतलें ठेवणीचें पातळ बाहेर काढलें नव्हतें. वर्तमानपत्राचे रकाने त्याला आतां नीरस वाटत. कांहींही बौद्धिक श्रम न करतां चेहऱ्यावर एक प्रकारचें गांभीर्य आलें होतें आणि तो असा खिन्न होऊन स्वस्थ बसला कीं, गेल्या कित्येक वर्षांत आपल्या ज्ञानांत कांहींही वाढ झाली नाहीं याची त्याला जाणीव होऊन जास्तच वाईट वाटे ! विद्याव्यासंगाच्या सुरुवातीलाच अध्यक्ष होण्याची संवय लागली व एकदां तो व्यवसाय पत्करल्यानंतर त्याला सभासंमेलनाच्या तालमीमुळें विद्या वाढविण्यास वेळच झाला नाहीं. व्याख्यानांचीं आमंत्रणें आल्यापासून तीं व्याख्यानें वर्तमानपत्रांत छापून आणीपर्यंत पुन्हा दुसऱ्या व्याख्यानाची वेळ येई ! अशा दंगलींत इतकीं वर्षें गेलीं. आतां तो व्यवसाय सुटला आणि ज्ञानार्जनाचें वय निघून गेलेलें !

तो काँग्रेसचा सभासद नव्हता. तरी आतां त्याचा घटनाभंगावर एकदम जास्त विश्वास बसला. ' मंत्रिपदें सोडलीं पाहिजेत, नाहींतर मंत्र्यांनीं अध्यक्ष, वक्ता इत्यादि बारीकसारीक कामें सोडून घटनाभंगाचें काम करण्याकडेच सर्व शक्ति खर्च केली पाहिजे, गांवांतील सभा–समारंभांत त्यांनीं वेळ घालवणें चांगलें नाहीं, त्यामुळें मानाचा मोह वाढतो व कर्तव्य बाजूस पडतें—' अशीं मतें तो बोलूं लागला !

शेवटीं त्याला एक कल्पना सुचली. आपले ५।६ व्यवसायबंधु आठवले. त्यांचेहि हेच हाल असणार; तेव्हां सर्व धंदेवाईक अध्यक्षांचीच संघटना करावी आणि शिष्टमंडळ नेमून प्रधानमंडळाकडे जावें. बस्स ! पुन्हा "सभा" मिळाली. त्या कल्पनेवरच तो इतका खूष झाला कीं, हातांतलें वर्तमानपत्र फेकून देऊन " अध्यक्षांची सभा " बोलावण्याच्या खटपटीस तो घराबाहेर पडला !

# निरुपयोगी सज्जन ! २१

तो एक सज्जन गृहस्थ होता ! तो विद्यार्थी असतांना सुद्धां त्याच्या सज्जनपणाची ख्याति होती' आतां त्याचें शिक्षण पुरें झालें होतें. त्याला नोकरी लागली होती. त्याच्या ऑफिसमध्येंहि त्याच्या सज्जनपणाची ख्याति होती. तो एका वाड्यांत भाडेकरी होता. भाडेकऱ्यांतहि सज्जन भाडेकरी म्हणून त्याची कीर्ति होती. फार काय, जरी त्याचा सहवासोत्तर प्रेमविवाह झाला नव्हता तरी त्याच्या सासरीं सज्जन जांवई म्हणून व त्याच्या बायका-मुलांतहि 'सज्जन' म्हणून त्याचें नांव प्रसिद्ध होतें ! त्याच्या ओळखीच्या कोणत्याही गृहस्थाला विचारा—'फाऽर सज्जन माणूस !' असे उद्गार ऐकूं येतील आणि त्याच गृहस्थाला तुम्हीं विचारलेंत कीं "काय हो, म्हणजे कसा काय सज्जनपणा कळला तुम्हांला त्याचा ?" तरी पुन्हा तेंच उत्तर येईल कीं "तसें कांहीं नाहीं ! पण फार सज्जन माणूस !"

त्याच्या सज्जनपणाचें स्वरूप कळून घेण्याची मलाही उत्सुकता होती. एका सभेंत त्याची व माझी गांठ पडली. खूप गर्दी झाली होती. तो श्रोत्यांच्या मोठ्या वर्तुळाच्या अगदीं कडेला बसला होता. मी त्याच्या मागें उभा होतों. कोणी बसलेला श्रोता कंटाळून किंवा घरीं काम आहे याची आठवण होऊन उठला तर पटकन् त्याची जागा मिळवावयाची असा माझा बेत होता.

इतक्यांत हा सज्जन एकदम उठला. त्यानें मागें पाहिलें. मीच त्याला समोर दिसलों आणि तो अत्यंत प्रेमळ चेहरा करून मला म्हणाला,

" बसा कीं ! मला जायचें आहे. "

जसा कांहीं मी त्याच्या आग्रहाची वाट पहात होतों ! पण तरी मला आश्चर्य वाटलें त्या व्यक्तीच्या प्रेमळपणाचें !

आणि दुसरी गांठ अशीच एका जाहीर ठिकाणीं पडली. मी तेथें स्वयंसेवक होतों. हा सज्जन जरा उशिराच आला. मीं त्याला पाहिल्याबरोबर ओळखलें आणि हसलोंही !

तीच निरुपद्रवी मुद्रा ! रागहि नाहीं, प्रेमहि नाहीं, उत्साह नाहीं, नैराश्य नाहीं, धांदल नाहीं नि संथपणा नाहीं. पोशाखसुद्धां तसाच. ना स्वस्त ना महाग. सगळें आपलें ' नॉर्मल ' होतें त्याचें.

मी हसलों. तोहि हसला ! पण एकदम त्याचें हसूं त्याच्या चेहऱ्यावरच जिरलें. पुन्हा तो नॉर्मल चेहरा.

" या ! इकडून या. जागा देतों ! " मी म्हणालों.

" नको-नको, मला मुद्दाम जागा नको. मी काय घरीं सुद्धां जाईन. मला ऐकायलाच पाहिजे असें नाहीं. "

आणि तो सज्जन गृहस्थ तितक्यांतच शांतपणें तोंड वळवून दाराकडे पावलें टाकूं लागला.

मी मनांत म्हणालों—आणि तो दूर गेल्यावर मोठ्यानेंहि म्हणालों—' मग आलांत कशाला ? ' माझें स्वागत नि सेवा त्यानें झिडकारल्याबद्दल मला वाईट वाटलें होतें. कारण कांहीं शिष्ट माझ्याकडून हक्कानें सेवा घेत होते; आणि अगदीं अनिच्छेनें मी ह्यॅं ह्यॅं करून हातवारे करीत त्यांचें स्वागत करीत होतों. पण या सज्जनाची सेवा करावी म्हणून पुढें झालों तर ही स्वारी अशी !

हाच त्याचा स्वभाव होता. त्याची व माझी किती तरी वेळां गांठ पडते. आतां त्याला कोठेंहि पाहिलें कीं मी त्याच्याकडे पहात राहतों. तोहि पाहतो. मी हसतों, जरा हात उचलतों. त्यालाही समजतें तें ! पण यापेक्षां त्याची माझी ओळख वाढतच नाहीं. तो कधीं माझ्या घरीं येईल असें वाटत नाहीं. मला त्याच्या घरीं जावेंसें वाटण्यासारखें त्यानें मला उत्तेजन दिलें नाहीं. मी मुद्दामच कांहीं कांहीं वेळां त्याला विचारतों, " काय, फिरायला निघालांत ?" —" काय ? आज इतका उशीर ? "—" काय ? आज सुटी असेल ना ? "

पण " हो, ना " यांपैकीं खरें असेल तें उत्तर देण्यापलीकडे त्यानेंहि मला जास्त लघळपणा करण्यास संधीच दिली नाहीं.

एकदां मी न कळत तो रहात होता त्या वाड्यांत गेलों होतों. माझा एक मित्र रहात होता तेथें. हा सज्जन तेथें होता.

मीं विचारलें—" काय ? येथें रहातां वाटतें ? "

तो आश्चर्यचकित सुद्धां झाला नाहीं मला तेथें पाहून ! ' इकडे कोणीकडे ?' असेंहि त्यानें विचारलें नाहीं. मीं विचारलेल्या प्रश्नाचें अत्यंत मोकळेपणानें त्यानें एकाक्षरी उत्तर दिलें.

" हो. "

पण त्या एकाक्षरांत तुसडेपणा नव्हता, आपलेपणाही नव्हता. माझ्या प्रश्नाचें स्वागतही नव्हतें, तिरस्कारहि नव्हता.

त्याची मंडळी तेथें दिसत होतीं. तीन-चार मुलें होतीं आणि क्षण दोन क्षण त्या घरांत मी डोकावलों तरी तेवढ्या वेळांत मला कळलें कीं त्याच्या कुटुंबांत सुद्धां त्याच्याच सज्जनपणाची दाट छाया पसरली आहे. मुलें खेळत होतीं, आनंदित होतीं. पत्नी कांहीं तरी काम करीत होती. पण सगळें सज्जनपणाचें शांत वातावरण !

मीं मग माझ्या मित्राला विचारलें—

" काय रे, तुझी व या गृहस्थाची ओळख आहे कीं नाहीं ? "

माझा मित्र म्हणाला—" ओळख तशी कांहीं विशेष नाहीं. पण नाहीं असेंहि नाहीं. मोठा मजेदार माणूस आहे तो. फार सज्जन ! "

" मजेदार कसा ? आणि फार सज्जन ? यांतील खोंच नाहीं कळली मला !"

" अरे, म्हणजे असा कीं, स्वतःच्या सज्जनपणांत तो इतका गुंग असतो कीं त्याला दुसरें कांहीं सुचतच नाहीं. तो म्हणजे आमच्या चाळींतील एक करमणूकच आहे. एक प्रसंग सांगतों तुला. त्यावरून तुला कल्पना येईल. एकदां मला सिनेमाला जायची एकदम लहर आली. रात्रींचे ९-९। वाजले होते. मला झोप येईल असें वाटेना आणि एक चित्रपटहि चांगला होता. पण माझे नेहमींचे चित्रपट-मित्र या वेळीं भेटणें व भेटले तरी त्यांना तयार करणें

शक्य नव्हतें. मलाच त्यांचा थोडा कंटाळा आला होता. दररोजचा त्यांच्या सहवासाचा हत्ता पुरा झाला होता. मीं एकदम विचार केला या सज्जनाकडे जावें. मी त्याच्याकडे गेलों. तो त्या दिवशींचा जमाखर्च टिपीत बसला होता.

'काय हो, काय चाललंय ?' प्रश्न विचारीत विचारीत मी दार लोटून आंत शिरलों. तो एका टेबलाजवळ बसला होता.

'या, कांहीं नाहीं. जमाखर्च टिपीत बसलों आहें.'

"त्याची मंडळी बहुतेक आंतल्या खोलींत निजली असावीत.

'नियम आहे वाटतं दररोजचा ?'

"माझ्या प्रश्नांतला मिष्किलपणा लक्षांत न घेतां तो शांतपणें म्हणाला, 'होय, बरं असतं नाहीं का ? आपल्याला कळतं आपण कोठें आहोंत तें.'

'त्यांत काय कळायचं ? आपला पगार नि कर्जदार सांगतातच आपण कोठें आहोंत तें ! पुन्हां तें नमूद कशाला करायचें ? बाकी पैसे सांठविणाऱ्यांची गोष्ट निराळी !'

'तसें कांहीं नाहीं. माझं असं आहे मी आदल्या दिवशीं दुसऱ्या दिवशींच्या खर्चाचा अंदाज करून ठेवतों नि मग तेवढेच पैसे अलीकडे काढून ठेवतों.'

'आणि अनपेक्षित खर्च झाला तर ?'

'सहसा नाहीं होत. एखाद्या वेळीं—'

'पैशाप्रमाणें वेळेचा, तासांचा जमाखर्च नसतो ना तुमचा ?'

'कां ? त्यांत अशक्य काय आहे ? नाहीं तर कामें होत नाहींत वेळच्या वेळीं !'

"त्याच्या टेबलावर एक कॅलेंडर होतें. तिकडे माझें लक्ष गेलें. प्रत्येक तारखेपुढें कांहीं तरी काम लिहिलें होतें. पुढील ८–१० दिवस भरून गेले होते. 'परीट–पैसे देणें.' 'विठ्ठलरावाकडील १ रु. वसुली' आणि—मध्येंच एका वारीं लिहिलें होतें 'सिनेमा—४ माणसें × ४ आणे. १ रु.'

"त्याच्या घरांत चार माणसें होतीं–१ बायको, २ मुलें व ४ था तो स्वतः ! मला तें वाचून धीर आला.

‘ मी तुमचे दोन तास उसने मागावयास आलों आहें. ’

‘ म्हणजे ? कांहीं बेत ? ’

‘ होय ! सिनेमाला जाऊं या ! ’

‘ माफ करा. हें पहा मला २३ तारखेला जायचें आहे. ’ त्यानें तें कॅलेंडर माझ्यापुढें ठेवलें !

‘ पुन्हा जा. ’

‘ नाहीं, अशानें संवय लागते. अन् मी एकटा कधीं जात नाहीं. राग मानूं नका. माझे हे नियम निश्चित ठरलेले आहेत. हे मीं मोडावयास सुरवात केली तर हळूहळू सगळें आयुष्य बेशिस्त होत जाईल. त्याचें असें आहे— आयुष्य घडवायला वेळ लागतो, बिघडवायला लागत नाहीं.’

“ त्यानें हातीं दिलेल्या कॅलेंडरवजा डायरीचीं पानें चाळीत व त्याची नजर चुकवून मी मधून मधून त्यांतील मजकूर चोरून वाचीत होतों.

“ आयुष्याचा रस्ता चुकूं नये म्हणून त्यानें कितीतरी दूरवरपर्यंत निश्चयाचे पांढरे दगड दुतर्फा लावून ठेवले होते. अमकें करावयाचें नि तमकें करावयाचें नाहीं ! ”

“ अर्थात् तो सिनेमाला आला नसेलच ! ” मीं मित्राला विचारलें.

“ तो आला नाहीं अन् मीहि गेलों नाहीं. त्यानेंच मला करमणूक पुरवली. त्याची इच्छा नव्हती तरी मी तसाच बसलों. झोंपण्याची नियमित वेळ चुकत होती याबद्दल त्याला होणारें दुःख त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होतें, पण तें कळूनहि मी बसलों. एकादा चित्रपट पाहून होणारी करमणूक मी त्याच्या संगतींत वसूल करीत होतों आणि तोहि ‘ सज्जन ’ असल्यानें तें सगळें सहन करीत होता ! ”

माझ्या मित्राचा निरोप घेऊन बऱ्याच वेळानें मी घरीं परत आलों त्या वेळीं त्या सज्जनाचेंच आयुष्य माझ्या डोळ्यांसमोर होतें. मनांत तोच एक विचार होता. जगांतल्या दुर्गुणांची धास्ती वाटून घाबरत घाबरत जगणारे असे बरेच सज्जन मला आठवले. एखाद्या ठिकाणीं पैशाची रास पडलेली असली आणि तेथें ते कांहीं क्षण एकटेच राहिले तर त्यांना राक्षसाच्या संगतींत बस-

त्यासारखें वाटतें ! त्या पैशाची त्यांना भीति वाटते ! आपल्या हातांची भीति वाटते आणि मोह होईल या भीतीनें ते तेथून पळ काढतात. बाजारांत जातांना ते असेच दबकत जातात. कांहीं तरी वस्तु दिसतील, मनाला मोह घालतील या भीतीनें ते इकडे तिकडे न पाहतां आपल्या अत्यावश्यक गरजा भागण्यापुरतेच बाजारांत येतात. चार माणसांच्या बैठकींत ते बसले तरी हीच मनःस्थिति ! कोणी तरी कोणाची निंदा करील आणि परनिंदा ऐकण्याचें पाप घडेल या भीतीनें ते फारसे तेथें बसत नाहींत ! मला वाटतें पैसा मिळवितांना सुद्धां त्यांना हीच भीति वाटत असावी. जास्त मिळालें तर धनलोभ ! कमी मिळालें तर अति दारिद्र्याच्या संतापानें पुन्हा पापबुद्धीबद्दल बेफिकिरी ! चार दोन पैसे जास्त मिळाले तर त्याचा आनंद न होतां त्यांना संपत्तीच्या पायीं धुळीस मिळालेल्या लक्ष्मीपुत्रांचीं आयुष्यें दिसूं लागतात. अन्न खातांना त्यांना अपचनाची धास्ती वाटते आणि आरोग्याचे एकूण एक नियम आठवतात ! एखादा नवा ग्रंथ हातीं घेण्यास ते शक्य तोंवर नाखूष असतात—कारण वाचतां वाचतां त्यांत भलतेंसलतें कांहीं निघालें तर !

माझ्या मित्राचा तो शेजारी सज्जन कोणाला सहसा पैसे उसन देत नाहीं. कारण काय, तर घेणाऱ्याला कर्जबाजारी होण्याची संवय लागेल व आपल्याला उसने आणण्याच्या हक्कामुळें एखाद्या वेळीं उधळपट्टी करावीशी वाटेल ! तेव्हां चार पैसे कोणीं हातउसने मागितले तर ते मोठ्या ऐटीनें सांगतात 'उसनें द्यावयाचें नाहीं असा माझा नियम आहे !' तसेंच घेतांनाही ! देवाणघेवाण करतांना परिचय वाढेल, तो अतिपरिचय होईल आणि मग अवज्ञा होईल त्यापेक्षां दोन हात दूरच रहाणें बरें !

अशा सज्जनांना जगांतील दुर्गुणांचा इतका धसका बसलेला असतो, त्याबरोबरच आपण सज्जन राहिलों याबद्दल अभिमानहि वाटत असतो ! या जगांत समाजांत राहून, पहा कसा मी धुतल्या तांदुळासारखा राहिलों असें जणूं ते ऐटीनें सांगत असतात. पण मनांत भीति मात्र अशी कीं, संवय लागेल, तें व्यसन जडेल, तो नियम चुकेल ! गर्दींत शिरून सोवळें संभाळण्याची शिताफी ती !

किती तरी सज्जन आहेत असे या जगांत. तरी पुन्हा लोक ओरडतातच

जगांत दुर्जन फार आहेत ! पापाच्या कल्पनेला सुद्धां घाबरणाऱ्या सज्जनांकडे पाहिलें कीं असें वाटतें, यांच्या सामर्थ्याला हा केवढा पक्षघाताचा झटका बसला आहे ! ते जगण्यास सुद्धां घाबरत असतील. अल्पायुष्यांत आनंद मानीत असतील. कां ? कारण जास्त आयुष्य म्हणजे या जगांत जास्त मुक्काम, म्हणजे समाजांत–दुर्गुणांत–जास्त राहणें म्हणजे धोक्याच्या जागीं फार वेळ राहणें ! एक प्रकारें हें एक मोठें तत्त्वज्ञानच नाहीं का ? 'मायावाद'च नाहीं का ? मायावादानेंहि जगांतील षड्रिपूंचा असाच बडेजाव माजवला नाहीं का ?

पण त्या षड्रिपूंशीं दोन हात करून विजयी होऊन निर्धास्तपणें जगणारे 'ते' अस्सल सज्जन कोणीकडे आणि षड्रिपूंच्या कल्पनेच्या बागुलबुवाला घाबरून निष्क्रियतेच्या कोपऱ्यांत दडून बसलेले वरील निरुपयोगी सज्जन कोणीकडे ? रणांगणांत विजय मिळवून दिमाखानें जिवंतपणा मिरवणारा कोणीकडे आणि रणांगणाचा रस्ताच टाळून दडून बसून दबकत दबकत जगणारा कोणीकडे ?

# पाऊलवाट २२

आम्ही ज्या खेडेगांवांत राहात होतों तेथून रेल्वेचें स्टेशन ४ मैल लांब होतें. आणि आम्ही ज्या वाटेनें बहुधा जात होतों त्या वाटेनें स्टेशन ३ मैल पडे. फार थोड्या लोकांना ती वाट माहीत होती. चार मैलांच्या वाटेवर नेहमीं रहदारी असावयाची आणि ती आम्ही आमच्या पाऊलवाटेनें जातांना नेहमीं पहात होतों. पाऊलवाटेनें जातांना, 'पाहूं बरें कोण पुढें पळे तो' अशा हिरीरीनें आम्ही मोठ्या वाटेकडे पहात जात होतों. कांहीं शेतांच्या बांधांवरून, कांहीं शेतांतून, कांहीं ओहोळांतून, तर कांहीं माळ-रानांतून ती पाऊलवाट जात होती. पाऊलवाटेवर पाऊल ठेवल्यापासून स्टेशन अगदीं समोर दिसे, गाडीचा धूर दिसे आणि झाडांच्या फटींतून धावत्या गाडींतील माणसांचे चेहरे ठिपक्यासारखे दिसत. पण समोर दिसणारें स्टेशन गांठावयास ३ मैल पाऊलवाट तुडवावी लागे. आणि कित्येक वेळां असें होई कीं ४ मैलांच्या मोठ्या सडकेनें धोपटमार्गानें जाणाऱ्या लोकांची गाडी चुके व आम्ही डब्याबाहेर तोंड काढून त्यांची धांवपळ पहात असूं.

अशा वेळीं मी मनांत म्हणें, 'धोपट मार्गा सोडुं नको! ' या पंथाचे अनुयायी दिसतात बिचारे!

पण तरी आम्हां पाऊलवाटेनें स्टेशन गाठणाऱ्यांकडे ते धोपटमार्गवाले जरा तोऱ्यानेंच पहात. आम्हांला ते खेडवळ समजत. फार काय, कांहींही माहिती नसतांना ते आम्हांला गरीबसुद्धां समजत असावेत.

'एक वेळ गाडी चुकली तरी हरकत नाहीं पण तेवढ्यासाठीं दरिद्यासारखीं ढेकळें तुडवीत जावें कीं काय ?' असा त्यांचा तोरा असे.

कांहीं दिवसांनीं त्या धोपटमार्गावरच एका पाऊलवाटेचीं वळणें पडलीं. गाडी-घोड्यांचा धोपटमार्ग व बाजूनें अंग चोरून गेलेली पाऊलवाट ! मोठी विचित्र परिस्थिति होती ती ! गाडी-घोडेवाले, धोपटमार्गवाले त्या पाऊलवाटवाल्यांना आतां तोंडावर हिणवूं लागले. त्यांच्या जवळून गाडी हाकतांना मुद्दाम बैलांना चाबूक मारीत, खूप धूळ उधळीत, अगदीं चाकाचा आंख त्यांना लागेल कीं काय, अशी भीति उत्पन्न करीत आणि एखादा पायदळांतला प्रवासी धोपटमार्गावरून चालूं लागलाच तर त्याच्या अंगावर ओरडत, "अहो पायीं चालणार, मरायचें का ? पायवाटेनें चला. गाडीरस्ता सोडा."

एका गाडीवानानें वरील शब्दांचे चाबूक एका पायवानावर ओढले त्या वेळीं त्याला असा संताप आला, कीं तो तात्रडतोब आमच्या अस्सल पायवाटेंत सामील झाला. मलाही त्या बिचाऱ्याबद्दल सहानुभूति वाटून मी संतापून म्हणालों,

" काय हा अपमान पाऊलवाटवाल्यांचा ! म्हणे पाऊलवाटेनें चला ! गाडीरस्ता सोडा ! गाडीरस्ता व पाऊलवाट हीं एकमेकांना कोपरखळ्या देण्यासाठींच का एकत्र येतात ? एकाच वाटेवरचे प्रवासी; पण—"

शहरांत आल्यावर माझा हा संताप बराच कमी झाला. तेथें रस्त्यावर पाट्याच लावल्या होत्या—**'फुटपाथ'वरून चालावें** !

सरकारनें पायीं चालणाऱ्यांचा तो अपमानच केला होता. आणि कित्येक पायीं चालणारे ( व मीहि ) तो अपमान धुऊन काढण्यासाठीं पदोपदीं जीव धोक्यांत घालीत होतों. सायकलवाल्याच्या नाकासमोर चालत राहणें हा तर शहरांत असतांना माझा निश्चय होता. त्यानें घंटा वाजवली, शुक् शुक् केलें तरी लवकर दाद द्यायची नाहीं आणि मग 'अहो, मेहेरबान !' असें तो चिडून म्हणाला कीं मी बाजूला होत असें. त्यानें धक्का मारला तर त्याला उतरवून 'का हो ! दिसत नाहीं का !' असें दरडावून त्याचा अपमान करण्याच्या संधीची तर मी नेहमीं वाट पाहीं.

मोटारीच्या धोपट मार्गांत अडथळा आणणें हें फुटपाथवाल्यांना धोक्याचें

असलें तरी तो धोका पत्करील त्याला त्या धाडसांतला आनंदहि कळेल. सायकलवाल्यापेक्षां मोटारवाला ( लॉरी नव्हे अं ! ) जरा जादा सभ्य असतो. त्याला फुटपाथवाल्याशीं बोलण्यांत कमीपणा वाटतो. हॉर्न वाजवून फूटपाथवाल्याला सावध करणें हें सुद्धां कित्येक मोटारवाल्यांना कमीपणाचें वाटतें. म्हणूनच त्यांची अडवणूक करण्यांत धोका असला तरी गंमत आहे. तो चरफडून शेवटीं अगदीं आपल्या पाठीला खेटून मोटार थांबवतो ! चारी ब्रेक दांत ओठ खाऊन ओढतो आणि मग आपण बाजूस होतां होतां त्याच्या संतापलेल्या सभ्य चेहऱ्याकडे पाहण्यांत जें सुख आहे, जो आनंद आहे, तो अनुभवूनच पहावा ! पण एकाद्या वेळीं या अनुभवास प्राणाचेंहि मोल द्यावें लागतें !

" एकाच पातळीवर ही विषमता काय म्हणून ? जो भर रस्त्यांत पाऊल टाकतो तो आपल्या जबाबदारीवरच तें टाकतो. त्याच्या सुरक्षिततेचा आव आणून त्याचा पदोपदीं अपमान करावयाचा, हें काय ? " अशी पदपथपंथीयांची तक्रार आहे. धोपटमार्गावर त्यांचा होणारा कडेलोट त्यांना सहन होत नाहीं आणि पायवाट व गाडीवाट हीं जेथें जेथें एकत्र येतात तेथें वर्गकलह उत्पन्न होणारच ! गाडीवाल्यांची अडवणूक एवढेंच पायवाटवाल्यांना समाधान ! एवढेंच त्यांचें सुख ! हीच त्यांच्या अपमानाची भरपाई ! प्रत्यक्ष प्राप्ति हा सुखाचा धोपटमार्ग झाला, पण तो ज्यांना साधला नाहीं ते त्या सुखाच्या, मत्सराच्या पाऊलवाटेनें शक्य तोंवर त्या सुखाला धक्के मारीत चालत राहतात ! दुःख हलकें करण्याचा तो एक द्रुतपथ (शॉर्ट कट) आहे. राजरस्त्याला दबकून कडेकडेनें अंग चोरीत जाणाऱ्या पाऊलवाटेला कोण विचारतो ? पायीं चालणारे सुद्धां त्या वाटेची पर्वा करीत नाहींत. सुरक्षितता पत्करतांना आपण या गाडीघोड्यांना भीत आहोंत हाहि एक विचार मनाला चिडवतो ना ? प्राणाची पर्वा न करतां गाडीघोड्यांच्या गर्दींत घुसणारे पायदळी लोक याच चिडीनें चालत असतील का ?

पण माझ्या खेडेगांवांतल्या पाऊलवाटेवर माझा कधीं असा कडेलोट झाला नाहीं. त्या वाटेनें जातांना कधीं अशी हिडीसफिडीस होत नाहीं. कारण ती अस्सल पाऊलवाट आहे. ज्यांच्या पायांत ताकद असेल त्यांनींच त्या वाटेला जावें. कोणाच्या तरी पदार्पणानेंच त्या वाटेला सुरवात झाली आहे. आणि

त्या वाटेपुरता त्या भूपृष्ठाला आलेला सापाच्या कातडीसारखा मऊपणा हाहि राकट पावलांनीं माती तुडवूनच आला आहे.

त्या पाऊलवाटेनें जातांना जें सुख वाटतें तें शहरांतल्या फूटपाथवरून जातांना कसें वाटेल ? आमची पाऊलवाट वाहनांच्या प्रतिस्पर्धेच्या आटोक्याबाहेर आहे. ती वाट म्हणजे राजरस्त्यानें ओवाळून टाकलेला तुकडा नाहीं. ती वाट रेंगाळत हवा खात जाण्यासाठीं नाहीं. ती जातिवंत प्रवाशासाठीं आहे. म्हणून त्या वाटेचा किंवा त्या प्रवाशांचा कधीं अपमान होत नाहीं.

सामर्थ्यवान् प्रवाशांनीं आपल्या पावलांनीं तयार करून इतरांसाठीं केलेल्या जातिवंत पाउलवाटाच माणसाला कडेपठारावर, उत्तुंग शिखरावर पोहोंचवतात. जेथें धोपटमार्ग खुंटतात तेथें पाऊलवाटा सुरू होतात. पायथ्याशीं वाहनें मान टाकून पडून राहतात. बाष्पयंत्रें धापा टाकीत धुसफुसत असतात आणि पाऊलवाटा मात्र डोंगराच्या अंगाखांद्यावर शंकराच्या देहावरील सर्पांप्रमाणें लोळत असतात, आणि त्या वाटेनें येणाऱ्यांना निसर्गाचें अस्सल स्वरूप दाखवतात कीं जें धोपट मार्गावर धावणाऱ्या राजपंथीयांना दिसणें अतिशय मुष्कील असतें !

अशा अगम्य, अनुल्लंघनीय ठिकाणीं नेणाऱ्या पाउलवाटा आणि त्यांवर प्रवास करणारे प्रवासी यांचा कोण अपमान करील ?

# लेखक आणि पठाण २३

त्या आळीला नेहमीं एखादा तरी पठाण दिसत असल्यामुळें लोक तिला 'पठाण आळी' म्हणत. त्या आळींत पठाणांखेरीज आणखी पुष्कळ लोक हिंडतांना दिसत. परंतु ते हिंडणारे सुद्धां त्या आळींतून जातांना तेथील पठाणांकडेच नजर टाकीत.

एकापेक्षां एक धिप्पाड दिसावयाचे ते. ती जिरेटोपासारखी टोपी, तो प्रचंड अंगरखा, त्यावरील वीचभर जाकिटामुळें जास्तच भव्य दिसे आणि त्या अंगरख्याच्या तोलाची अशी ती डेरेदार विजार, ते करकर वाजणारे बूट आणि खिळे आणि पत्र्या ठोकून जास्तच उग्र केलेली ती काठी.

हें सगळें अहोरात्र वाहून नेणारें तें शरीर! परंतु त्या शरीराचा फक्त तोंडापुरता भाग दिसे. लांब-रुंद करंज्यांएवढे डोळे सुरमा घालून जास्तच भयप्रद केलेले. भरभक्कम नाक आणि त्याच्याभोंवतीं तें केसांचें लहान-मोठें रान! तोंडावरून वाटे याच प्रमाणांत आंत झांकलेलें शरीर आणि मन असणार. हाताचे पंजे पाहिले तर हा अंदाज खरा वाटे. रुंदट हाडावर टरारलेल्या त्या शिरा आणि पुन्हां केसांचें शेवाळें सांचलेली कातडी!

असे पांचदहा पठाण त्या आळींतील एका हॉटेलसमोर बाकावर बसलेले असत. ते मधून मधून हसतसुद्धां आणि भरभर बोलत. काय बोलत असतील देव जाणे! नेहमीं अगदीं प्रवासांत असल्यासारखे नखशिखान्त कपडे घालून आपले भव्य देह ते तयार ठेवीत. कशासाठीं?

पठाणाचें झांकलेलें शरीर त्या घेरेदार कपड्यांसारखें अस्सल सामर्थ्यानें तुडुंब भरलेलें असलें पाहिजे. त्याला नुसता धक्का लागावयाचा अवकाश कीं म्युनिसिपालिटीच्या रस्त्याखालील नळासारखा त्याच्या सामर्थ्याचा लोंढ वेगानें अंगावर येईल असें वाटे !

परंतु हें कितपत खरें आहे हें समजण्याचा योग बरेच दिवस आला नाहीं. पठाण कधीं रागावलेला असल्याचें त्या आळींत कोणीं पाहिलें नाहीं. त्याचा आवाज किती चढावयास पाहिजे वास्तविक ! परंतु त्याचें बोलणें म्हणजे नुसती चिंव चिंव ! त्यांच्यापैकीं कोणींहि कोणावर कधीं हात उगारल्याचें कोणास दिसलें नाहीं.

मग एवढा देह, एवढे कपडे, एवढे उग्र डोळे, तो सोटा—हें जमवून काय करतात हे पठाण ?

असेंच कुतूहल त्या आळीच्या पलीकडे राहणाऱ्या कांहीं व्यक्तींबद्दल होतें. त्या व्यक्ती कोणाच्या सहसा लक्षांत येत नसत. त्यांचें नांव मात्र दुमदुमत असे. आणि कधीं कोणास त्यांपैकीं एखादा दिसला तरी कोणास सांगूनहि पटावयाचें नाहीं कीं, ज्यांचें नांव दुमदुमतें आहे त्यांपैकींच हा एक !

मोठेमोठे ध्येयवादी होते ते. सारखे वाचीत, सारखे लिहीत. मोठमोठीं ध्येयेंच्या ध्येयें ते कागदावर लेखणीच्या आधारें उभीं करीत आणि अशीं ताबूतासारखीं एकापेक्षां एक ध्येयें जो तो रंगवी. चिडून त्वेषानें लिहीत ते. तें वाचून वाटे, काय महान् ध्येयवादी आहेत हे. ज्यांचीं अक्षरें नि वाक्यें नि पानें नि पुस्तकें इतकीं टोलेजंग ते स्वतः अन्यायानें जळफळत असतील. ध्येयानें वेडे झाले असतील. कसें असेल त्यांचें जीवन ? कशीं असतील त्यांचीं मतें ? कांहींनीं तर आपल्या लेखनानें कित्येकांना वेडें केलें होतें. त्यांचे कांहीं वाचक त्यांचे नवे नवे ग्रंथ अहोरात्र जवळ घेत. कांहींनीं त्यांच्या ग्रंथांतील वाक्येंच्या वाक्यें पाठ केलीं होतीं. कांहींनीं त्यांचीं ( म्हणजे त्यांच्या ग्रंथांचीं ) मुखपृष्ठें आपल्या घरांत प्रमुख ठिकाणीं लावलीं होतीं आणि त्यांचे ग्रंथ वाचून कंटाळा आला कीं ते वाचक त्या मुखपृष्ठाकडे पहात बसत. अत्यंत आकर्षक होतीं तीं मुखपृष्ठें. वर वर पाहणारास तीं सुंदर चित्रें वाटत, परंतु वास्तविक तीं ग्रंथांतील मुख्य विचारांचीं सजीव रूपें आहेत असें कांहीं

लोक सांगत नि समजत. ग्रंथांत जीवन असे आणि मुखपृष्ठावर जीवनाचें प्रतीक असे.

अनेक प्रकारचीं मुखपृष्ठें त्या ध्येयवाद्यांच्या ग्रंथावर असत आणि तीं ग्रंथांवरून वाचकांच्या भिंतीवर जाऊन ग्रंथाचें नांव त्या भिंतीइतकें अजरामर करीत.

पठाणआळींतील पठाणांच्या भव्य आकृतीबद्दल आणि भव्यतर पोषाखाबद्दल जें वाटे तेंच त्या वाचकांना त्या ध्येयवाद्यांच्या ग्रंथाबद्दल आणि त्या ग्रंथावरील मुखपृष्ठाबद्दल वाटे. परंतु त्या पठाणाविषयीं सामान्यतः त्या पठाणआळीबाहेर जेवढी माहिती तितकीच त्या ध्येयवाद्यांच्या जीवनाबद्दल त्यांच्या वाचकांना माहिती होती.'

त्या पठाणआळींतून कांहीं वेळां मला जावें लागे. त्या त्या वेळीं मी त्या पठाणांकडे पहात पहात जाई. मी मनांत म्हणें, ' हे जन्मल्यापासून असेच उग्र नि असेच भव्य असतील का ? अहोरात्र एवढा लवाजमा हे अंगावर कां बाळगतात ? आमच्यासारखे हे कधीं वागतच नसतील का ? आपल्या घरीं हे असेच दंडा आपटीत आणि कल्ले कुरवाळीत बसत असतील का ? आपल्या पत्नीशीं, आपल्या लहान मुलाशीं वागतांना तरी हे जरा सौम्य होत असतील कीं नाहीं ? आणि घरीं हे आपला विशाल देह पसरून बसत असतील त्या वेळीं त्यांचीं मुलेंबाळें थरथर कांपत असतील का ? त्यांच्या पोटावर बसून त्यांच्या दाढीमिशांशीं खेळणारीं मुलें—इतकीं धीट मुलें—त्यांच्या घरांत असतील कीं नाहीं कुणास ठाऊक ? कीं घरदार सोडून हे नेहमीं असेच कोठें तरी चढाई करण्याच्या तयारीनें बसलेले असतात ? हा एवढा भव्यपणा, प्रचंडपणा नि उग्रपणा त्यांनीं कशासाठीं जमविला आहे ? केव्हांतरी एकदां पठाणाचें घर पाहिलें पाहिजे. पठाणाला त्याच्या घरांत जाऊन एकदां भेटलें पाहिजे.' असें शेवटीं ठरवून मी पठाणआळी ओलांडून जाई.

असाच एक दिवस मी त्या आळीच्या बाहेर पडत असतां मला एक मित्र भेटला. तो बडा वाचक होता. ग्रंथापेक्षां ग्रंथकारावर त्याची फार भक्ति. अनेक प्रसिद्ध ग्रंथकारांची मिळेल ती माहिती जमविण्याचें त्याला अतिशय वेड होतें. मात्र ती माहितीसुद्धां तो लेखकांच्या लेखांतूनच मिळवीत असे.

अमका लेखक अमके कागद वापरतो. तमका सकाळीं लिहितो. फलाणा पालथी मांडी घालून लिहितो. कोणी १५ दिवसांत कादंबरी लिहितो. तर कोणी ८ दिवसांत नाटक लिहितो. अशा अनेक गोष्टी तो धडाधड सांगत असे आणि त्या लेखकांच्या ग्रंथांशीं या गृहस्थानें त्या लेखकांविषयीं सांगितलेली माहिती जुळणारी असल्यानें लोक त्यावर विश्वास ठेवीत. निदान मी तरी ठेवीत होतों. होतों म्हणजे आतां नाहीं. त्या दिवसापासून नाहीं. कारण—

त्या दिवशीं तोच मुळीं कोलमडला. मीं त्याला सहज विचारलें, "काय रे ! सध्यां वाङ्मयांतलें ताजें ध्येय कोणतें आहे ? नवें मुखपृष्ठ कसें आहे ? जीवनाचे महत्त्वाचे प्रश्न कोण सोडवीत आहे ? अन् तुझ्या हातांत आज पुस्तक नाहीं ? हें काय ? हातांत झोळी ?"

"झोळी नाहीं जीवन आहे हें. भाजीची झोळी आहे ही. टोमॅटो नि मेथी आणायला चाललों आहें. व्हिटॅमिन्स नाहींत का तीं ? आतां यापुढें झोळीच."

"अन् ग्रंथ ? तूं घर बदललेंस वाटतं ?"

"बदललें नाहीं, पण बदलणार हें नक्की. बस्स झालं हें ! सगळं कळलं, बदमाष लेकाचे ! बाकी त्यांची काय चूक म्हणा. आम्ही मूर्ख. आम्हांला बनविलं त्यांनीं !"

"अरे, कोणीं ? कोणाला ? कसं ? केव्हां ? कांहीं स्पष्ट सांग."

"अरे, आज इतक्यांत मी ४।५ लेखकांना पाहून आलों. काय थक्क झालों मी. आपण त्यांचे ग्रंथ पाहतों नि कल्पना करतों, पण ग्रंथांवरून ग्रंथकारांविषयीं अंदाज करणें हा सगळ्यांत मोठा गाढवपणा आहे."

"अँ ? अन् तूंच तर नेहमीं तें करीत असतोस. तो अंदाजच असतो वाटतं ?"

"अगदीं शंभर टक्के अंदाज. तूंच सांग. गरिबांच्या दुःखासाठीं पानोपानीं, ओळीओळींत, शब्दागणिक हळहळणारा माणूस दाराशीं आलेल्या गरीब विद्यार्थ्याला हांकलून देईल का ? त्याच्या अंगावर कुत्रं सोडील ? सदभिरुचीसाठीं टाहो फोडणारा माणूस गप्पागोष्टी करतांना अचकट विचकट बोलेल असें वाटतें तुला ? स्त्रियांच्या उद्धारासाठीं सारखं खरडणारा माणूस, त्यांच्या भोंवतालचीं सगळीं बंधनं तोडण्यासाठीं हत्यार उपसणारा वीर, बायकांविषयीं मित्रमंडळींत काय बोलत असेल ? छेः ! छेः ! त्यांना पाहिलं नव्हतं नि ऐकलं नव्हतं तेंच ठीक होतं. अरे, लिहितात काय नि वागतात काय ?"

मी त्या त्रस्त समंधास शांत करण्यासाठीं म्हणालों, " पण त्यांत एवढं डोक्यावर कुऱ्हाड पडल्यासारखं काय झालं आहे ! तींही माणसंच आहेत ना ? तुमच्यासारखेच ते. ते लिहितात म्हणजे तुम्ही आम्ही लिहीत नाहीं. पण त्यासाठीं तुझा तरी त्यांच्यावर एवढा जोरा कां ? ते असं म्हणतील—"

इतक्यांत माझें वाक्य थांबण्यासारखें एक दृश्य मला दिसलें. आम्ही बोलतां बोलतां भलत्याच रस्त्याला आलों होतों. त्या रस्त्यांतील एका घरांत एक माणूस रडत असलेला मीं पाहिला ! माणसें रडतात हें कांहीं मला पहिल्यानें कळलें नव्हतें. पण तो माणूस म्हणजे एक पठाण होता.

मी जरा डोळे चोळून डोकें हालवून पाहिलें तेव्हां मला कळलें कीं, त्या रस्त्यावर सगळीकडे पठाणांचीं घरें होतीं. त्यांपैकींच एका घरांतल्या ओसरीवर एक पठाण रडत होता आणि त्याचा एक मित्र त्याचें सांत्वन करीत होता. त्यांचीं मुलेंबाळें त्याच घराच्या ओटीवर खेळत होतीं. एक मूल त्या पठाणाच्या खांद्यावर हात ठेवून त्याच्या तोंडाशीं तोंड आणून कांहीं बोलत होतें. आणि त्या पठाणानें आपला एक राकट जाडा हात त्या मुलाच्या पाठीवर ठेवला होता. म्हणजे त्या मुलाला तो कुरवाळीत होता.

आम्ही ज्याला पठाणआळी म्हणतों तेथें दिसणारे पठाण आणि हे पठाण एकच. पण ते किती निराळे आणि हे किती निराळे ! त्या भव्य पोषाखांत त्यांना पाहतांना हे कधीं रडत असतील हें कोणाला खरं तरी वाटेल का ? कोण रडवणार त्यांना ? पण त्याक्षणीं एक जाडाजुडा धिप्पाड पठाण अश्रूगाळीत होता हें मी डोळ्यांनीं पाहात होतों. पठाणाबद्दलचें माझें सगळें कुतूहल शांत झालें. पठाणाच्या पोषाखावरून मीं त्याच्याबद्दल केलेल्या कल्पना एकांगी होत्या. मीं पठाणाचा फक्त पोषाख पाहिला. त्याचें जीवन पाहिलें नव्हतें. तें त्या अश्रुरूपानें दिसल्यावर मला त्याच्याविषयीं आपलेपणा वाटूं लागला. त्याच्यावर अपत्यवियोगाचें दुःख कोसळलें होतें असें मला कळलें. आणि तो तुमच्याआमच्यासारखाच हळहळत होता—विव्हळत होता.

तें दृश्य वर्णन करावयास इतका वेळ लागला पण तें पाहण्यास फार तर चार दोन क्षण लागले असतील.

मीं तें दृश्य माझ्या मित्राला दाखवीत मघांचें वाक्य पूर्ण केलें—

" पहा! हा पठाण रडत असेल असें तुला त्याचा पठाणी रुबाब पाहून कधीं वाटलें असतें का? पण तोही माणूस आहे. तसेंच तुझे ते ध्येयवादी लेखक. पोषाखावरून पठाणाच्या जीवनाची कल्पना मीं केली तशी ग्रंथांवरून ग्रंथ-लेखकांची तूं कल्पना केलीस! पण तींही माणसेंच आहेत ना! त्यांनाही तुमच्या-आमच्यासारखेंच जीवन आहे. आणि त्या जीवनांत तुमच्याआमच्यासारखेंच ते वागतात. हें तुला आधीं कळलें असतें तर तूं इतका चिडला नसतास!"

माझा मित्र आतां बराच शांत झाला होता. पठाणाच्या डोळ्यांतील अश्रूंनीं तोही अस्वस्थ झाला होता. आणि मला वाटतें त्याच्या मनांत त्याच्या आवडत्या ध्येयवादी लेखकांबद्दल आतां बरीच सहानुभूति उत्पन्न झाली असावी! तो आणि मी एक नवें सत्य हळू हळू पत्करूं लागलों होतों.

जीवनांतील ही विसंगति हा कोणाचा दोष आहे? त्या व्यक्तींचा? त्या पठाणाला आपल्या सामर्थ्याचा उपयोग करण्याचा काय कंटाळा आला आहे? आपण विशाल देहाचा आणि अतुल सामर्थ्याचा कांहीं उपयोग करीत नाहीं याबद्दल त्याला कांहीं खंत वाटत नसेल? जर त्यानें कोठें बहादुरी केली असती तर त्याचें सामर्थ्य कोणाच्या डोळ्यावर आलें नसतें आणि त्याच्या खाजगी आणि लौकिक जीवनांत एवढी विसंगति दिसली नसती.

तसेंच लेखकांचें! आपण ग्रंथांत मांडलेले विचार आपल्या जीवनांत कोठें व्यक्त होत नाहींत, आपण आणि आपले नायक यांत केवढी तफावत, या विचारांनीं त्यांनाहि दुःख होत असेल. परंतु त्यांच्या जीवनाची कुचंबणा चालली आहे. लेखणीनें लिहितां लिहितां त्यांनाही तरवारीचा आवेश चढत नसेल का? त्यांचें वाङ्मय वाचून आपलीं मनें हादरतात तर तें वाङ्मय त्यांच्या मनोभूमींत अहोरात्र उसळत असतां त्यांचीं मनें किती उसळत असतील? पण ती स्फूर्ति, ती तळमळ कागदावर मांडून ठेवण्यापलीकडे त्यांना कांहीं करतां येत नाहीं. याबद्दल जर त्यांना हंसावें, त्यांचा उपहास करावा—तर मग ज्यांच्या मनांत असे विचारहि नाहींत आणि आचार तर चार माणसां-सारखे त्या आपल्यासारख्या वाचकांचा किती उपहास करावा?

# कढई आणि नारळ २४

त्या दिवशीं मी लवकर जागा झालों होतों आणि जरा इकडे तिकडे पाहतों तों, दिवसाची सुरवातही मोठी कलात्मक पद्धतीनें होत होती. सूर्योदयास बराच अवकाश होता, तरी आधीं निघालेला प्रकाश जगापर्यंत येऊन पोहोंचला होता. आकाशांत पातळ ढगांची चादर पसरली होती, त्यामुळें नेहमींच्या त्याच्या भकास स्वरूपापेक्षां तें फार सुंदर दिसत होतें. आणि वाराहि डुलत डुलत जगभर भटकूं लागला होता.

तें सगळें वातावरण पाहिलें आणि मनाशीं ठरवलें कीं उठावें. अनायासें इतकी चांगली सकाळ भेटत आहे. जरा चार पावलें ( अर्थात् सायकलवरून ! ) भटकून यावें !

मी बाहेर पडलों. कोपऱ्यावरच्या विश्रांतिगृहांतील नोकर रात्रीं आंत ठेवलेल्या कुंड्या दाराशीं आणून मांडून ठेवीत होते. आणि आंतील सामान पसरून ठेवीत होते.

एवढ्या मोठ्या त्या भव्य गृहांत मी एकटा बसलों होतों. सगळ्या नोकरांचें लक्ष माझ्यावर खिळलें होतें. मला कसेंसेंच वाटूं लागलें. त्यांचें काय चुकत होतें हें मलाहि कळेना. माझें कांहीं चुकलें आहे असें कांहींच त्या नोकरांनीं दाखविलें नाहीं. मीहि कायदेशीरपणें तेथें वागत होतों तरी मला मनांत वाटे, हें कांहीं ठीक नाहीं. कांहीं तरी चुकलें आहे. एवढें मोठें विश्रांतिगृह, इतके नोकर, इतकीं टेबलें नि त्याच्या चौपट खुर्च्या, किती मोठी तिजोरी आणि त्यांत 'किती तरी' पैसे, आणि या सगळ्या पार्श्वभूमीवर २ पैशांचा एक सिंगल

पिणारा मी एकटाच ! मला शेजारीं पडलेलें वर्तमानपत्र ताजें असूनहि वाचावयास संकोच वाटूं लागला.

मी तेथून उठलों आणि जवळच्या एका मित्राच्या घरीं शिरलों. पहिल्या हांकेला तर त्यानें दादच दिली नाहीं. दुसरी हांक मारली त्यावेळीं त्याचा नाइलाज झाला असावा. तो उठला, ओ आली, मी वर गेलों आणि त्याच्या दिवाणखान्यांत जाऊन बसलों. तो बाहेर येत होता.

मी तेथें एकटाच होतों. तेथें १०।२० आरामखुर्च्या आणि १०।२० साध्या खुर्च्या पडल्या होत्या; २।३ कोच होते; आरसे, तसबिरी—आणि मी एकटा !

मी ५।१० मिनिटांत १०।५ ठिकाणीं बसून पाहिलें. कोठें नीट वाटेना. कोठेंहि बसलों कीं, भोंवतालची जागा किती रिकामी आहे याची मला जाणीव होई आणि मी चटकन् तेथून उठें. सगळे जणूं काय नुकतेच उठून गेलेत आणि मी एकटाच बसून राहिलों आहें, असें मला वाटलें.

मला एका चित्रपटाची आठवण झाली. धर्मात्मा हा तो बोलपट. त्या देवळांत त्या भोंदू बुवाचें पुराण चालू झालें. सर्व जण उठून गेले. श्रीखंड्या पेंगत होता. म्हणून त्याला सर्व निघून गेल्याचें कळलें नाहीं. पण तो जागा झाल्याबरोबर दचकला. एवढ्या मोठ्या देवळांत आपण एकटेच ! त्या वेळीं तो जसा दचकला तसें मला झालें. शेवटीं त्या विस्तृत भव्य दिवाणखान्यांतून उठून मी गॅलरींत जाऊन उभा राहिलों.

रस्त्यावरून एक हमाल डोक्यावर मोठी कढई घेऊन चालला होता. आणि ती भली मोठी कढई रिकामीच होती. अगदीं रिकामी असती तर—! पण तशी ती नव्हती. त्या कढईंत फक्त एक लहानसा नारळ होता. कांहीं तरी चमत्कारिक दृश्य आपण पहात आहोंत असें मला वाटलें. वास्तविक पाहिलें तर त्यांत विचित्र तरी काय होतें ? कढईसारखी कढई, नारळासारखा नारळ ! नारळहि इतर नारळांसारखाच आणि ठेवण्याची रूढ पद्धत आहे तसाच ठेवलेला होता. कढईसुद्धां मोठी घवघवीत, स्वच्छ घासलेली, गरगरीत अशी होती. पण तरी कढई आणि तींतील नारळ हें दृश्य कांहीं चमत्कारिक होतें ! याचें कारण कढईतील जागेच्या मानानें नारळ फार लहान होता ! नारळाला कढईतील फारच थोडी जागा भरून काढतां आली होती.

'श्रीफल' एवढी ज्याची पदवी तो त्या कढईत अस्थानीं दिसत होता. आणि मंगल घरीं रिकामें भांडें नेऊं नये, यासाठीं त्या कढईंत नारळ टाकला असला पाहिजे ! हें सगळें ठीक होतें. तरी एवढ्या मोठ्या कढईंत तो लहानसा नारळ ही वस्तुस्थिति चमत्कारिक होती खास. रिकाम्या कढइतील 'अमंगलत्व' घालविण्यासाठीं एक बारीकसें 'मंगल' ( तो नारळ ! ) कढईंत टाकून दिलें होतें. परंतु त्यामुळें झालें काय ? कढईचें रिकामपण जास्तच स्पष्ट दिसूं लागलें आणि त्या श्रीफलाची मात्र शोभा झाली !

त्याऐवजीं त्या कढईंत कांहीं तरी गच्च भरलें असतें आणि मग नारळ ठेवून दिला असता तर त्या ढिगावर तो नारळ किती चांगला दिसला असता ! नुसते गहूं तांदूळ भरले असते व धान्याच्या राशीवर नारळ ठेवला असता तर किती चांगला दिसला असता तो ! पण मग कदाचित् तो माझ्या लक्षांतहि आला नसता. रस्त्यानें जशीं हजारों दृश्यें डोळयाच्या बुबुळावर प्रतिबिंब पाडून जातात पण मला दिसत नाहींत, तसें तेंहि भरल्या कढईचें दृश्य मला नकळत निघून गेलें असतें.

त्या उपाहारगृहांत मी कित्येक वेळां ऐन गर्दी असतांना जातों, पण तेथली विस्तृत जागा नि असंख्य भव्य वस्तु माझ्या लक्ष्यांतहि येत नाहींत.

त्या मित्राच्या दिवाणखान्यांत खूप माणसें बसलेलीं असलीं आणि मी तेथें असलों तर मी कोणत्या खुर्चीवर बसलों हेंहि माझ्या लक्ष्यांत रहात नाहीं.

समोर सूर्यबिंब आकाशांत दिसूं लागलें. मला पुन्हां वाटलें आकाशाच्या कढईत परमेश्वरानें हें तेजाचें श्रीफल टाकून दिलें आहे. एवढ्या भव्य आकाशांत सूर्याचें बिंब फारच लहान दिसतें, आणि आकाश रिकामें दिसतें.

तेंच रात्रीचें आकाश पहा. चांदण्यांनीं खच्चून भरलेल्या आकाशांत चंद्र किती सुंदर दिसतो ! मग ती कोर का असेना ! सूर्यापेक्षां चंद्र कितीतरी लहान ! स्वतःचा प्रकाश नाहीं, भटकण्याचें स्वातंत्र्य नाहीं; तरी रिकाम्या आकाशांतील सूर्यापेक्षां भरल्या आकाशांतील चंद्रकोरसुद्धां चांगली दिसते.

एखाद्या मोठ्या माजघरांत बारीक पणती असली तर ती पणती तेथें ठेचून भरलेला अंधारच पाहणाऱ्यास दाखवते. तिचा प्रकाश इतका उदास वाटतो. तसा निरभ्र आकाशांतला सूर्य मनाला औदासीन्य आणतो.

'वनींच कीं एक सुकोनि जावें' असा त्रागा करणारा कवि रागाच्या भरांत तें बडबडला असावा. मी तर म्हणेन व्यक्तित्वाच्या ऐटीनें वाळवंटांत उदासवाणें मरण्यापेक्षां धक्काबुक्की झाली तरी हरकत नाहीं, पण ऐन समाजांत राहण्यांत कांहीं निराळी मौज आहे.

परमेश्वरालासुद्धां गर्दी आवडते. नाहीं तर त्यानें एवढा फाफट पसारा कशाला उत्पन्न केला असता ? उपनिषदांत सांगितलेंच आहे ना! परमेश्वर आधीं अगदीं एकटा होता. किती भयंकर जीवन असेल तें ? एवढ्या मोठ्या विस्तारांत एकटें जगावयाचें! 'एकोऽहं। एकोऽहं।' असें म्हणत बिचारा सारखा हळहळत असे. शेवटीं त्यानें ठरवलें 'बहु स्याम्।'

आणि भराभरा त्यानें उत्पत्तीचा तडाखा चालवला. झाडें तर झाडेंच उत्पन्न केलीं! अगदीं घनदाट अरण्यें! डोंगर तर डोंगरच सगळीकडे पसरून दिले! पाणी उत्पन्न करण्याचा सपाटा चालवला तो इतका कीं $\frac{3}{4}$ जग पाण्यानेंच व्यापून टाकलें. आणि पशु नि पक्षी, जंतु, माणसें—काय वाटेल तें वाटेल तितकें उत्पन्न करून ठेवलें! मग इतकी गर्दी झाली कीं, त्यालाच या जगांत जागा राहिली नाहीं. शेवटीं प्रत्येकाला अंतःकरण नांवाचें कांहीं दिलें होतें. त्यांत म्हणे पोकळी आहे, आणि त्या पोकळींत बिचारा राहतो! पण त्याला त्या पोकळींत बसून भोंवतालच्या गर्दीकडे पाहतांना खात्रीनें मौज वाटत असेल! त्यानें केलेलें जग त्याला जुमानीत नाहीं. कोणाला त्याची आठवण होत नाहीं. अंतःकरणासह परमेश्वराला कित्येकांनीं दाबून टाकलें आहे. परंतु परमेश्वराला कधीं असें वाटलें आहे का—वनींच कीं एक सुकोनि जावें ? खात्रीनें नाहीं. नाहीं तर त्याला कोणीं अडवलं होतं ? तो केव्हांच अंतःकरणांतून उठून गेला असता. पण नाहीं; तो तसाच थर्ड क्लासच्या डब्यांत घुसून बसलेल्या उतारूसारखा बसला आहे. केव्हां तरी तो बाहेर येतो म्हणतात! केव्हां तरी हालचाल करूं लागतो! अगदीं ऐन युद्धाच्या धामधुमींत कोणी मोठे विलायती धर्मगुरू परमेश्वराची आठवण काढतात आणि मग सगळ्या साम्राज्यभर अंतःकरणाच्या अडगळींत पडलेल्या परमेश्वराची पूसतपास सुरू होते.

तेव्हां परमेश्वराला गर्दी आवडते हें खास. नाहीं तर ऐसपैस स्वर्ग सोडून अफाट नंदनवन ओलांडून तो कशाला या विश्वारण्यांत आला असता ?

गर्दी ही जगाची शोभा आहे. प्रत्येक वस्तुजाताची ती पार्श्वभूमि आहे. त्या गर्दीलाच समाज, राष्ट्र, विश्व, संसार वगैरे गोंडस नांवें आहेत. आणि त्या गर्दींत राहूनच व्यक्ति लोकोत्तर होतात. तुमची आमची गर्दी नसती, लोकच नसते तर लोकोत्तरत्व कसें झालें असतें ? सामान्यच नसतें तर असामान्यत्वाला काय किंमत राहिली असती ? मूढजन नसते तर एवढ्यामोठ्या जगांत महंमद, येशू, श्रीकृष्ण वगैरे मंडळी नुसती वणवण भटकत राहिली असती ! भटकतां भटकतां कोठें तरी एकमेकांना भेटली असती ! आणि कंटाळून निजधामाला निघून गेली असती. पण त्याहून खरें म्हणजे गर्दी नसती तर हीं मोठीं माणसें आलींच नसतीं. कारण मग नुसत्या रिकाम्या जगांत त्यांची काय शोभा ! ते त्या रिकाम्या कढईतल्या नारळासारखे दिसले असते. शून्य जगांत परमेश्वर, एकहि श्रोता नसलेल्या सभागृहांत वक्ता, निरभ्र आकाशांतील एकटा सूर्य, किंवा त्या भव्य परंतु रिकाम्या विश्रांतिगृहांतील एकटा मी, हीं सर्व त्या भव्य नि रिकाम्या कढईतल्या बारीक नारळासारखींच अस्थानीं आहेत !

## कुंडींतील झाडें

## २५

"सुभाषबाबू निवडून आले" ही बातमी आपणास उद्यां ऐकावयास मिळेल का अशी रुखरुख मला लागली होती. आणि ते निवडून यावेत हा एक आवडता विचार मनांत घोळत असल्यानें मी चार मित्रमंडळींत तो विचार वारंवार मांडीत होतों. जोरजोरांत त्याचें प्रतिपादन करीत होतों. माझ्या बोलण्याच्या आवेशावरून एखाद्याला वाटलें असतें कीं, त्यांच्या निवडणुकीबद्दल एखादी खाजगी तार माझ्या खिशांत आहे !

ते निवडून आले हें मला कळलें त्यावेळीं माझी रुखरुख निराळीच होती. ती बातमी मलाच पहिल्यानें कळली आहे असें ठरावें. निदान मला जो जो भेटेल त्याला ती बातमी माहित नसावी व माझ्याकडूनच ती त्याला प्रथम कळावी. पण हें कसें होणार ? ती बातमी मलाच प्रथम कळण्याइतका मी कोण असा ? निवडणुकीच्या निकालाबद्दल तळमळणारा मी काय एकटाच हिंदपुत्र आहें ? पण हें कळूनहि असें वाटे कीं, आपल्याला ती बातमी अगदीं तात्बडतोब कळली आहे असें दाखवतां यावें. आणि मला ती बातमी कळल्याबरोबर मी एका मित्राकडे धावत गेलों.

तो शांत झोंपला होता. मला आनंद वाटला कीं, निदान याला तरी आपण थक्क करूं शकूं ! आणखी एक कारण म्हणजे तो—पट्टाभिपंथीय होता ! खरें म्हणजे त्याचा पंथ असा नव्हताच. त्याचा राजकारणांतील आदर-अनादराचा व्यवहार कांहीं निराळाच होता. त्याला कॉंग्रेस या 'संस्थे'बद्दल

आदर वाटे आणि रॉय या व्यक्तीबद्दल आदर वाटे. तो इंडिपेंडंट इंडिया नियमानें वाची नि गांधींची पत्रें नेहमीं त्याच्या खिशांत असत. जवाहरलाल नेहरूंची एक छोटी प्रतिमा नेहमीं त्याचे खिशांत असे. प्रधानमंडळांतील कांहीं लोकांच्या डौलदार वैभवाबद्दल त्याला 'कांहींतरी' आनंददायक वाटे.

त्याला मीं उठवलें आणि मोठ्यानें ओरडून सांगितलें, "सुभाषबाबू की जय!"

हसत हसत तो म्हणाला, "अरे हो! एवढें बेभान व्हायला काय झालें! आतां दाखवा ना म्हणावं काय कर्तबगारी आहे ती! आतां मजुरांचें राज्य स्थापन करा! ते भकास भाई आतां काय राज्यक्रांती करणार तें पाहूं या कीं!"

त्याचा विरोध ऐकून मला खूप आनंद वाटला. विरोधाखेरीज अभिमानाला तेज येत नाहीं. विरोध हें अभिमानाचें जीवन आहे.

मीहि चिडून म्हणालों, "कांहींही होवो. निदान हाय कमांडची झब्बूशाही तर नाहींशी होईल! राजकारणांतील बुवाबाजी तर थांबेल! आतां जवाहर, रॉय आणि सुभाष ही त्रिमूर्ती—"

"आणि या त्रिमूर्ति-दत्तात्रेयाच्या भोंवतालचें श्वान?" त्यानें अगदीं वेळ साधून कोटी केली.

"कीर्तीला लाचार असलेले बेकार देशभक्त!" मींहि बोलून टाकलें. हळू हळू आमचे मतभेद नाहींसे झाले. आम्हांला कळलेंहि नाहीं तें. आणि थोड्याच वेळांत माझा मित्र रॉयच्या बुद्धिमत्तेबद्दल, राजकारणाच्या अत्यंत सूक्ष्म अभ्यासाबद्दल मनसोक्त स्तुति करूं लागला. सुभाषबाबूंच्या सुप्त-सामर्थ्याबद्दल आदरानें बोलूं लागला. भाई लोकांच्या कार्याच्या चिकाटीबद्दल, अचूक व अढळ तत्त्वज्ञानाबद्दल व तत्त्वनिष्ठेबद्दल गोडवे गाऊं लागला. डॉ. खरे, नरीमन् यांच्याहिबद्दल आम्ही बरेंच बोललों.

मला त्याचें हें विवेचन ऐकतांना आनंद वाटत होता. वास्तविक त्याला नापसंत अशी घटना होती ती. पण तरी त्याचें वरील विवेचन किती सुंदर होतें. सुभाषपंथाचें वैभव त्याच्या विवेचनानें मला जास्त खुलून दिसूं लागलें. मी त्याला म्हणालों "किती सुंदर विवेचन आहे तुझें! तुम्हांला हें कसें जमतें कोणास ठाऊक?"

" काय जमायचें त्यांत ? आम्ही व्यक्तित्वाचे भोक्ते आहोंत. "

" आणि त्यामुळें मतांची नि मतभेदांची पर्वा करीत नाहीं असेंच ना ? या वृत्तीनें तुम्हांला कशाचीही रुखरुख लागत नाहीं. कोठेंहि असलांत तरी तुमचें समाधान, आनंद हीं नेहमीं तरारलेलीं असावयाचीं. कोणत्याहि पंथाबद्दल, कोणत्याहि व्यक्तीबद्दल, मताबद्दल मनांत दृढमूल अशी भावनाच नाहीं. तुम्हांला पट्टाभि काय नि सुभाष काय—तुमची टवटवी कायमच. या कुंडींतल्या झाडासारखें आहे तुमचें. कोठेंहि ठेवा तें. त्याची आपली अल्पसंतुष्टता व त्यावर पोसणारी टवटवी आपली कायम. गौरीपुढें ठेवा नाहींतर गणपतीपुढें ठेवा. कोठेंहि खूष होऊन बसावयाचें ! "

" तुमचीं तरी मतें काय अगदीं पेरून रुजवून, कांटेरी कुंपणांत वाढवून आतां अगदीं त्यांचे वडपिंपळ झालेत वाटतं ! दुराग्रह म्हणजे मतें नाहींत. बहुतेकांचीं राजकारणांतील मत हीं कांहीं कांहीं व्यक्तीभोंवतींच घोंटाळत असतात. विभूतिपूजा हीच त्यांतील मध्यवर्ती कल्पना. आणि आपल्याला प्रिय असलेली विभूति राजकारणांत श्रेष्ठ ठरावी अशी आपली हौस असते. तुला तरी रॉयचें नि सुभाषचें तत्त्वज्ञान कितीसें माहित आहे रे ! फक्त शुक्रवारचा ज्ञानप्रकाश वाचणारा वाचक तूं. सुभाष नि पट्टाभि–तुला काय त्याचें ?"

त्याला मी हेच शब्द परत करणार होतों आणि ते त्यानें सहज स्वीकारले असते. मलाहि त्याचें म्हणणें पटूं लागलें होतें. राजकारणांतील आपलीं मतें हीं कुंडींतील फुलझाडांसारखींच असतात. या विचारापासून मी निघालों आणि सामाजिक, धार्मिक, वैयक्तिक वगैरे प्रदेशांतून भटकून आलों. मला सगळीचकडे हें पटूं लागलें. आपली मतें कुंडींतील फुलझाडांसारखीं ! त्यांचा सगळा पसारा सहज दोन हातांनीं उचलतां येतो नि वाटेल तिकडे हलवतां येतो.

चारदोन बोटें लांब असलेलीं मुळें नि त्या नाजूक मुळांवर पोसणारीं पांचसहा वीत उंचीचीं टुमदार नाजूक फुलझाडें ! एक दोन पाट्या माती जीवनभर पुरते त्यांना. फुलझाडांचें खरें सौंदर्य फुलापेक्षां त्यांच्या अल्पसंतुष्टतेंत असतें. एखाद्या वेळीं आपल्या मताच्या फुलझाडांना अभिमानाचीं
४।२ फुलें येतातहि, नाहीं असें नाहीं ! आणि त्या अभिमानाच्या फुलांना

क्वचित् श्रद्धेचा सुवासहि येत असेल. पण तरी त्यांचा बहर म्हणजे कांहीं आंब्याचा मोहोर नाहीं. आपल्या भोंवतालच्या जीवनाच्या हवापाण्यावर नि खतमातीवर आपल्या मनाच्या कुंडींत मताचीं रोपटीं तयार होतात. आपण हौसेनें त्यांची मशागतही करतों. पण समजा, त्यांतलीं कांहीं खुरटलीं—तर–? तरी रोपट्याच्या मृत्यूचें दुःख तें काय असणार? तितक्याच निर्विकारपणें आपल्या मनांतील मतांचे जन्ममृत्यु होत असतात. क्वचित् एखाद्या मनांतील मतें कुंडीं फोडून आपलीं मुळें पसरूं लागतात—जोर करूं लागतात ! पण किती झालें तरी फुलझाडांच्या मुळांचा जोर तो !

असें आहे म्हणून तें वाईट आहे असें थोडेंच आहे ? मानवी मनाच्या मनोभूमीवर असंख्य विचारबीजांचा नुसता पाऊस पडत असतो. कोणत्याहि दिवसाचें एखादें दैनिक घ्या ! असंख्य मतांचा नुसता बाजार माजलेला असतो तो. मोठमोठ्या राष्ट्रांच्या जीविताचे प्रश्न, परंतु ४।२ ओळींपलीकडे त्यांच्या बातम्यांना जागा मिळत नाहीं. आणि त्यावरून आपण मतें बनविणार ! बनविणार कसलीं बनणार ! एखादा मताचा वटवृक्ष होण्याइतकी जागा फार थोड्या मनोभूमींत असते. ते मतांचे वटवृक्ष स्वतंत्रपणें, संथपणें, वाढत असतात. त्यांना खत कोण घालतो नि पाणी कोण पाजतो ? आपल्या 'मूल' सामर्थ्यानें ते जमिनींत जीवनाचा पाया खणीत असतात. त्यांच्या बीजांतून तत्त्वज्ञानाचे बोधिवृक्ष उत्पन्न होतात. आणि मग त्यांच्या छायेखालीं डुलत राहणें हेंच आपल्या कुंडींतील फुलझाडांचें काम !

# पायांतली वहाण— २६

संध्याकाळ होऊन गेली होती. गाई केव्हांच घरीं आल्या होत्या आणि आतां एका जाहीर सभेहून लोकही परत येऊं लागले होते. मी माझ्या एका मित्राकडे बसलों होतों. अर्थात् आम्ही दोघेहि सभेला गेलों नव्हतों. परंतु घरीं बसूनच आम्ही सभेच्या विषयाची चर्चा करीत होतों.

इतक्यांत दाराजवळ धाड्–धप्–धप् पावलें वाजूं लागलीं. इतर कांहीं आवाजाच्या खुणांवरून आम्हीं ओळखलें कीं, कोणी तरी स्त्री असावी. पण स्त्री असून इतक्या जोरांत—?

माझ्या मित्राची मुलगी एक युवती घरीं येत होती. ती मॅट्रिकच्या वर्गांत होती आणि आपलें भावी 'स्थळ' या दृष्टीनें कॉलेजकडे पहात होती. म्हणून ती कॉलेजांतल्या सभेला मधून मधून जात असे.

ती जी आली ती थेट आम्ही बसलों होतों तेथें आणि तेथून ती तशीच मधल्या खोलीकडे निघाली.

लहान मुलें 'आगगाडी' खेळतांना जसे पाय आपटतात तसे ती सारखे पाय आपटीत होती. धप्–धप्–भप्–भप्—

आम्ही दोघेहि सगळें पहात होतों हें—

"कमे, पायाला काय मुंग्या आल्या कीं काय?"

कमीनें आपल्या वडिलांकडे वळून उत्तर दिलें पण फक्त डोळ्यांनीं. त्या पाहण्यांत "अय्या! इश्श्य" वगैरे शब्दांचा अर्थ होता.

" वहाणा घेऊन आंत कोठें चाललीस ? काय झालं आहे काय बुवा आज ? कांहीं पराक्रम--! "

" आज एका बदमाषाची अशी जिरवली बाबा ! "

" कोणीं ! कोण तो बदमाष ? तूं तर सभेला गेली होतीस ना ? "

" हो. तेथेंच एका मुलीनें एका बदमाषाला चप्पल मारली ! " चप्पल मारल्यासारखे हातवारे करीत कमल बोलत होती.

" पण आधीं त्या वहाणा जागच्या जागीं ठेव ! पायांतील वहाणा दाराशीं ठेवाव्या ! त्या चप्पल प्रयोगाच्या जोरांत तूं पाय आपटीत आलीस वाटतं ? तरी म्हटलं कमीच्या पायांत कसला जोर आला आहे ? हं—काय भानगड आहे सांग पाहूं ? "

नंतर कमलनें कांहीं कांहीं सांगितलें. पण तिच्या पायांतल्या वहाणा काढून घेतल्यानें तिचा जोर थोडा कमी झाला होता.

त्यानंतर कांहीं दिवसांचा प्रसंग—

खूप पाऊस पडून गेला होता. लोकांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे अगदीं मुसळधार पाऊस पडून गेला होता. आणि तो पुन्हां पुण्यासारख्या शहरीं आणि पुन्हां तोहि आमच्या गल्लींत ! रस्त्यांवर दबून बसलेली माती अगदीं सैल झाली होती. आणि मोटारी, तांगे, सायकली यांच्या वेगाबरोबर त्या मातीचा चिखल होऊन उधळला जात होता ! कांहीं ठिकाणीं अगदीं शेतासारखा चिखल झाला होता. जास्तींत जास्त कडक जागेवर पाय टाकण्यासाठीं लोक रस्त्यानें वेड्या वाकड्या उड्या मारीत जात होते !

एक गृहस्थ मात्र शांतपणें चालला होता. अगदीं उन्हाळयांतल्या संध्याकाळीं फिरावयास निघाल्यासारखा ! कारण त्यानें तसा बंदोबस्त केला होता. पावसाळ्याचें मुख्य संकट कपड्यांना ! त्यांतही पादत्रणांना ! त्यानें धोतर गुडघ्यावर खोवून टाकलें होतें. डोक्यावर सोळा काड्यांची छत्री घेतली होती आणि वहाणा हातांतच घेतल्या होत्या ! त्यामुळें तो चिखलांत चालत असूनहि अलिप्त होता. लोक त्याला हसत होते. पण कांहीं वेळानें त्याच्या जवळून एक तरुणी जाऊं लागली ! त्यावेळीं तोहि हसूं लागला. पावसाळ्यांत रस्त्यानें जाणारी स्त्री, म्हणजे फॅशनवर पावसानें लिहिलेलें विडंबनकाव्यच ! त्या

केसांच्या बटांसारखे बंद असलेल्या चपला ! पौर्णिमेच्या चांदोबाएवढी छत्री ! आधींच ऐसपैस असलेलें आणि त्यांत वारा–पाऊस यांच्या तडाख्यांत सांपड-लेलें वस्त्र ! त्या तरुणीच्या तलम पातळावर तिच्याच वहाणांनीं चिखलानें खडी काढली होती ! आणि तरी या गृहस्थाला हातांत वहाणा घेऊन चाल-ल्याबद्दल ती हसत होती ! तोहि गृहस्थ हसूं लागला.

" त्यापेक्षां वहाणा हातांत घ्या कीं ! " तो कांहींसें ठेक्यांत पुटपुटला !

ती तरुणी म्हणत असावी, ' चिखलानें माखलें तरी फिकीर नाहीं पण पायांतली वहाण पायांत पाहिजे ! '

पण कांहीं प्रसंगीं पायांतली वहाण हातांतहि घ्यावी लागते. आत्मरक्षणासाठीं वस्तूंचा रूढ उपयोग बदलण्याचेहि प्रसंग येतात. उदा० तो वृद्धच घ्या ना !

काठी ज्याप्रमाणें कांहीं वेळां टेकावयास नि कांहीं वेळां ठोकावयास उपयोगी पडते तसेंच वहाणेचें ! वहाण हेंहि एक हत्यार आहे आणि हत्यार म्हणून तें वापरावयाच्या वेळीं तें हातांतच घ्यावयास नको का ? पण हत्यार म्हणून वहाणेला काम नसेल त्यावेळीं पायांतली वहाण पायांतच पाहिजे !

एखाद्या स्त्रीनें आत्मसंरक्षणार्थ पायांतली वहाण हत्यारासारखी वापरली तर—तर तिला कोण हसेल ? उलट त्या वृद्धाला मात्र लोक हसले ! अशा प्रसंगीं तो वृद्धसुद्धां त्या तरुणीचें अभिनंदनच करील कीं, " शाबास, आर्य-कन्ये, शाबास ! मार बरं आणखी एक ! अस्सं—शाबास ! "

आणि पायांतली वहाण हातांत घेण्याचे प्रसंग अलीकडे अभिनंदनास पात्र होऊं लागले आहेत. पावसाळ्यांत चिखलानें माखून गेल्या तरी पायांतली वहाण अट्टाहासानें पायांतच ठेवणाऱ्या स्त्रिया आतां तिन्ही त्रिकाळ पायांतली वहाण हातांतच बाळगूं लागतील, असें माझ्या मित्राचें सीलबंद भविष्य आहे !

कांहीं गोष्टींचा काळ येतो म्हणतात ना ! कांहीं दिवसांपूर्वी लाठ्या, बोथाट्या, चाकू, सुऱ्या यांना भाव आला होता. त्या वस्तु जवळ बाळगणें नि मिरवणें ही एक हंगामी फॅशन झाली होती. कारण वाटेल त्या वेळीं अवेळीं हल्ले होत होते आणि 'त्या' नराधमांचा बंदोबस्त करण्याचें ठरलें होतें ! आपणहि दुबळे नाहीं हें निदान एकमेकांस तरी कळवावें म्हणून—तरुणांनींसुद्धां नाजूक वेताच्या छड्या टाकून देऊन, जुन्या बाजारांत शिशाच्या बोंडाच्या यु. टी. सी.

च्या छड्या विकत घेतल्या! कांहींनीं तर असेंहि सांगावयास सुरवात केली कीं, ही साधी काठी नसून एक गुप्ती आहे. या काठीला एक कळ आहे! ती दाबली कीं मूठ उघडते आणि आंत असलेली बारीक लवचीक तलवार बाहेर येते! कांहींनीं महाबळेश्वरहून बोरकाठ्या मागवल्या, कारण बोरकाठीचा मार जिव्हारीं ( दुसऱ्याच्या!! ) बसतो म्हणतात! मंडईजवळ उघडे चाकू घेऊन बसणाऱ्या दाढीवाल्या पठाणाचे लोखंडी चाकू खपूं लागले! जुनीं टाकून दिलेलीं वस्तऱ्याचीं पातीं पैशाच्या पाकिटांत लोक ठेवूं लागले. विद्वानांनीं हिंदुलोकांच्या प्राचीन शस्त्रास्त्रांचा अभ्यास करावयास सुरवात केली. एका माणसाच्या गालावर 'कोणीं' तरी वार केला असें कळल्या-बरोबर त्याचा गाल पाहण्यासाठीं लोक त्याचा कसून शोध करूं लागले. कोणत्याहि कारणामुळें दुखापत होवो, दुखापत झालेली पाहिल्याबरोबर त्या दुखावलेल्याची विचारपूस करावयाच्या आधीं लोक बातमी ओरडत—'गुंडांच्या अमानुष हल्ल्यास आणखी एक बळी! काल संध्याकाळीं ऐने गर्दींत, किंवा भर दुपारीं रस्त्यावर, किंवा कालव्याच्या बाजूला किंवा पर्वतीच्या पूर्व बाजूस—' वगैरे! आणि मग त्या दुखावलेल्याच्या मुलाखती—प्रसंगीं फोटोसुद्धां! अगदीं दुसरा विषय नव्हता! आम्ही संरक्षणार्थ सिद्ध आहोंत अशा ताठ्यानें लोक गांवांत लाठी आपटीत हिंडत होते आणि हल्लेहि चालूच होते! मला आश्चर्य वाटे कीं, कालपर्यंत आपल्या समाजांत किती दुबळे लोक असल्याचें ऐकत होतों आणि आज एकदम हें सुप्त शौर्य हलूं बोलूं कसें लागलें!

पण तीहि एक फॅशन झाली होती. एखाद्या तरी हल्ल्याची बातमी खिशांत घातल्याखेरीज कोणी बाहेर पडत नसे!

नंतर उपासाचें खूळ आलें! दारिद्र्यानें ज्यांची उपासमार होत होती तेहि आतां स्वतःला अन्नसत्याग्रही म्हणवूं लागले. "आज पोटभर जेवलों" असें सांगणारा 'प्रतिगामी' ठरूं लागला. माझा एक मित्र कडकडीत शनिवार करीत असे व लोक त्याला हसत असत. आतां त्याला भाव आला होता, आणि तोहि बेडरपणानें सांगूं लागला कीं, स्वराज्याच्या कामीं जें मांद्य आलें आहे त्याचा निषेध म्हणून मी मंदवारीं अन्नसत्याग्रह करतों! आम्हालाहि त्याला तो सत्याग्रह सोडण्याचा जाहीरपणानें आग्रह करावा लागे

आणि आमचें ऐकून तो शेवटीं संध्याकाळीं सत्याग्रह आठवडाभर तहकूब करी म्हणजे शनिवार सोडी !

आणि आतां पायांतली वहाण हातांत घेण्याचे दिवस आलेले दिसतात ! अमक्या स्त्रीनें—नव्हे विदुषीनें—तमक्या पुरुषाला काठीनें चोपलें ही बातमी ऐकल्याबरोबर बातामीदार चोपड्या घेऊन पळतात, फोटोग्राफर कॅमेरे घेऊन धावतात, मुलाखतवाले आपलें प्रश्नमालिकेचें यंत्र घेऊन धावतात,—ती बातमी खोटी तर ठरणार नाहीं अशी धास्ती सगळ्यांना वाटत असते ! त्या पराक्रमी स्वाभिमानी विदुषीला पाहाण्यासाठीं लोक रस्त्यानें जाणाऱ्या प्रत्येक स्त्रीकडे रोखून पाहातात आणि 'हीच ती' आणि 'हाच तो' या नांवाखालीं १०।५ स्त्रीपुरुष लोकांत प्रसिद्ध होतात ! कित्येकांची कल्पना तर अशीहि होते कीं, ती स्त्री आतां नेहमीं तीन चपला वापरीत असेल—दोन पायांत नि एक हातांत ! किंवा दादोजी कोंडदेवानें एका चुकीचें प्रायश्चित्त म्हणून अपराधी हाताची बाही कायमची लांडी करून टाकली होती त्याप्रमाणें आपल्या वृत्तीची खूण म्हणून ती स्त्री एकच वहाण वापरीत असेल आणि दुसरी पायांतली वहाण हातांत !

राणा प्रतापचें राज्य गेल्यावर तो त्या अपमानाच्या चिडीनें गवतावर झोपे आणि पत्रावळीवर जेवी आणि त्याचे वंशज म्हणे पराच्या गादीखालीं गवताची काडी आणि सोन्याच्या ताटाखालीं एकादें झाडाचें वाळकें पान टाकून ठेवीत ! त्याप्रमाणें या पराक्रमी स्त्रियांच्या भगिनी एकादी रेशमाची नाजूक चप्पल मनीबॅगमध्यें ठेवूं लागतील किंवा चप्पलेच्या आकाराचे 'ब्रो' केसांत घालतील किंवा आपल्या प्रियकराच्या रुमालावर चप्पल विणतील किंवा —काय सांगावें काय करतील तें ! मूर्खपणा हें फॅशनचें लाडकें लेंकरूं आहे !

पण भगिनींनो ! त्या एका पराक्रमी विदुषीचे तुमच्या हौशीसाठीं किती हाल होतात ! चप्पलवाली म्हणून अभिनंदन करून घेण्यासाठीं तिला जवळ जवळ सर्वस्वाला मुकावें लागतें ! लोक तिच्यांतलें तेवढेंच एक वैशिष्ट्य ओळखूं लागतात ! लोक आधीं तिच्या पायाकडे पाहतात, कीं पायांतली वहाण पायांत आहे कीं हातांत आहे ! तिच्यावर एक प्रकारचा सामाजिक बहिष्कार पुकारला जातो ! कोणाची ताकद आहे तिचें प्रणयाराधन करण्याची ! तिला पाहावयास जाणारा तिचें बहुतेक अल्लाउद्दीनाप्रमाणें आरशांतच तोंड

पाहील ! आणि इतकें तरी धाडस कोण करणार ! त्या पराक्रमी विदुषीस पाहतां पाहतां ‘ असामान्यत्व ’ येईल !

बायकोला मारणारा एखादा पुरुष समाजांत निर्वेधपणें वावरूं शकतो पण पुरुषाला मारणारी स्त्री ? जात्याच पुरुषांचा स्त्रियांकडे ओढा— त्यांत आणखी पुरुषाच्या गालावर चपलेचा आवाज करून प्रसिद्ध झालेली स्त्री असल्यावर ! तो पादत्राण–प्रसाद खाणारा पुरुषहि स्वतःचा गाल विसरून गालावर हात ठेवून त्या स्त्रीकडे कुतूहलानें पहात राहील ! तुमच्या झालेल्या अपमानाचा त्या जाहीर चप्पल–प्रयोगानें केवढा प्रसार होतो ! त्या निंदेचा केवढा आवाज होतो ! आणि पायांतली वहाण हातांत, भर समाजांत, हातांत घेण्याचा तुमचा हेतु तर अपमानभरपाईचा असतो !

समाज—तुमच्याकडे रोखून पाहणारा, तुमचा अपमान करणारा उघडया डोळ्यांनीं गळचेपी करण्याचें धर्मशास्त्र बनवणारा तोच समाज, नेहमींच तुमच्या बाजूनें आहे. तुम्ही कोणालाहि चप्पल मारा—लोक ताबडतोब म्हणतील तो बदमाषच आहे ! त्याला तेंच पाहिजे ! तुम्हाला एका अक्षरानेंहि कोणी विचारणार नाहीं कीं ‘ का हो, त्याला कां मारलेंत ? ’ चुकून जरी भलत्यालाच तुमची चप्पल बसली तरी लोक ताबडतोब त्यालाच बदमाष ठरवतील ! आणि तुमचें अभिनंदन करतील ! तुमची चप्पल मारतां मारतां तुटली कीं लोक नवी आणून देतील—त्या तुटक्या चपलेचें स्मारक करतील ! आणि ऐन वेळेवर तुमचा धीर सुटूं लागला तर ते म्हणतील ‘ मारा हो ! मारा ना त्याला चपल ! करा ना त्याला शासन ! ’ अगदीं तुमच्या मैत्रिणीहि तुम्हाला गळयांत पडून आग्रह करतील कीं, ‘ घे ना अपमानाची भरपाई करून ! कर ना आपल्या जातीवरील अन्यायाचा प्रतिकार !’ आणि तुम्ही त्यांच्या आग्रहाला बळी पडल्याबरोबर तुमच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होईल ! परंतु कांहीं क्षण ओसरल्यावर तुमच्या त्या कृत्याबद्दल सगळीकडे स्तुति ऐकूं आली तरी आणखी कांहीं दिवसांनीं तेच लोक म्हणतील, ‘ हीच ती चप्पलवाली ! ’ चालेल तुम्हाला हें अभिधान ?

म्हणजे होतें काय—एक अपमान दुरुस्त करतांना दुसऱ्याचा प्रसार होत जातो. भगिनींनो ! असें समजूं नका कीं, तुम्ही अपमान सहन करावा असें कांहीं सांगण्याची ही प्रस्तावना आहे ! पुरुष जातीचे जुलूम ‘ चोराच्या वाटा ’ या ‘ चोरपथ ’ न्यायानें आम्हां पुरुषांना माहीत आहेत.

स्त्रिया अब्रूला भितात आणि प्रतिकार करतांना अब्रू जाते या समजुतीनें स्त्रियांची बेअब्रू करणें हा ज्यांचा धंदा आहे असे लोक समाजांत आहेत. आपल्या पाशवी वृत्तीचें प्रदर्शन करून स्त्रियांची कमीजास्त प्रमाणांत जमेल तशी बेअब्रू करीत राहणें हीच त्यांची रिकामपणाची कामगिरी आहे. असे 'बाळकराम' शनीच्या पाराच्या अलीकडे आहेत नि पलीकडे नाहींत असें एका पत्रपंडितानें तुम्हास पटविण्याचा प्रयत्न केला आहे. पण ती एक पुरुषी थाप आहे असें समजा. नाहींतर शहरच्या 'त्या' भागांत निर्धास्तपणें हिंडूं लागाल आणि जवळच्या जवळ 'सक्काळ' ला बातमी पुरवाल !

परंतु ही सावधगिरी प्रतिकाराच्या पद्धतींतहि लक्षांत ठेविली पाहिजे. तुम्ही प्रतिकारासाठीं चप्पलशासनपद्धतीचा प्रयोग कराल त्यावेळीं असें पहा कीं, तुमच्या मैत्रिणी त्यावेळीं काय करतात ! तुमचें मानसिक प्रणयाराधन करणारे सुष्ट नि गुह्य प्रियकर काय करतात ! ते तुमच्या प्रतिकार-पंथाला सक्रिय सहानुभूति कां दाखवीत नाहींत ! तुमची बेअब्रू करणाऱ्या बदमाषाला तुमच्या भावांनीं, तुमच्या मित्रांनीं, तुमच्या मैत्रिणींनीं शासन कां करूं नये ? तुमची बेअब्रू झाली आहे अशी बातमी मिस्किलपणें तुमच्या-पर्यंत पोहोंचविणारे तुम्हाला ज्या वेळीं प्रतिकाराचा मार्ग सुचवितात त्यावेळीं तुम्ही त्यांना विचारा कीं, 'तुम्हालाहि याबद्दल वाईट वाटतें ना ? मग तुम्ही आधीं त्याचा प्रतिकार करूनच कां नाहीं आलांत ? चला, सगळे मिळून त्याला शासन करूं या !'

पण असें होणार नाहीं. तुम्हाला भरीस पाडणारे, तुमचें अभिनंदन कर-णारे, तुम्हांला उत्साह देणारेच लोक रस्त्यानें जातांना माहिती देतील कीं 'हीच ती चप्पलवाली !'

म्हणजे या प्रतिकारपद्धतीनें निराळयाच एका मानसिक यातनांचा काळ सुरू होतो असें मला वाटतें. माझें असें अगदीं प्रामाणिक मत आहे कीं, वृत्त-पत्रीय प्रसिद्धीच्या लालसेला बळी पडण्यापेक्षां प्रतिकाराचा याहूनहि परिणाम-कारक व शास्त्रीय मार्ग शोधणें जरूर आहे आणि तो सांपडेपर्यंत—

'पायांतली वहाण
पायांतच ठेवलेली बरी !'

# संस्था आणि इमारत २७

'मला पुस्तकें अतिशय आवडतात.' असें मीं एका बैठकींत सहज बोलून गेलों. अगदीं खाजगी विधान होतें तें आणि बैठकही खाजगी होती. त्या बैठकींतला प्रत्येक माणूस माझ्या चांगला परिचयाचा होता. परंतु एक मात्र ओळखीचा नव्हता.

--तोच अनोळखी माणूस एक दिवस माझ्याकडे आला.

"आपण मला ओळखलें नसेल", तो हसत हसत म्हणाला.

मला काय उत्तर द्यावें हें कळेना. खरें म्हणजे त्याच्या प्रश्नाचें जें सरळ उत्तर होतें तें द्यावें कीं नाहीं याचा मी विचार करीत होतों.

तेंच उत्तर पण मीं जरा घुटमळत दिलें.

"हो–नाहीं–पण कोठें तरी पाहिल्यासारखें वाटतें."

"मी आपल्या मित्राबरोबर एकदां आलों होतों. मोठा आनंद झाला त्या दिवशीं ! इतकी ग्रंथाची आवड असलेले फार थोडे असतात."

तो बोलतां बोलतां माझ्या फळ्यांवरील ग्रंथांकडे पाहूं लागला. मला ती त्याची नजर अत्यंत क्रूर वाटली. त्याच्या बुबुळावर माझ्या आवडत्या ग्रंथांच्या नांवांचीं उलटीं प्रतिबिंबें पडत आहेत असें वाटूं लागलें.

एखादें पुस्तक वाचावयास मागणार हा ! याची मला धास्ती वाटली. आणि त्याहून धास्ती वाटली ती स्वतःबद्दलची.

—'मला नाहीं म्हणवणार नाहीं' याची !

अत्यंत मोठा दुर्गुण होता तो माझ्यांतला ! कोणीं कांहीं वाचावयास मागितलें कीं मला भयंकर राग येई, कारण मला नाहीं म्हणण्याचें जमत नसे.

या मागणाऱ्यांचा संताप येण्याचें कारण त्यांच्या डोळ्यासमोर असलेलीं पुस्तकें फार थोड्या वेळां माझ्या मालकीचीं असत. कोणाकडून तरी भीक मागून आणलेलीं आणि वहिवाटीच्या हक्कानें तीं मजजवळ राहूं लागलेलीं असत. तेव्हां तीं देत नाहीं असें म्हणण्यांत कांहीं जोर नव्हता. आणि म्हणूनच द्यावींशीं वाटत नसत आणि तरी शेवटीं लोक त्यांतलीं पुस्तकें नेत असत.

वरील गृहस्थानें नंतर माझ्या वाचनाची स्तुति केली.

"प्रत्येक पुस्तक आपण म्हणजे अगदीं निवडूनच जमवलेलें असणार!"

"अर्थात्! नाहीं तर माझें घर म्हणजे वाचनालयच होईल कीं!"

"हो–हो–खरी गोष्ट काढलीत. त्याचें असें आहे. आपल्या गांवांत चांगलें वाचनालय नाहीं."

"हो. त्यामुळें फार पंचाईत पडते. प्रत्येक पुस्तक विकत घेणें—"

"तो त्रास वाचावा म्हणून आम्हीं एक वाचनालय काढलें आहे."

"अस्सं छान! मग येईन एकदां मी पहायला."

"छेः! छेः! आपल्यासारख्यांनीं पाहण्यासारखें काय आहे त्यांत? आपल्याला काय नवीन असणार?"

"वाः! बरीच कल्पना आहे तुमची माझ्याबद्दल!"

"नाहीं म्हणजे—"

"नाहीं म्हणजे काय, होय?"

"नाहीं म्हणजे असं, आमच्यासारख्या सामान्यांसाठीं ज्ञानाची सोय आहे ती. पण मुख्य अडचण म्हणजे ग्रंथांची!"

'मग ग्रंथांवांचून हें वाचनालय काढलेंत?'

पण मी मोठ्यानें म्हणालों तें हें नाहीं!

मी म्हणालों, "हो. तोच मुख्य खर्च असतो."

"पण आम्हाला अशक्य वाटत नाहीं त्यांत कांहीं."

" अहो, काय अशक्य आहे त्यांत ? "

मला त्याच्या या प्रश्नाला उत्तर देतां आलें नाहीं.

" आपल्यासारख्यांनीं ५-१० पुस्तकें दिलीं तर—"

" अहो, पण हीं माझीं नाहींत ! "

" नसेनात का ? "

" म्हणजे दुसऱ्याचीं मी देऊन टाकूं ? "

" देऊन टाकायचीं असें नाहीं. असें कसें भलतेंच मागेन मी ! माझें म्हणणें असें कीं, इथें पडलीं तीं आपल्या वाचनालयांत पडतील ! "

' मला पुस्तकें फार आवडतात ' या वाक्याच्या आधारें माझ्यावर खूष झालेला तो प्राणी मला पुस्तकें फार आवडतात म्हणून माझींच पुस्तकें पळविण्यास आला होता !

" पण मला लागलीं कीं—"

" आपलींच आहेत ! मध्यरात्रीं मागा ना ? अहो, नेतो कोण असलीं पुस्तकें. वाचकांच्या उड्या सगळया कादंबऱ्यांवर. तेव्हां कादंबऱ्यांचें कपाट नेहमीं मोकळें राहाणार मग वाचनालयांत राहणार काय ? म्हणून आपले ग्रंथ—"

त्या गृहस्थाच्या बुद्धीचें मला कौतुक वाटूं लागलें. त्याच्यावर ताण करावी असें मला वाटूं लागलें. मीं त्याला सुचविलें.

" मग असं करा. जुनी रद्दी घ्या. पुस्तकाच्या आकाराचे कागद कापून बांधून घ्या. आणि सुंदर बाइंडिंग करून त्यावर माझ्याकडे असलेल्या ग्रंथांचीं नांवें घाला. नाहींतरी तीं वाचणार नाहींतच ना कोणीं ? कुलूप घाला त्या कपाटाला आणि किल्ली आपल्या हातानें नदींत फेकून द्या ! हो—म्हणजे ग्रंथसंग्रह झाला, पैसेहि वांचले ! "

" छान ! छान ! " तो गृहस्थ—एका उगवत्या सार्वजनिक संस्थेचा कोवळा चिटणीस—मोठ्यानें हंसला.

मला वाटलें तो रागावेल.

पण त्याचें हसूं—तें निरर्थक हसूं—ऐकून वाटलें खरा चिटणीस आहे !

' ज्ञानमंदिर ' या नांवानें ती संस्था सुरू झाली. लोक वाचावयास

येऊं लागले. माझीं १०-१५ पुस्तकें त्या कपाटांत पडलींच. आणि एका बुडालेल्या वाचनालयाचीं बरींचशीं पुस्तकें वजनावर विकत घेऊन चिटणिसांनीं ग्रंथसंग्रहांत 'वजनदार' भर घातली आहे. तीं पुस्तकें ते पाहुण्यांना फक्त दाखवतात. तीं यादींत नोंदविलेलीं नाहींत !

संस्थेचे वार्षिक समारंभ होऊं लागले. संस्थेच्या कार्याला ध्येयाचाहि कोंब फुटला.

आश्रयदाते–तहाहयात–साधारण–वगैरे शब्द कारकुनाच्या टेबलावरील कागदावर दिसूं लागले,

इतक्यांत 'संस्थेची हलाखीची स्थिति' वगैरे शब्द कानावर येऊं लागले. मीं ओळखलें कीं, आतां संस्था चांगली चालली आहे !

शेवटीं संस्थेची स्थिति इतकी खालावली कीं, धर्मार्थ खेळाच्या चळवळी सुरू झाल्या ! ग्रंथालयाचें ऑफिस बंद करून चिटणीस थिएटरच्या तिकिट ऑफिसांत बसूं लागले ! ग्रंथालयांतील वृत्तपत्रांचे फळे मोकळे पडूं लागले !

एखाद्या बहरलेल्या झाडावर एकाएकीं कीड पडावी आणि तें झाड वठूं लागावें तसें त्या संस्थेच्या कार्याचें झालें !

एकाएकीं काय झालें असें—याचें मला अत्यंत आश्चर्य वाटे. कारण ग्रंथ-संग्रह वर सांगितलाच ! पण तोहि वाढला नाहीं. वर्गणीदार आरडाओरड करीत पण वर्गणी नाकावर टिच्चून सूचनावह्या खरडीत ! कारण त्यांची विशेष सोय अशी होती कीं, पुष्कळसे लोक रिकामपणीं वाचनालयांत येऊन बसत. खाजगी कामें तेथेंच करीत. कारकुनाच्याच टेबलावर पत्र लिहीत बसत. आणि एक गृहस्थ तर दुपारीं तेथें येऊन वामकुक्षीसुद्धां घेत. कांहीं मंडळी २ पैशाची काबुली घेऊन तेथें येऊन खात बसत. आणि दिवसभर ऐकलेल्या व वाच-लेल्या व अंदाजिलेल्या बातम्यावर मोठमोठ्यानें चर्चा करीत !

एकदां संध्याकाळीं मी सहज त्या ज्ञानमंदिरांत गेलों. तों मला एखाद्या नदी-कांठच्या रानांतील शंकराच्या देवळासारखी तेथें शांतता दिसली. वाचनालयाच्या मुख्य हॉलमध्यें कोणीहि नव्हतें. कारण टेबल व वृत्तपत्रफलक मोकळे होते. एका कोपऱ्यांत कारकून महाशय कांहीं लहान वह्यांचे गठ्ठे घेऊन टिपीत बसले होते. आणि बाहेरच्या गॅलरींत वरील 'काबुलीवाले' मोठमोठ्यानें चर्चा करीत होते.

'रशियानें जर्मनीला मदत करण्यांत मोठा डाव मांडला आहे' त्यांचें सूत्रवाक्य होतें.

त्यांच्या पुढें नुकत्याच संपविलेल्या काबुलीचे कागद पडले होते. खाण्याचा मुख्य भाग संपल्यावर आतां नुसता हातच चालू होता. आपल्या राजकीय पुढाऱ्यांना ते प्रकट सूचना देत होते. आणि एकंदरींत वर्किंग कमिटीच्या चर्चेइतका आवेश त्यांनीं जमवला होता !

मला पाहिल्याबरोबर कारकून महाशय एकदम आनंदानें दचकून म्हणाले, "वा: ! तुमच्या घरीं जाऊन आलों."

"कशाला ? केव्हां ?"

"आपल्या नांवावर 'एक बारा'चें तिकिट टाकलें आहे !"

"कशाचें ?"

त्यानें हातांत एक जाहिरात दिली !

त्या ज्ञानमंदिराच्या इमारत फंडासाठीं 'विडीवाला' या नाटकाचा प्रयोग होणार होता.

"पण आज मला येतां येणार नाहीं !"

"थोडा वेळ येऊन जा ! तसें नाटक कांहीं फार 'हें' आहे असें नाहीं. पण गाजलें आहे मात्र खूप !"

"पण मला मुळींच येतां येणार नाहीं हो !"

"काय चिंता आहे ? आपला आश्रय मिळाला म्हणजे झालं !"

"नाटक न दाखवतां तिकिटाचे पैसे घेणार वाटतं ?"

"घेणार कोण ? आपण देणार ! संस्था मागणार ! आम्ही विनंति करणार ! हें पहा आपलें नांव !"

माझ्या नांवाची नोंदहि करून टाकली बहाद्दरानें ! आणि पुढें लिहिलें होतें, 'पैसे येणें !'

नंतर एक वर्षाची गोष्ट ! ज्ञानमंदिर सुरू झाल्याला तें चौथें वर्ष होतें.

ज्ञानमंदिराची इमारत उभी राहिली ! पण त्या इमारतीला पुरेल

इतका ग्रंथसंग्रह मात्र नव्हता ! कार्यकारी मंडळ कांहीं निराळयाच भानगडींत गुंतलें होतें. ती भानगड म्हणजे इमारत-फंड !

संस्थेला इमारतीच्या पायीं पांच हजार रुपये कर्ज झालें होतें !

आतां ते पांच हजार रुपये फेडणें एवढें एकच कार्य चालू होतें. युद्धकालीं इतर कार्यें ज्याप्रमाणें तहकूब होतात त्याप्रमाणें त्या इमारत-कर्जनिवारण-कार्यासाठीं ज्ञानकार्य बिनमुदत बंद होतें !

पैसे मिळविण्याच्या हजारों युक्त्या कार्यकारी मंडळानें एकदम सुरू केल्या ! इमारतीच्या निरनिराळया भागांना नांवें ठेवण्याची एक चळवळ सुरू झाली ! दोनशें रुपये देणारास एक खोली नांवासाठीं, ५०० रु. देणारांस संगमरवरी कोरलेलें नांव, १००० देणारांस तैलचित्रासह नामकरण समारंभ इत्यादि मार्गांनीं शेवटीं दोन खोल्यांचें तर नामकरण झालें !

मंगलकार्यांच्या मोसमांत मधलें पटांगण भाडयानें देऊन पैसे मिळविण्याचा एक मार्ग निघाला. पटांगणाबरोबर बाजूच्या खोल्या गेल्या ! कारकुनाच्या खोलींत बटाटयाची पोतीं, पत्रावळीचे पुडे दिसूं लागले. मंगलवाद्यें वाजूं लागलीं. निरनिराळया मंगलकार्यांच्या निमित्तांनीं या ज्ञानमंदिराच्या बाहेरच्या बाजूस गणपतीचीं १०-१५ चित्रें दिसूं लागलीं ! आणि कोपऱ्यावर एक कचऱ्याची पेटी आली ! वर्गणीदार ओरडतच होते ! इमारत फंड जमतच होता ! ज्ञानमंदिर चालूच होतें ! कांहीं खोल्या शेवटीं कायमच्या भाडयानें देण्यांत आल्या. एका खोलीवर "मंगल-वाद्य-भांडार" अशी पाटी लटकली तर दुसऱ्या खोलीवर 'आचारी वाढपी मंडळ' ( मुख्य शाखा ) अशी पाटी झळकूं लागली.

दाराशीं सातारी जर्दा मिळूं लागला आणि तरी ज्ञानमंदिराचें कार्य ( ? ) चालूच होतें ! वर्षदिन साजरे होत. दसरा होई, कोजागिरी होई, गणेशोत्सव होत.

तरी इमारतफंडाची पिंड भरत नव्हतीच ! इमारत फंड हें एक कायमचें खातें संस्थेंत सुरू झालें होतें !

आणि अद्याप तें कार्य चालू आहे ! संस्थेचें कार्य, हेतु, उद्देश, ध्येय, जें काय छापलेलें असतें तेंच इमारतीच्या पायांत गाडलें जावें आणि संस्था जाऊन

फक्त इमारत रहावी अशी आमच्या त्या ज्ञानमंदिराची स्थिति होत चालली आहे.

तें पाहून मला कार्यकर्त्यांच्या इमारत वेडाचा एक धक्काच बसला आहे! भरीव कार्य म्हणजे टोलेजंग इमारत असें विचित्र समीकरण अनेक कार्यकर्त्यांच्या डोक्यांत दिसतें खरें!

ज्ञानदान करणाऱ्या इमारतींत मंगल वाद्यें वाजूं लागलीं कीं, मला तें अमंगल वाटतें! याचें कारण तीं वाद्यें ऐकल्याबरोबर मला आमच्या गरीब बिचाऱ्या ज्ञानमंदिराची आठवण होते!

माझ्या एका मित्रानें नुकताच एक विचार बोलून दाखविला कीं "माझें कुटुंब हें मी संस्थेंत नामांतर करून मग त्या संस्थेच्या नांवावर इमारत फंड जमवणार आणि अशा रीतीनें मोफत घर मिळवणार!"

मीं त्याला सांगितलें "इमारत होईल पण कुटुंब बुडेल!"

अनुक्रम ९६६०८
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय
REFBK-0006979